म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ३९३
१९६२



REFBK-0012995

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २

33.98
393

# ग ग न - चुं ब न

[ हिमालय गिर्यारोहणांतील तीन फ्रेंच सर्ग ]

स्थलप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ★ 33078 दि: 21-5-1961
393 नों. दि. 8-5-62

श्रीकान्त राय

★

| | |
|---|---|
| अन्नपूर्णा | : २६४९२ फूट – १९५० |
| नंदादेवी ( पूर्व ) | : २५६४२ फूट – १९५१ |
| शैल मकालू | : २७७९० फूट – १९५५ |

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
12994
REFBK-0012995

....७०....

मूल्य दोन रुपये

व्होरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : ३३९ [ ३–६२ ]

●

आवृत्ति पहिली :

१ ९ ६ २

●

कुमार साहित्य माला : ७०

●

मूल्य : रु. २–५०

●

पृष्ठें : १६ + ८ + ९६

●

© १ ९ ६ २
सौ. जयश्री आगाशे
एम्. ए., बी. टी.
विद्याविलास गुरुकुल,
आगाशे–कुटि, बुलढाणा



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २.

●

मुद्रक :
बा. रा. घर्तक
प्रशांत प्रिंटिंग प्रेस,
४६१/१ सदाशिव, पुणें २.

●

संदर्भ-ग्रंथ :

अन्नपूर्णा— लेखक : मॉरिस हेर्झोंग
टु किस् हाय् हेवन्— लेखक : जे. जे. लांगुपिन्
मकालू— लेखक : जीन फरँको

●

# अनुक्रमणिका


संदर्भ-ग्रंथ

अर्पणपत्रिका

ऋणनिर्देश : सौ. जयश्री आगाशे, एम्. ए., बी. टी.

प्रास्ताविक : श्री. श्रीकान्त राय

छायाचित्रें; नकाशे

**पहिला सर्ग : अन्नपूर्णा**

प्रकरण पहिलें : धवलगिरी— अन्नपूर्णा शिखरांकडे

प्रकरण दुसरें : अन्नपूर्णेच्या परिसरांत

प्रकरण तिसरें : अन्नपूर्णा शिखराशीं दोन हात

प्रकरण चवथें : परतीची वाटचाल

**दुसरा सर्ग : पूर्व नंदादेवी**

प्रकरण पहिलें : नंदादेवी.

प्रकरण दुसरें : शिखराकडील वाटचाल

प्रकरण तिसरें : लढा

प्रकरण चवथें : पूर्व नंदादेवी—विजय आणि निरोप

**तिसरा सर्ग : शैल मकालू**

प्रकरण पहिलें : मकालूकडे

प्रकरण दुसरें : शैल मकालूच्या छायेंत

प्रकरण तिसरें : यशमाला

परिभाषा

## ऋणनिर्देश

श्री. श्रीकान्त राय यांचें ‘ गगन-चुंबन ’ हें पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना मला आनंद होत आहे. हिमालय गिर्यारोहणांतील तीन प्रमुख फरेंच विजयांची कथा या पुस्तकांत निवेदिली आहे.

या पुस्तकासाठीं फरेंच गिर्यारोहण संस्थेच्या ‘मोहिमा-चिटणीस’ सौ. मायकेलिन् मोरिन् यांनीं अन्नपूर्णा व मकालू या मोहिमांसंबंधीं छायाचित्रें पाठवून आम्हांस उपकृत केलें आहे. प्रस्तुत पुस्तकास यश चिंतण्यासाठीं त्यांनीं आपल्या शुभेच्छाहि पाठविल्या आहेत. आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

नंदादेवी मोहिमेंतील छायाचित्रकार सदस्य श्री. जीन जाकीज लांगुपिन् यांनीं पाठविलेल्या छायाचित्रांबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. प्रस्तुत पुस्तकाची एक प्रत आपणांस मिळावी एवढीच त्यांची परतफेडीची अपेक्षा आहे. प्रत त्यांच्याकडे जाईलच; पण देवनागरी लिपींतील हें पुस्तक त्यांना वाचतां येणार नाहीं याबद्दल आम्हांस दिलगिरी वाटते.

हें पुस्तक पूर्ण होत आलें त्या सुमारास भारतीय शैल राधानाथ मोहिमेचे नेते ब्रिगेडियर ज्ञानसिंह यांनीं लेखकास प्रोत्साहनात्मक दोन शब्द लिहिले त्यांचा आम्ही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतों.

फरेंच गिर्यारोहण संस्थेच्या ( Federation Franeaise de La Montagne ) सौजन्याचा खास उल्लेख करणें हें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

आगाशे-कुटि
विद्याविलास गुरुकुल
बुलढाणा.

सौ. जयश्री आगाशे
एम्. ए., बी. टी.
३१-१२-१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३३..... दि: .....
..... ३१३

## प्रास्ताविक

हिमालयीन गिर्यारोहणांतील सर्वोच्च शिखरावरील विजयाच्या निमित्तानें शैल राधानाथावरील चढायांच्या इतिहासासंबंधीं ‘ विश्वाच्या कळसावर ’ हें पुस्तक प्रकाशित केल्यानंतर सुमारें दोन वर्षांनीं मी पुन्हा हिमालयांतील गिर्यारोहणाकडे वळत आहें. ‘ आकाशाला गवसणी ’ या माझ्या छोटेखानी पुस्तकांत जर्मन कामगिरीचें नंगापर्वत प्रकरण मीं लिहिलें होतें. त्याच वेळीं हिमालयीन गिर्यारोहणांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील गिर्यारोहकांच्या रोमांचकारी मोहिमांसंबंधीं स्वतंत्रपणें लिहावें असें माझ्या मनांत आलें होतें. अमेरिका, इंग्लंड, स्वित्झर्लंड, जर्मनी, इटाली, ऑस्ट्रिया, न्यूझीलंड, नॉर्वे, जपान, अर्जेंटिना व रशिया या राष्ट्रांतील गिर्यारोहक चमूंनीं आजवर हिमालयाच्या निरनिराळ्या शिखरांवर लहानमोठे विजय मिळविले आहेत. एवढेंच नव्हे तर भारताचे गिर्यारोहक देखील वेळोवेळीं हिमालयाच्या रौद्र स्वरूपांत रममाण होऊं लागले आहेत. ‘ आकाशाला गवसणी ’ या पुस्तकांत मीं भारतीय गिर्यारोहकांच्या पंचशूली-विजयाची कथा लिहिली होती. आणि आज मी हें पुस्तक लिहीत असतांना तर भारतीय गिर्यारोहकांची एक चमू ब्रिगेडियर ज्ञानसिंह यांच्या नेतृत्वाखालीं शैल राधानाथाशीं झुंजण्यासाठीं पायथ्याच्या तळाशीं सज्ज झाली आहे. भारतीय गिर्यारोहणांतील महान दिवस अगदीं जवळ येऊन ठेपला आहे आणि प्रस्तुत पुस्तक हातावेगळें होतें न होतें तोंच भारतीय गिर्यारोहकांच्या वीरश्रीच्या महाकाव्याचें रामायण सादर करण्यासाठीं माझी लेखणी अधीर झाली आहे....

तुम्ही एखादा खेळाचा सामना पहावयास क्रीडांगणावर उभे असतां. तुमच्यासमोर तुमच्या आवडीचे पट्टीचे खेळाडू आपल्या कौशल्याची शर्थ करीत असतात. विरुद्ध पक्षाची चमू देखील चांगली दमदार व अजिंक्य म्हणून गाजलेली असते. त्या चमूचा मर्मरक्षक (गोलकीपर) म्हणजे ‘ हिमालयाची भिंत ’ म्हणून प्रसिद्ध असतो. अशा वेळीं तुमचा लाडका खेळाडू चपलपणें प्रतिस्पर्धी चमूंतील खेळाडूंना चुकवीत हुकवीत चेंडू मर्मद्वाराजवळ नेतो. आतां तो चेंडूला एक दमदार लाथ मारणार....त्या प्रसंगीं प्रेक्षक म्हणून तुम्ही क्रीडांगणाबाहेर उभे असतां. खरें पाहातां तुम्ही कांहीं करूं शकत नाहीं. तुमच्या उत्कंठा-अपेक्षेनें शीग गांठलेली असते, तुमचे

दांतओंठ आवळले जातात, जणूं चेंडू तुमच्याचसमोर आहे व तुम्ही लाथ मारलीत तरच मर्मभेद होणार आहे अशा आवेशांत तुमचे पाय शिवशिवूं लागतात. तुमच्या पोटांत कुठलासा व्याकुळ गोळा वरखालीं होतां होतां क्षणार्धच स्थिरावतो. निमिषमात्र तुम्ही आरडाओरडा करून तुमच्या लाडक्या खेळाडूला प्रोत्साहन देण्याचेंहि न कळत विसरून जातां. अजून त्या खेळाडूनें चेंडूला लाथ मारलेली नसते, उगारलेला पाय मागें घेतलेल्या अवस्थेंतच संथचलच्चित्र प्रतिमाग्राहक स्तब्ध झाल्यासारखा तुम्हांस वाटतो. तो सेकंदाचा दशलक्षांश युगासारखा लांबकळत असल्याचा भास तुम्हांला होतो व चेंडूला लाथ मारतां येत नाहीं, अशा अवस्थेंत केविलवाण्या स्थितींत तुम्ही जागच्या जागीं कांहींतरी चुळबुळ करतां; ती स्थिति माझ्या लेखणीची झाली आहे. भारतीय गिर्यारोहक चमू शैल राधानाथावर धडपडत आहे आणि या मर्मभेदापूर्वीच्या क्षणांतील चुळबुळीचा परिणाम म्हणजे माझी लेखणी अन्नपूर्णा, नंदादेवी आणि मकालू शिखरांवरील फरेंच चढायांच्या कथा लिहीत आहे. आणि कुणीं सांगावें कदाचित् हें पुस्तक प्रकाशित होईल त्याच दिवशीं भारताचा प्यारा अशोकचक्रांकित तिरंगा शैल राधानाथावर डौलानें फडकवला गेला असेल, भारतीय गिर्यारोहकांच्या विजयानिमित्त यमुनेच्या तीरावर एकवीस तोफांची सलामी दिली जात असेल आणि खालीं मर्त्य लोकांत शैल राधानाथ चीनचें कीं नेपाळचें याविषयीं चाउ-कोईराला यांच्यांत पोरकट वाद माजला असतांना स्वर्गमाथ्यावर ‘ वंदेमातरम् ’चें राष्ट्रगान घुमत असेल !

● ●

प्रस्तुत पुस्तक कोणत्या स्वरूपांत लिहावें याबद्दल थोडा वेळ माझ्या मनांत उलटसुलट विचारांनीं गोंधळ माजवला. या पुस्तकांत हिमालयीन गिर्यारोहणांतील संपूर्ण फरेंच कामगिरी घ्यावी; कीं हिमालयाच्या ज्या शिखरांवर फरेंच गिर्यारोहकांनीं विजय मिळविला त्याच शिखरांवरील मोहिमांचा वृत्तांत लिहावा; कीं आपापल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या प्रत्येक शिखराची गिर्यारोहण-कथा वेगवेगळ्या पुस्तकांत ग्रथित करावी असे मुख्य तीन पर्याय मजपुढें होते. पैकीं पहिल्या पर्यायानुसार लिहिलेलें पुस्तक बरेंच विस्कळित झालें असतें; कारण हिमालयाच्या अहिरावण महिरावण-स्वरूपी

शिखरांशिवाय इतर लहान लहान राक्षसांवर केलेल्या यशस्वी-अयशस्वी चढायांची जंत्रीहि या पुस्तकांत आली असती. त्यामुळें कांहीं फायद्याच्या गोष्टीहि अर्थातच साध्य झाल्या असत्या. एकतर हिमालय आणि फ्रेंच गिर्यारोहक यांच्या परस्परसंबंधाचा इतिहास संपूर्णपणें या पुस्तकांतून हाताळला गेला असता आणि दुसरी गोष्ट म्हणजे नांव घेण्यासारखी एकमेव हिमालय-महिला-गिर्यारोहक मादाम क्लॉड कोगन हिच्या रोमहर्षक कामगिरीचा परामर्ष या पुस्तकाच्या निमित्तानें घेतां आला असता. स्त्री गिर्यारोहकांची चमू घेऊन चो ओयु शिखरावर चढाई करीत असतां हिमालयाच्या हिमशीतल कुशींत चिरनिद्रेचें हौतात्म्य लाभलेल्या मादाम कोगन यांच्या कामगिरीची ओळख करून घेण्याच्या संधीस मुकणें म्हणजे हिमालयांतील फ्रेंच गिर्यारोहणाच्या राजघाटावर पुष्पमाला न ठेवतां उद्दामपणें त्यांच्या प्रदेशांत भटकण्यासारखें होईल. म्हणून प्रतीकात्मकतेनें मी सदर ग्रंथ या स्त्री गिर्यारोहिकेला समर्पित केला आहे.

बरें, माझ्या मनांतील तिसरा पर्याय मान्य करावयाचा झाल्यास प्रत्येक शिखरावरील कामगिरीसाठीं एकेक पुस्तक मीं लिहावयास घेतलें तरी मराठी पुस्तक प्रकाशनाच्या पीठिकेकडे लक्ष देतां गिर्यारोहणावरील इतकीं पुस्तकें प्रकाशक-मुद्रकांच्या संस्कारांतून मूर्त स्वरूपांत येतील किंवा नाहीं आणि चुकून एखाद्या प्रकाशकानें जिद्दीनें हीं पुस्तकें पुस्तकभांडाराच्या उंबरठ्यांत आणलींच तर किती मराठी वाचक त्या पुस्तकांकडे वळतील ही शंका दुर्दैवानें माझ्या मनांत पिशाच्चरूप धारण करूं लागते. एकेका शिखरावरील चढायांवर पांचपंचवीस पुस्तकांचा संभार प्रकाशित करणाऱ्या पाश्चिमात्य भाषांची समृद्धी मराठी भाषेला लाभली असती तर...निदान तालुका-जिल्ह्यांच्या गांवीं भरपूर पुस्तकें असलेलीं अद्ययावत् वाचनालयें संदर्भ-ग्रंथांसाठीं उपलब्ध झालीं असतीं... आणि या अडचणीमुळेंहि आज महाराष्ट्राच्या कोपऱ्यांत बसून एका विषयावर अभ्यासपूर्वक पुस्तक लिहिणें अतिशय कठीण काम झालें आहे.

या सर्व दृष्टीनें सुवर्णमध्य साधून हाताच्या बोटांवर मोजण्यासारखीं जीं हिमालय-शिखरें आहेत, त्यांत मोडणाऱ्या फ्रेंच-पादाक्रांत शिखरांच्या मोहिमांचा इतिहास प्रस्तुत पुस्तकांत ग्रथित करावा असें मीं ठरविलें आहे.

आणि त्यामुळेंच या पुस्तकाचें शीर्षक 'गगन-चुंबन : हिमालय गिर्यारोहणांतील तीन फ्रेंच सर्ग' असें ठरवून त्यांत अन्नपूर्णा, नंदादेवी आणि मकालू या तीनच शिखरांवरील विजयाची कथा लिहिली आहे.

● ● ●

हिमालयीन गिर्यारोहण किंबहुना कुठलेंहि गिर्यारोहण जेव्हां लेखन-विषय म्हणून हाताळलें जातें तेव्हां कांहीं मुद्यांवर अपरिहार्यपणें लेखन करावें लागतें. त्यांतील दोन महत्त्वाचे मुद्दे म्हणजे गिर्यारोहणाचें मानसशास्त्र व गिर्यारोहणाचा स्थूल इतिहास. माझ्या या पुस्तकांत जेथें अगदींच आवश्यक वाटलें तेथें मीं गिर्यारोहकांच्या कांहीं गुणांचा ओझरता उल्लेख केला आहे. परंतु सर्वसाधारणपणें या दोन मुद्यांचें विवेचन मीं या पुस्तकांत टाळलें आहे. या मुद्यांबाबत मीं माझ्या 'आकाशाला गवसणी' आणि 'विश्वाच्या कळसावर' या दोन पुस्तकांत बरेंच सविस्तर लिहिलें आहे. शिवाय या मुद्यांच्या अनुल्लेखानें प्रस्तुत पुस्तकाला कुठलाहि उणेपणा येईल असें मला वाटत नाहीं.

भारतीय गिर्यारोहकांच्या चमूंनीं गेल्या दहा वर्षांत हिमालयाच्या कांहीं शिखरांवर चढाया केल्या आहेत व पंचशूली, कामेत अशीं शिखरें काबीजहि केलीं आहेत. सुमारें दोन वर्षांपूर्वी भारतीय गिर्यारोहक मेजर जयाल यांना हिमालयाच्या पायथ्याशीं गिर्यारोहणाच्या खटपटींत न्युमोनियानें मृत्यु आला आहे. तेनसिंग नोर्के यांचें नांव हिमालय गिर्यारोहणांत कायमचें अजरामर झालें आहे आणि आतां तर ब्रिगेडियर ज्ञानसिंहांची चमू प्रत्यक्ष शैल राधानाथावर राष्ट्रपताका फडकविण्यासाठीं झटत आहे. आतां अधिकाधिक भारतीय तरुण हिमालयाशीं झुंज घेण्यास पुढें सरसावत आहेत. या सर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'गिर्यारोहण कां करावयाचें ?' या सनातन प्रश्नाचें अस्तित्व जाणवेनासें झालें आहे. या प्रश्नावर तात्त्विक काथ्याकूट करीत बसण्याचें निष्क्रिय आळसटलेलें जीवन मागें टाकून आम्ही पुढें पुढें चाललों आहोंत यांतच आमच्या राष्ट्रीय जिवंतपणाचे अंकुर आहेत. मावळचे किल्ले पहात पायपीट करणारे 'मरहट्टे' कुमार तेनसिंग–जयाल–ज्ञानसिंहांची पायवाट मळवून तिचा राजमार्ग करण्याच्या कार्यांत इतर भारतीयांपेक्षां तसूभरहि मागें राहाणार नाहींत. आणि हीं सारीं

तरुण भारताचीं पावलें दमदारपणें थंडी, वारा, हिम, हिमजबडे नि कपारी यांचें आव्हान स्वीकारीत पुढें रेटूं लागलीं म्हणजे त्या पदन्यासांतून आपोआपच संचलनगीत ( Marching song ) शब्दमय होणार आहे :

आगे बढते हम् चले भारतीय एकसाथ
" स्वतन्त्रता अमर रहे ! "—सज हैं हमारे हाथ
सिंधु सिंधु वंग सिंधु भारत एकराष्ट्र है
सेतु से हिमालयतक भारत एकराष्ट्र है
भारतीय एकराष्ट्र पक्की है ये दिलमें बात
आगे बढते हम् चले भारतीय एकसाथ !

ख्याल है हमें पुरा गांधार हमारा था
हम् न भूल जाएँगे द्रुपद-देश हमारा था
मगध राष्ट्र गूंज उठा, " भारतीय विश्वनाथ ! "
आगे बढते हम चले भारतीय एकसाथ !

विद्युत्नगर
१४ एप्रिल १९६०

—श्रीकान्त राय

## पुस्ती

भारतीय गिर्यारोहकांची चमू १९६० च्या वसन्तांत शैल राधानाथाच्या बालेकिल्ल्यावर धडक मारून परत आली. कॅप्टन नरेन्द्रकुमार यांची तुकडी २५ एप्रिल रोजीं शैल राधानाथाच्या माथ्यापासून सुमारें ७०० फूट खालीं असतांना परत फिरली; हवामानानें अखेरच्या क्षणीं आपला डाव साधला ! १९६२ सालीं भारतीय गिर्यारोहकांची दुसरी मोहीम शैल राधानाथाकडे रवाना होणार आहे. गेल्या २५ नोव्हेंबरला खडकी येथील लष्करी स्थापत्य महाविद्यालयांत ब्रिगेडियर ज्ञानसिंह यांचें भाषण ऐकण्याची सुसंधि मला लाभली. त्यांनीं या भाषणांत केलेलें आवाहन मी मराठी कुमारांपर्यंत नेऊन पोहोंचवूं इच्छितों. भाषणाचा समारोप करतांना ब्रिगेडियर ज्ञानसिंह म्हणाले, " आजतागायत शतकानुशतकें आणि पिढ्यान्‌पिढ्या हे हिमालय पर्वत आमचें रक्षण करीत आले आहेत; आतां या पर्वतांचें रक्षण करण्याची आमची पाळी आहे. या आमच्या कर्तव्याला आम्ही जागणार आहोंत काय ? "


आणि या आवाहनाला ओ द्यावयाची असेल तर आतां गिर्यारोहणासाठीं लागणारी दृढेच्छा ( Will ) आणि ताठर कणा ( Guts ) जोपासण्यासाठीं अधिकाधिक तरुणांनीं गिर्यारोहणाकडे आपलीं पावलें वळवावयास हवींत.

**‘ उंच हिमालय तुमचा अमुचा**
**माझा अपुला सह्यकडा ’...**


हें गीत गाणाऱ्या मराठी युवकांनीं मावळच्या कडेकपारीपासून सुरुवात केली तर तीं मराठी मनगटें हिमालयाच्या शिखराशिखरावर भारतीय राष्ट्रध्वज फडकविल्याखेरीज राहणार नाहींत.

विद्युत्‌नगर,
२१ डिसेंबर १९६०

—श्रीकान्त राय





अन्नपूर्णा परिसर




धवलगिरी परिसर


[ संदर्भ : पृष्ठ १ पाहा. ]





[ संदर्भ : पृष्ठ ३० पहा. ]

अन्नपूर्णा शिखरावरील
यशस्वी चढाईचा मार्ग
चौथ्या तळा-पासून शिखरा-पर्यंत

+ मोठा हिम अवडा




[ संदर्भ : पृष्ठ ७२–७३ पाहा. ]




झोल मकालू मोहीम १९५५

---- मोहिमेचा मार्ग

पायतळ १५४२० फूट

मोहिमेचे तळ

तळ-१ = १७३९०'  तळ-३ = २१०००'  तळ-५ = २४३१०'

तळ-२ = ११०००  तळ-४ = २३०००'  तळ-६ = २५६००'

[ संदर्भ : पृष्ठ ९५ पाहा. ]



कुमार साहित्य मालेंतील हें सत्तरावें पुस्तक प्रसिद्ध करीत असतांना आम्हांला अर्थातच आनंद होत आहे. आमच्या या उद्योगांत ज्या कांहीं अगदीं थोड्या अभ्यासू व मेहनती लेखकांचें सहकार्य आम्हांला लाभत आलें आहे त्यांत श्री. 'श्रीकान्त राय' यांचा उल्लेख आवर्जून करावयाला हवा. भारतीय-महाराष्ट्रीय कुमारांच्या हातीं उत्कृष्ट, वेंचक, स्फूर्तिप्रद नि उद्बोधक साहित्य भरपूर द्यावें अशी तळमळ आमच्याइतकीच यांनाहि आहे. आणि या सहकार्याच्या भावनेनेंच त्यांनीं अपार कष्ट घेऊन, खूप अभ्यास करून जमविलेलें साहित्य या मालेसाठीं उपलब्ध करून दिलें आहे.

'विश्वाच्या कळसावर' व 'दक्षिण ध्रुवाचीं क्षितिजें' हीं स्वतंत्र आणि 'कोनटिकी' हें अनुवादित अशीं त्यांचीं तीन पुस्तकें या मालेंतून यापूर्वींच प्रकाशित झालीं. त्यांपैकीं पहिल्या दोन पुस्तकांना सरकारी पारितोषिकाचा बहुमानहि प्राप्त झाला. 'आकाशाला गवसणी' हें त्यांचें निबंधात्मक पुस्तक या मालेंतून अलीकडेच प्रसिद्ध झालें; आणि आतां हें 'गगनचुंबन' प्रकाशित होत आहे.

अत्यंत मेहनतीनें लिहिलेल्या आणि प्रत्येक कुमारानें व कुमारीनेंहि वाचावयास हवींतच अशा या पुस्तकांकडे शिक्षक-पालकांचें लक्ष अजूनहि जावें तितकें जात नाहीं, असें मोठ्या खेदपूर्वक येथें नमूद करावें लागतें. खरें म्हणजे हीं पुस्तकें कुमारांइतकींच शिक्षक-पालकांनाहि वाचनीय आहेत. त्यांनीं स्वतः वाचून तीं आग्रहपूर्वक मुलांच्या हातीं द्यावीं अशी अपेक्षा आहे.

— प्रकाशक

- अन्नपूर्णा
- पूर्व नन्दादेवी
- शैल मकालू

## अन्नपूर्णा सर्ग

नेता : मॉरिस हेर्झोग

आरोग्याधिकारी : जाकिज औडो

छायाचित्रकार : मार्सेल इशाक्


संपर्काधिकारी : फ्रांसिस द नॉइली

गिर्यारोहक : सर्वश्री जीन कौझी, मार्सेल शात्झ्, लुइ लाचेनल, लिओनेल तेरे, गॅस्ट्राँ रेबूफा

भारवाहक : सर्वश्री फुथार्के, पणसी, सरकी, अंगथार्के (प्रमुख), अजिबा, ऐला, आंगदावा, दावा थोंडुप.



जिच्या हिमालयांतील हौतात्म्यास
हे तीन फ्रेंच सर्ग अर्पण केले
ती फ्रेंच गिर्यारोहिका
मादाम क्लाउड् कोगन
( 'मोहिमा-चिटणीस' मायकेलिन् मोरिन् यांच्या सौजन्यानें )



**अन्नपूर्णा मोहिमेंतील सदस्य नि शेर्पा**

डावीकडून उजवीकडे अनुक्रमें :

**वसलेले** : रेबूफा, इशाक्, फ्रुथार्के, आंगथार्के, आगदावा.

**उभे** : लाचानेल, कौंझी, शाट्झ्, ओंडो, तेरे, हझोंग, नॉइली, पणसी, सरकी, अजीबा, ऐला, दावा थोंडुप.

[ संदर्भ : पृष्ठ २ पाहा. ]

(फेडरेशन् फ्रांसे द ला मोटान या फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सोजन्यानें)



अन्नपूर्णा : तळ पहिला व बर्फाचा कडा

[ संदर्भ : पृष्ठ १६ पाहा. ]

( फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सौजन्याने )



अन्नपूर्णा : श्री. मॉरिस् हेर्झॉग वायव्य चढण चढून जात आहेत.

[ संदर्भ : पृष्ठ २४–२५ पाहा. ]

( फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सौजन्यानें )



**नंदादेवी : तंबूंतील चहापान**

डावीकडून : कॅप्टन् ( नंतर मेजर ) नंदू जयाल, रोजर ड्युप्ला

आणि लुइ पायाँ

**[ संदर्भ : पृष्ठ ६२ पाहा. ]**

( श्री लांगुपिन् यांच्या सौजन्यानें )



मकालू : बर्फाची झालर

[ संदर्भ : पृष्ठ ७७ पाहा. ]

( फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सौजन्यानें )



शिखर मकालू (II) : २

[ संदर्भ : पृष्ठ ८३ पाहा. ]

( फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सौजन्यानें )



**शैल मकालू**

[ संदर्भ : पृष्ठ ९४ पाहा. ]

(फ्रेंच गिर्यारोहण संस्थेच्या सौजन्यानें )

2८९

प्रकरण पहिलें

# धवलगिरी — अन्नपूर्णा शिखरांकडे

पहिल्या महायुद्धानंतर फ्रेंच गिर्यारोहकांनीं आल्प्स् पर्वतांत एकामागोमाग पराक्रम गाजवले. द् लेपिने, लार्गांडे द् सेगाँ, व्हेर्ने, शार्ले, आदि गिर्यारोहकांचीं नांवें आल्प्स् गिर्यारोहणाशीं निगडित झालीं. द् सेगाँ यांनीं हिमालयांतील 'लुप्त शिखरावर' (Hidden Peak) स्वारी केली; परंतु वाईट हवेपुढें टिकाव न लागल्यामुळें या मोहिमेला या २६४७० फूट शिखरावर २३००० फूट उंची गाठण्यापूर्वींच माघार घ्यावी लागली. पहिलें महायुद्ध व दुसरें महायुद्ध यांमधील कालावधींत जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील गिर्यारोहकांनीं राष्ट्रीय चमूंच्या स्वरूपांत एकेका हिमालय शिखरापुढें दंड थोपटून शेंडीपारंबीचे विडे उचलले होते. ब्रिटिश चमू शैल राधानाथाशीं निगडित झाली होती तर जर्मन व ऑस्ट्रियनांनीं नंगा पर्वताशीं झोंबाझोंब चालविली होती. के–२ ऊर्फ गॉडविन् ऑस्टिन शिखर अमेरिकनांचें लक्ष्य बनलें होतें. याशिवाय कांचनगंगा, नंदादेवी, कामेत, त्रिशुळ अशा लहान-मोठ्या शिखरांवर वेळोवेळीं या राष्ट्रांच्या चमूंच्या चढाया होत होत्या. परंतु द् सेगाँच्या चमूचा प्रयत्न सोडल्यास फ्रेंच गिर्यारोहकांचें खास असें लक्ष्य हिमालयाच्या शिखरांवर केंद्रित झालें नव्हतें.

१९४८ सालीं फ्रेंच हिमालय समितीची पुनर्निर्मिति झाली आणि दुसऱ्या महायुद्धामुळें एका पिढीला नाकारली गेलेली हिमालय-गिर्यारोहणाची संधी निदान तरुण पिढीला मिळावी म्हणून या समितीनें आपलें कार्य सुरू केलें. याच वेळीं तिबेट सरकारनें श्वेतवर्णियांना तिबेटचे दरवाजे बंद केले होते व नेपाळ सरकार ब्रिटिश गिर्यारोहकांच्या प्रवेशअर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करीत होतें. त्यामुळें फ्रेंच गिर्यारोहकांना शैल राधानाथावर गिर्यारोहणाचा प्रयत्न करण्याची संधी मिळण्याची शक्यता नव्हती. अर्थातच त्यांना दुसरें एखादें उत्तुंग शिखर आपल्या पराक्रमासाठीं मुक्रर करणें आवश्यक होतें. त्यांनीं धवलगिरी अगर अन्नपूर्णा सर करण्यासाठीं कंबर बांधावयाचा निर्णय घेतला. या दोन्ही शिखरांचें परिसर गिर्यारोहकांना अद्यापि

अज्ञात होतें. त्यामुळें १९५० च्या मॉरिस हेझोंग यांच्या मोहिमेनें या दोन शिखरांपैकी कोणतेंच नक्की लक्ष्य न ठरवतां या शिखरांच्या परिसराकडे वाटचाल करण्याचें ठरविलें आणि त्यापैकीं तत्कालीन परिस्थितींत जें शक्य वाटेल त्या शिखरावर चढाई करण्याचें मुक्रर केलें. १९३४ सालीं फ्रेंच गिर्यारोहकांनीं मकालू शिखरावर स्वारी करून राधानाथाच्या पाठच्या भावंडाचा पाडाव करण्याची योजना आखली होती, परंतु तिबेटी मुलुखांत प्रवेश मिळविण्याची शक्यता नसल्यानें त्यांना ती कल्पना गुंडाळून ठेवावी लागली.

मॉरिस हेझोंग यांच्या चमूंत एकूण नऊ सदस्यांचा समावेश करण्यांत आला होता. यांपैकीं जीन कौझी हा २७ वर्षे वयाचा गिर्यारोहक वयानें सर्वांत लहान होता. तो एक हवाईयंत्री (aeronautical engineer) होता व त्याचें खरें पाहातां नुकतेंच लग्न झालें होतें. परंतु हिमालय-गिर्यारोहणाच्या ओढीनें त्यानें आपली नवोढा वधू मागे ठेवून हिमालयाकडे पावलें वळवलीं. साधारणपणें कौझी यांचा सहकारी म्हणून गिर्यारोहण करणारा मार्सेल शाट्झ् हा २९ वर्षे वयाचा गिर्यारोहकहि या चमूंत होता. हौशी गिर्यारोहकाच्या भूमिकेंत प्रारंभ करून गिर्यारोहणाच्या राष्ट्रीय शाळेंत—प्रशिक्षकाचें काम करण्यापर्यंत मजल मारलेला लुइ लाचेनलहि या चमूंत होता. लिओनेल तेरे हा त्याचा जोडीदार या चमूंतून कसा वगळला जाईल ? लाचेनल—तेरे या दुकलीची गिर्यारोहण क्षेत्रांत ‘ बाष्प-यंत्रें ’ म्हणून ख्याति होती. या दोघांत आणखीहि एक ‘ गुण ’ साधारण होता आणि तो म्हणजे त्यांची अतिशयोक्त विधानें करण्याची लकब ! गॅस्ट्राँ रेबूफा हा डोंगरसपाटीवर जन्मलेला गिर्यारोहक, मार्सेल इशाक् हा गिर्यारोहक छायाचित्रकार, जाकिज औडो हा शस्त्रवैद्य आणि दिल्ली येथील फ्रेंच वकीलातींतील एक अधिकारी फ्रांसिस् द् नॉइली ही सर्व मंडळी या मोहिमेंत भाग घेण्यासाठी निवडली गेली होती. इंग्रजी, हिंदुस्थानी, गुरखाली व तिबेटी इतक्या भाषा येत असल्यामुळे नॉइली यांना मुद्दाम मोहिमेचा संपर्क अधिकारी म्हणून घेतलें गेलें होतें. या अधिकाऱ्यानें प्रा. राहाउल यांच्या मदतीनें दार्जिलिंग येथें फुथार्के, पणसी, सरकी, अंगथार्के, अजिबा, अैला, आंगदावा व दावाथोंडुप या शेर्पा भारवाहकांची निवड केली होती.

या मोहिमेच्या सदस्यांना हिमालयीन गिर्यारोहणाची ओढ याखेरीज

दुसरा कुठलाहि स्वार्थ नव्हता. चढाईवरून परत आल्यावर चढाईमुळें कांहीं उत्पन्न झाल्यास त्यांतील पै न् पै नंतरच्या मोहिमांसाठीं खर्च करावयाची असें ठरलें होतें त्यामुळें या गिर्यारोहकांना पैशाचेंहि आमिष नव्हतें. केवळ हिमालयाचें एखादें उत्तुंग शिखर हस्तगत करण्याच्या ध्येयवादी प्रेरणेनेंच हे भिन्न भिन्न स्वभावाचे गिर्यारोहक एकत्र आले होते.

हेर्झोग व शाट्झ् या गिर्यारोहणासाठीं लागणाऱ्या साधनसामग्रीची जुळवाजुळव करीत होते. चमूंतील सदस्यांना पीतज्वर, पटकी, देवी आदि रोगांच्या प्रतिबंधासाठीं लस टोचली जात होती. आणि त्याचवेळीं फ्रेंच हिमालय समितीनें हेर्झोग-मोहिमेचें उद्दिष्ट निश्चित केलें होतें :

" आपल्या आकारामुळें पृथ्वीचा तिसरा ध्रुव म्हणून सार्थता पावलेल्या हिमालयाच्या २६००० फुटांहून उंच शिखरांवर विजय मिळविण्यासाटीं आजपर्यंत निरनिराळ्या राष्ट्रांच्या बावीस मोहिमा झाल्या. परंतु त्यांपैकीं एकीलाहि यश मिळालें नाहीं. ही पार्श्वभूमी लक्षांत घेऊन या मोहिमेचीं उद्दिष्टें मुक्रर करण्यांत येत आहेत. धवलगिरी ( २६७९५ फूट ) किंवा अन्नपूर्णा ( २६४९३ फूट ) हीं नेपाळच्या भूमीवर वसलेलीं शिखरें —हीं असाध्यच ठरल्यास कमीपणा मानण्याचें कारण नाहीं—निदान दुसरीं लहान शिखरें पादाक्रान्त करावींत. जवळची सहा टन सामग्री घेऊन मोहिमेस भारतीय सीमा ओलांडून नेपाळच्या अज्ञात प्रदेशांत वसलेलें ' तुकुचा ' गाठतां आलें पाहिजे. या मुक्कामास पोहोंचण्याचे मार्ग नकाशावरहि अज्ञात आहेत. त्यामुळें तुकुचा इथें पोहोंचतांच या दोन शिखरांच्या परिसराची पाहणी करण्याचें काम हातीं घ्यावें व या प्रदेशाबद्दल पुरेशी माहिती मिळवून चढाईचा आराखडा तयार केल्यावर या मोहिमेस शिखर काबीज करण्याचा प्रयत्न करतां येईल या मोहिमेंत वैद्यकीय, भूप्रस्तरविषयक, हवामानशास्त्रविषयक, भौगोलिक आणि वंशशास्त्रासंबंधीचें संशोधन करावें..."

मोहिमेचीं हीं खडतर उद्दिष्टें साध्य व्हावींत म्हणून समितीचे अध्यक्ष श्री. डेव्हिज यांनीं उठून एकेका गिर्यारोहकाला शपथ घ्यावयास लावली कीं ' मी माझा सन्मान पणाला लावून शपथ घेतों कीं मोहिमेच्या नेत्याची मोहिमेबाबतची प्रत्येक आज्ञा मी शिरसावंद्य मानीन.'

● ● ●

सर्व प्रास्ताविक तयारी आटोपल्यावर संपूर्ण चमू आपल्या चंबूगवाळ्यासकट विमानानें दिल्ली येथें येऊन पोहोंचली. अवजड साहित्य रेल्वेनें आणण्याची कामगिरी रेबूफा आणि तेरे यांच्यावर सोंपवून बाकी मंडळी विमानाने लखनौला रवाना झाली. येथें आंगदावा व आंगथार्के हे दोन शेर्पा मोहिमेंत सामील झाले उरलेली शेर्पामंडळी नेपाळच्या सीमेजवळील छोटया लाईनवरील अखेरचें स्टेशन नौतनवा येथें येऊन मिळाली. या सर्व शेर्पांचा प्रमुख आंगथार्के हा होता. एप्रिल ५ रोजीं मोहिमेनें नेपाळमध्यें प्रवेश केला. जीप गाडींतून चमू कपिलवस्तु मार्गानें बुट्वाल येथें पोहोंचली. येथून नेपाळच्या महाराजांच्या आदेशानुसार श्री. राणा हा अधिकारी मोहिमेबरोबर जाऊं लागला. दहा तारखेस मोहीम नानसिंग गांवीं पोहोंचली. तीन दिवस ओझ्यांची फेरवांटणी करण्यांत घालविल्यावर चमूच्या दोन तुकड्या करण्यांत आल्या व त्या उद्दिष्टांच्या दिशेनें वाटचाल करूं लागल्या. त्या दिवशीं शेर्पा भारवाहकांनीं संप पुकारला. भाषेच्या अडचणीमुळें संपाचीं संपूर्ण कारणें समजावून घेणें जवळजवळ अशक्य होतें त्यामुळें ही डोकेंदुखी श्री. राणा यांच्यावर सोंपविण्यांत आली. आणि त्यानें आधकारवाणीनें वक्तव्य करून व थोडी कडक उपाययोजना करून परिस्थिति काबूंत आणली. सोळा तारखेस चमू बागलुंग येथें पोहोंचली.

सतरा तारखेस सकाळीं नॉइली यांनीं पहांटेच समोर धवलगिरी शिखर उभें ठाकलेलें पाहिलें व लागलीच सर्व मोहीम खडबडून जागी झाली स्तंभित होऊन डोळ्यांनीं धवलगिरीचें प्रथम दर्शन पिऊं लागली. तेवढ्यांत मोजमापें घेत असलेल्या इशाकनें दोन दिवसांत अन्नपूर्णा दर्शन होणार असल्याचें भाकित वर्तविलें. परंतु खरें पाहातां त्यांच्यासमोरील शिखर धवलगिरी नव्हतेंच !

प्रत्यक्ष वाटचालींत चमूच्या असें लक्षांत आलें कीं त्यांच्याजवळ असलेला नकाशा बऱ्याच ठिकाणीं चुकीचा होता. मायंदीखोरें, मिरिस्तीखोरें अशा प्रदेशांतून मंडळी कृष्णा गंडकी नदीवर येऊन पोहोंचली. घासा येथें ते समुद्रसपाटीपासून ६५०० फूट उंचीवर होते आणखी १६०० फूट चढून गेले कीं ते आपल्या तुकुचा या मुक्कामावर पोहोंचणार होते. या विभागांत सतत धुळीचीं वादळें धुडगूस घालीत होतीं. होतां होतां लेटे,

लार्जुंग हीं खेडीं मागें टाकीत २१ एप्रिल रोजीं मोहीम तुकुचा येथें पोहोंचली. अठ्ठेचाळीस तासांच्या धडपडीनंतर तुकुचा येथें मोहिमेची मुख्य छावणी सज्ज झाली.

तुकुचाच्या पश्चिमेस धवलगिरी खडा ठाकला होता आणि पूर्वेस दुर्भेद्य नीलगिरीच्या पल्याड अन्नपूर्णेचा पहारा उभा होता. दुसऱ्या दिवशीं कौझींनें १३००० फूट उंचीवरून आपल्या पाहाणीच्या कामाला प्रारंभ केला. त्याचें मॉरिस हेर्झोगशीं झालेलें बिनतारी संभाषण धवलगिरीवरील चढाईबद्दल फारसें आशादायक नव्हतें. धवलगिरीचा पवित्रा मनावर ठसण्याइतका राजस होता परंतु आग्नेय कड्याकडे पाहिलें कीं हिममनोऱ्यांच्या दर्शनानें हृदयांत धडकी भरत होती. उत्तर श्रेणी बरीच उतरती होती व ती चढून जाणें फार कठिण जाईल हें उघड होतें. ती संपूर्णपणें हिमाच्छादित होती व या पर्वतश्रेणीवर पोहोंचायचें कसें हाच मुख्य प्रश्न होता. या श्रेणीकडे जावयाचा एकमेव मार्ग असलेली पूर्व हिमनदी भलतीच तुटक होती. उत्तर कण्याचा विचार करावा तों हिममनोऱ्यांनीं विखुरलेलीं भिताडें संकटांची सूचना देत होतीं. "या शिखराची चौफेर पाहाणी करावयाची म्हणजे दोन दोनच्या जोड्यांनीं लागलीच कामास लागावयास हवें," हेर्झोग यांनीं सुचविलें. अन्नपूर्णा शिखराजवळून २०००० फूट उंचीवर एक खिंड असल्यामुळें हें शिखर सर करणें अधिक सोपें जाईल असें कांहींचें मत पडलें.

२४ एप्रिलला प्रदेशाच्या पाहाणीच्या कामाला प्रारंभ झाला. लॅचेनल व रेबूफा यांनीं पूर्व हिमनदीची पाहाणी करावी. औडो नि शाट्झ् यांनीं घोडे घेऊन लेटे खेड्याकडे जावें व तिलिचो खिंड आणि अन्नपूर्णा शिखरांचें अवलोकन करून यावें. इशाक् आणि हेर्झोग यांनीं 'कोपर दरी' च्या वर दंबुश खोऱ्यापर्यंत मजल मारण्याचा प्रयत्न करावा आणि शक्य झाल्यास धवलगिरीचा उत्तर कणा पाहावा असें ठरलें. तेरे यांस पोटदुखीचा त्रास सुरू झाल्यानें छावणींतच राहावें लागलें. शिवाय कौझी व नॉइली यांना छावणीची व्यवस्था लावण्याचें काम देण्यांत आलें.

पुन्हा २६ एप्रिल रोजीं कौझी, औडो आणि शाट्झ् मिरिस्ती दरींतून अन्नपूर्णेचा मार्ग शोधण्यास रवाना झाले व इशाक्, तेरे आणि हेर्झोग

धवलगिरीच्या उत्तर कण्याबाबत माहिती मिळवण्यासाठीं दंबुश खोप्याकडे निघाले. दुपारीं उष्णतेमुळे हिम वितळून त्याचें इतकें पाणी झालें कीं, फ्रेंच गिर्यारोहकांना आपल्या घसरपट्ट्या (skis) वापरणें भाग पडलें आणि शेर्पा लोक तर कंबरभर हिमचिखलांत रुतले व त्यांना चढाईचें दिव्य पार पाडणें खडतर वाटूं लागलें. संध्याकाळीं पांचनंतर अंगथार्के खेरीजकरून इतर शेर्पा खालीं परतले व उरलेल्या मंडळींनीं उंचीवरची पहिली रात्र काढण्याच्या तयारीनें तंबू ठोकले! दुसऱ्या दिवशीं तेरेनें इतरांबरोबर मोठ्या शर्थीनें पठार गांठलें. तो आपल्या आजारपणांतून पूर्ण बरा झाला नव्हता. त्याच्या सुखरूपतेच्या दृष्टीनें त्याला परत पहिल्या तळावर पाठविणें अधिक योग्य होतें. दुसरा तळ ठोकल्यावर अंगथार्केनेंहि परत फिरून तेरेला सोबत करावी असें ठरलें. तिसऱ्या दिवशीं एक तास चढून गेल्यावर इशाक् नि हेझोंग खिंडींत पोहोंचले. आदल्या दिवशीं त्यांना उंचीमुळें डोकेंदुखीचा त्रास झाला होता. सर्वांनाच उंचीवरील हवामानाचा सराव होण्याची केवढी आवश्यकता आहे ही गोष्ट प्रथमच त्यांना जाणवली. हिम आणि वारा यांच्या शरिराला भिनणाऱ्या शीततेनें त्यांचें स्वागत केलें. त्या दोघांनींहि आपले वातरोधक कपडे चढवले. नकाशावर न दाखवलेल्या एका दरीच्या तोंडाशीं ते पोहोंचले होते. अजून धवलगिरीचा पत्ताच नव्हता. इशाक्नें त्या दरीला 'लुप्त दरी' असें नांव दिलें. धवलगिरीचा उत्तर कणा दिसण्यासाठीं डाव्या अंगानें या दरीच्या पार दुसऱ्या टोंकास जाणें भाग होतें. पण उशीर झाला होता व आणखी तळ ठोकण्यासाठीं साहित्यहि जवळ नव्हतें. तुकुचा शिखराच्या दुसऱ्या बाजूस नीलगिरीच्या पल्याड एक भव्य शिखर उभें ठाकलें होतें—तेंच शिखर अन्नपूर्णा! इशाक्नें झरझर त्या देखाव्याचें रेखाचित्रण केलें. थोडें घट्ट दूध (condensed milk) पिऊन ते परत फिरले. दोघांनाहि असह्य थकवा आला होता. निःस्तब्धपणें, यंत्रासारखे, जागेपणीं झोंपत झोंपत ते वाटचाल करीत होते. हेझोंग यांना दर दहा पावलागणिक हिमावर आडवें व्हावें लागत होतें. कसे तरी दुसऱ्या तळावर पोहोंचल्यावर, देवदूतासारख्या आलेल्या अंगथार्केच्या मदतीनें ते दोघे पहिल्या तळावर गेले व दुसऱ्या दिवशीं त्यांनीं पुन्हा तुकुचा गांठलें!

• • •

इकडे धवलगिरीची उत्तरेकडून पाहणी करून हेझ्रोंग यांची तुकडी तुकुचाला परतली तरी अन्नपूर्णेकडे गेलेले कौझी व शाट्झ् वसाहतीच्या छावणीवर परतले नव्हते. एप्रिल २७ रोजीं खोलगट प्रदेशापर्यंत जाऊन औडो मात्र परतला होता. त्याच्या मतें ही धडपड कष्टदायक असली तरी भारवाहकांच्या आवाक्यांतली होती. तेथून अन्नपूर्णा शिखराचें दर्शन घडत होतें आणि उंचीवरील कण्यापासून खालीं मिरिस्ती दरींत एक दरड उतरत असलेली दिसत होती. तथापि नकाशावर दाखवलेल्या तिलिचो खिंडीचा मात्र थांगपत्ताहि लागत नव्हता. कौझी व शाट्झ् पुढील अज्ञाताचा भेद करण्यासाठीं पुढें गेले होते.

आतां मुख्यत्वेंकरून तीन प्रमेयें सोडविण्याची आवश्यकता होती. एक म्हणजे धवलगिरीच्या उत्तर कण्याचा संपूर्ण शोध लावणें. दुसरें म्हणजे अन्नपूर्णेजवळ पोहोंचण्याचा मार्ग निश्चित करणें; पण हें प्रमेय हाताळण्यापूर्वी कौझी-शाट्झ् दुकलीच्या परतीची वाट पाहाणें जरूर होतें. तिसरें प्रमेय पूर्व हिमनदावर संचार करून धवलगिरीचा आग्नेय कणा अगर उत्तर कणा गांठण्याचा प्रयत्न करणें हें होतें. परंतु हिममनोरे आणि कोसळणारे हिमकडे यामुळें हें कार्यहि बिकट होतें. यांपैकीं पहिल्या व तिसऱ्या कामगिऱ्यांवर अनुक्रमें तेरे—औडो, हेझ्रोंग—रेबूफा—लाचानेल या तुकड्यांची योजना करण्यांत आली होती. दुसऱ्याच दिवशीं या तुकड्या आपल्या कामगिरीवर निघाल्या. त्यानंतर कौझी व शाट्झ् आपल्या कामगिरीवरून परतले. त्यांच्या कामाचें इतिवृत्त श्री. हेझ्रोंग यांना बिनतारी यंत्रानें सांगण्यांत आलें. या जोडगोळीनें दोन दिवसांच्या धडपडीनंतर मिरिस्ती खोऱ्याचें पात्र गांठलें होतें आणि खोरें पार करून ते अन्नपूर्णेच्या खालच्या कण्यावर पोहोंचले होते. परंतु तरीहि त्यांना तिलिचो खिंडीचा ठावठिकाणा सांपडला नव्हता.

दुसऱ्या दिवशीं नॉइली हेझ्रोंगच्या तुकडींत सामील होण्यासाठीं निघाला. हेझ्रोंगची तुकडी तीन शेर्पांसह हिमप्रपाताकडे निघाली होती. सभोंवार हिमजबडे आ वासून भक्ष्यासाठीं टपून बसले होते. राक्षसी हिममनोरे कोणत्याहि क्षणाला कोसळण्याच्या घातकी पवित्र्यांत उभे होते. हिमभेगा पार करण्यासाठीं ‘ हिमपूल ’ शोधून काढावे लागत होते. पायऱ्या

खोदीत खोदीत व कील पादत्राणांच्या मदतीनें त्या बर्फाळ पसाऱ्यांतून वर चढावें लागत होतें. भारवाहकांच्या पाठीवर चाळीस पौण्डी ओझीं होतीं. दुपारीं दोन वाजल्यानंतर हवा फारच बिघडली. हिममनोरे कोसळूं लागले, हिमपातास प्रारंभ झाला आणि तळ ठोकण्यास सोइस्कर जागा नाहीं अशा अवस्थेंत अर्धा अधिक हिमनद पार केल्यावर रात्रीचा निवारा घेणें भाग पडलें. पुन्हा दुसऱ्या दिवशीं सकाळीं चढाईला सुरुवात झाली. शेर्पांनाहि कील पादत्राणें वापरणें आवश्यक झालें होतें व सराव नसल्यानें त्यांची मंद प्रगति चालू होती. १६००० फुटानंतरची श्वसनाची अडचण सर्वांनाच जाणवूं लागली होती. मुख्य शिखरावरील चढाईपूर्वी सर्वांना १६००० ते २०००० फुटावरील हवामानांत रुळण्याची संधि मिळणें अगत्याचें आहे हें अधिक प्रकर्षानें जाणवत होतें. भर मध्यान्ह झाली तरी गांठावयाचें पठार ३०० फूट उंचीवर होतें. आणि दुपारीं दोननंतर हिमालयाचीं अस्त्रें व पिशाच्चें मोकळीं सुटतात हें सर्वांना ठाऊक होतें. परंतु हे ३०० फूट चढून जाण्यासाठीं मार्ग शोधणें तेवढें सोपें नव्हतें. पूर्व किनाऱ्यावरून मार्ग शोधीत असतां अत्यंत बिकट परिस्थितींत लाचानेल–रेबूफा यांची जोडी एका अजस्र हिमजबड्याजवळ येऊन ठेपली. हा हिमजबडा पार करून जाणें अशक्य होतें.

हिमपातास सुरुवात झाली होती. कोसळणाऱ्या कड्यांच्या गर्जनेनें सारी पोकळी निनादून उठली होती. हिमनद फिक्कट दिसत होता. अंधार पडूं लागला होता. परत फिरून दुसऱ्या किनाऱ्यानें मार्ग शोधण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. पण जीव वांचविण्यासाठीं नुसती माघार घेऊन चालणार नव्हतें तर तेथून पळ काढायला हवा होता. तेथून सुटका म्हणजे नर्कांच्या दरवाजांतून मुक्तताच होती. तेथून ते कसेबसे निसटतात न निसटतात तोंच हिमपाताबरोबरच धुक्यानें विश्व गुंडाळावयाचा चंग बांधला आणि पांच गज अंतरावरची वस्तूहि दिसेनाशी झाली. सुमारें पांच वाजतां या यमस्वप्नांतून बाहेर पडून मंडळी पायथ्याच्या तळावर पोहोंचली. नॉइली यांनीं त्यांच्यासाठीं लज्जतदार चहा तयारच ठेवला होता. ती मेची २ तारीख होती. मोसमी पर्जन्याला उणापुरा एक महिना राहिला होता. अजून धवलगिरीवर कोणत्या बाजूनें चढाई करावयाची याविषयीं कांहींच अंदाज करतां आला नव्हता. आग्नेय कण्याचे आधारकडे चढून जाण्याचा प्रयत्न अद्यापि बाकी होता.

दुसऱ्या दिवशीं लाचानेल व रेबूफा यांनीं या दिशेनें १८००० फूट उंची गाठण्याचा प्रयत्न करावा असें ठरलें. ही सफर घसरपट्ट्यांच्या मदतीनें करावयाची होती. हेर्झोग तुकुचाला परतणार होते. तेरे यांच्या अनुभवानुसार पूर्व हिमनदावरून धवलगिरी गांठणें कठीण होतें. धवलगिरीची रक्षक तटबंदी सर्व बाजूंनीं अभेद्य ठरत होती.

५ मे रोजीं कौझी आणि शाट्झ् यांनीं पूर्व हिमनदावर अखेरची धडक मारून पाहाणी करण्यासाठीं प्रस्थान ठेवलें. तुकुचा येथील तळावरून दुर्बिणीने पाहाणी करतांना हेर्झोग व इशाक् यांना १६००० फूट उंचीवर 'श्वेत शिखरा'वर फ्रेंच गिर्यारोहक पोहोंचल्याचें दिसलें. लाचानेल या शिखरावरून नुकताच खालीं उतरूं लागला होता.

रेबूफा आणि लाचानेल यांनीं परतल्यावर आपल्या निरीक्षणांचा अहवाल सादर केला. श्वेतशिखरावरून त्यांना दक्षिण कडेचें दर्शन झालें होतें. ही कडा सरळ वर गेली होती आणि ती चढून जाण्यास कठीण होती. शिखर चढून जाण्याच्या दृष्टीनें तिचा विचार न करणेंच बरें असें त्यांचें मत पडलें. कौझी आणि शाट्झ् यांनींहि दिलेल्या अहवालानुसार धवलगिरीची चढण अतिशय कठीण होती व साक्षात् सहस्रमुखी मृत्यूच्या वखवखलेल्या जबड्यांसारख्या पसरलेल्या हिमभेगा पार करून धवलगिरीची चढण गांठणेंहि अशक्य होतें. त्यामुळें धवलगिरीचा विचार सोडून तिलिचो खिंडींतून अन्नपूर्णेकडे रोख वळविण्याचें सर्वानुमतें ठरविण्यांत आलें. याचवेळीं बागलुंगहून आलेल्या बुद्ध लामानें इशाक्च्या प्रश्नावर चिंतन करून या मोहिमेला धवलगिरीवर जय मिळणें अशक्य असल्याचें मत व्यक्त केलें व त्यांना मुक्तिनाथ शिखराकडे मोर्चा वळविण्याचा सल्ला दिला.

"अन्नपूर्णेकडे !" हा एकच विचार सर्वांच्या मनांत होता. कौझी–औडो–शाट्झ् यांच्या अन्नपूर्णा पाहाणीचा पर्याय बाजूस सारून सरळ तिलिचो खिंडीकडे जावें–वेळ पडल्यास मानांगभोत दरी गाठावी – परंतु अन्नपूर्णा शिखराच्या उत्तरेकडूनच शिखरावर स्वारी करावी असें ठाम मत हेर्झोग यांनीं व्यक्तविलें.

★ ★ ★

प्रकरण दुसरें :

# अन्नपूर्णेच्या परिसरांत

फुथार्केला राहाण्याचा बंदोबस्त करण्यासाठीं पुढें पाठवून आठ दिवसांच्या शिधासामुग्रीनिशीं गिर्यारोहक व भारवाहकांनीं तिनिगांवाकडे जाण्यासाठीं प्रस्थान ठेवलें. औडो, तेरे, कौझी आणि शाट्झ् यांच्या जोड्या या मध्यंतरीच्या काळांत धवलगिरी हिमनदाची पुरेपूर पाहाणी करणार होत्या. तिबेटकडे जाणाऱ्या या व्यापारी रस्त्यावर प्रवाशांचे अनेक जथे सतत जात-येत होते. मार्फा खेड्यांतून रुबाबांत मिरवीत व लहान मुलांना खाऊ वांटीत मोहीम उत्तरेकडे गेली. संध्याकाळीं मोहिमेनें तिनिगांव गांठलें. फुथार्केनें गांवच्या प्रमुखाचें घर गिर्यारोहकांसाठीं सज्ज करून ठेवलें होतें.

दुसऱ्या दिवशीं तिनिगांवच्या तथाकथित शिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखालीं मोहिमेंतील मंडळी लव्याजम्यानिशीं तिलिचो खिंडीकडे निघाली. बरेच तास पायपीट करूनहि खिंडीचा मागमूस नाहीं हें पाहून त्या शिकाऱ्याचें अवसान डळमळूं लागलें व हळूहळू त्यानें ‘ पुढारीपण ’ सोडून मंडळींच्या मागून शेपटासारखें रखडण्यास सुरुवात केली. अखेरीस एकदाची तिलिचो खिंड आली. पण भारतीय नकाशानुसार मानांगभोत दरी आणि अन्नपूर्णा शिखराचा ठावठिकाणा लागेना. सभोंवार हिम आणि बर्फाच्या पसाऱ्यांतून अनेक छोट्या-मोठ्या शिखरांची आकाशगंगाच निळ्या नभांत डोकावत होती. उजवीकडे अन्नपूर्णा शिखराऐवजीं एक राक्षसी भिताड उभें होतें. या भिताडाचीं शिखरें २३,००० फूट उंच होतीं. समोर दरीऐवजीं एक पठार होतें व या पठाराच्या मध्यावर एक गोठलेलें भव्य हिमसरोवर होतें. अन्नपूर्णेचा मात्र कुठेंच पत्ता नव्हता. या भव्य हिमसरोवरापल्याड गेल्याखेरीज मानांगभोत दरीचें दर्शन होण्याची शक्यता नव्हती. हें सरोवर निदान चार मैल लांब होतें.

प्रथम या सरोवराच्या डाव्या अंगानें जातां जातां उभे कडे लागले व जमिनीवरून पलीकडे जाणें अशक्य आहे हें लक्षांत येतांच दोर बांधून हेझोंग सरोवराच्या बर्फाळ पृष्ठभागावर सुमारें ५० गज चालत गेले.

एखाद्या आरशाच्या काचेसारखा हा पृष्ठभाग टणक व सपाट होता. त्यांनीं हिमकुठार आपटून बर्फाच्या जाडींचा अंदाज घेतला व सरोवरावर चालणें बिनधोक असल्याचें लक्ष्यांत येतांच सर्वजण दोर बांधून सरोवरावर चालूं लागले. सरोवराच्या दुसऱ्या बाजूस बाहेर पडल्यावर पुन्हा एक खिंड होती. तिला पूर्व तिलिचो खिंड असें नांव देण्यांत आलें.

या ठिकाणीं छावणी लावावी व हेर्झोग आणि रेबूफा यांनीं बर्फाळ पसारा ओलांडून मानांगभोत खोऱ्याच्या दिशेनें जाऊन अन्नपूर्णेचा शोध करावा व इशाक् आदि मंडळींनीं छावणींत राहून आसपासच्या प्रदेशाचा अंदाज घ्यावा असें ठरलें. हेर्झोगची तुकडी अडचणीच्या मार्गानें खांगसार खेड्यांत पोहोंचली. येथील लोकांना मुक्तिनाथ पर्वताखेरीज दुसऱ्या जगाची यत्किंचित् जाणीव नव्हती. या खेड्यांतील लोकांजवळ पुरेसें अन्नधान्य नसल्यामुळें या तुकडीला मोहिमेची अन्नधान्याची कमतरता भरून काढण्याची शक्यता नव्हती. त्यांना मानांगभोत खेड्याकडे जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें.

मानांगभोत हें एक छोटेंसें गांवच होतें. तेथील वस्ती तुलनात्मकतेनें अधिक सुसंस्कृत व सुधारलेली होती. या खेड्यांतील कांहीं गुरख्यांनीं ब्रिटिश सैन्यांत नोकरी केलेली होती; त्यामुळें जगांत इंग्लिश व अमेरिकन लोक असल्याची माहिती त्यांना होती. ( अर्थात फ्रेंच माणूस म्हणजे इंग्लिश अगर अमेरिकन नव्हे हें त्यांच्या आकलन-शक्तीपलीकडचें ज्ञान होतें ! ) या गांवांतील लोकांना अन्नपूर्णा शिखराबद्दल गंधवार्ताहि नव्हती. मात्र एक त्रिकोणी उंच शिखर समोर होतें त्याचें नांव गंगापूर्णा असल्याचें त्यांना ठाऊक होतें. त्याच्या जवळच आणखी दोन शिखरें होतीं; त्यांचीं नांवें शोंगोर आणि सेप्चिया अशीं होतीं. मानांगभोत गांवच्या प्रमुखा-करवीं गिर्यारोहकांनीं शेर्पा भारवाहकांसाठीं दहा किलो त्सांपा देण्याचें कबूल केलें. कोंबड्या, दूध, तांदूळ—कांहींहि या गांवांत मिळालें नाहीं. दुसऱ्या दिवशीं त्सांपा घेऊन फूथार्केला तिलिचो खिंडीकडे रवाना करण्यांत आलें. हेर्झोग, रेबूफा, पणसी यानीं च्दिदी खेड्याकडे जाऊन अन्नपूर्णेचा शोध करण्याचें ठरविलें व ते छावणीस १२ मेपर्यंत पोहोंचले नाहींत तर उपासमार टाळण्यासाठीं इशाक्नें तिलिचो खिंडीवरील छावणी मोडून तुकुचाला परतावें असा संदेश फूथार्केबरोबर पाठविण्यांत आला.

इकडे इशाकूनें अंगथार्केबरोबर मुक्तिनाथ हिमालवर १८००० फूट उंची गाठून भव्य भिंताडापल्याडचे वेध घेतले. हें भिंताड म्हणजेच अन्नपूर्णा हिमाल होतें. त्रिकोणी शिखरापलीकडे एक कणा चढत होता व त्याच्या दुसऱ्या टोकाला अन्नपूर्णा शिखर गगनाचा वेध करीत होतें. आंगथार्के यानें या जागीं एक आठ फूट उंच प्रस्तर चबुतरा उभारला. १२ तारखेस सकाळीं इशाकू पुन्हा या जागीं पोहोंचला व त्याच दिवशीं दुपारीं साडेबारा वाजतां त्यानें आंगथार्केसकट मुक्तिनाथ हिमालमधील २०३०० फूट उंचीच्या एका शिखराचा माथा गाठला. या फ्रेंच मोहिमेनें २०००० फुटापेक्षां अधिक उंचीचें हें पहिलेंच शिखर पादाक्रांत केलें होतें !

शिधा संपल्यामुळें उपाशी अवस्थेंत परतीचा प्रवास करून मानांगभोतमार्गें हेर्झोग यांना तिलिचो खिंडीवरील छावणी गांठावयाची होती. त्यांनीं उपासमार टाळण्यासाठीं पणसी व रेबूफा यांना मुक्तिनाथमार्गें तुकुचाला रवाना केलें. या वाटेनें ते एक दिवस आधीं तुकुचाला पोहोंचले असते. स्वतः हेर्झोग एका चॉकोलेटच्या पट्टीवर विसंबून तिलिचो खिंडीकडे यावयास निघाले. मानांगभोत, खांगसार मार्गें रखडत रखडत ते परतत होते. वाटेंत रात्र झाली. उपाशी पोट, थंडी आणि तशांत त्यांचे गुढघे एकमेकावर आपटूं लागले. वाटेंत त्यांना नदींतून ओलेंचिंब होऊन पैलतीराला यावें लागलें. १४००० फूट उंचीवरील डोंगर पसाऱ्यांत एकट्यानें रात्र काढून दुसऱ्या दिवशीं सकाळीं धडपडत धडपडत त्यांनीं पुन्हा आपला प्रवास सुरू केला. एक दगड पुढें फेकावा व मोठ्या कष्टानें त्या दगडापर्यंत पावलें मोजून त्या दगडाजवळ विश्रांतीसाठीं बसकण मारावी असें करीत करीत व शेवटीं तर हातपायावर रांगत सरपटत हेर्झोगनें खिंडीवरची छावणी गांठली !

मिरिस्ती खोऱ्याकडे जाणारी २७ एप्रिल रोजीं सांडपलेली खिंड हीच अन्नपूर्णा शिखराची वाट असण्याची शक्यता होती असें अनुमान काढून १३ तारखेला तिलिचो खिंडीवरच्या छावणीचें सूप वाजलें. १४ मे रोजीं सर्वजण पुन्हा तुकुचा तळावर एकत्र आले होते.

मध्यंतरींच्या काळांत कौझी–शाट्झ् आणि औडो–तेरे या दुकलींनीं पूर्व हिमनदीवर तळ देत गिर्यारोहण करून धवलगिरी या बाजूनें दुर्गम असल्याच्या मताला पुष्टि दिली. धवलगिरीवरील स्वारींत धोके भरपूर होते

आणि यशाची यत्किंचित् हमी देण्याची शक्यता नव्हती. या चढाईबद्दलचा निर्णय कुठल्याहि क्षणैक भावनेच्या आहारीं न जातां शांत मनानें विचारपूर्वक व्यायला हवा होता.

१४ मे रात्रीं जेवणाच्या तंबूत गिर्यारोहकांची सभा झाली. या सभेंत धवलगिरीपेक्षां अन्नपूर्णेवर गिर्यारोहण करण्यांत वर चढून जाऊं शकण्याची कांहींना कांहीं आशा आहे तेव्हां उरलेल्या थोडक्या काळाचें सार्थक व्हाव-याचें असेल तर अन्नपूर्णा शिखराचाच विचार करावा असा मतप्रवाह वाहूं लागला. सर्वांचे विचार ऐकून घेतल्यावर मोहिमेचे नायक हेर्झोग यांनीं संपूर्ण आराखड्याच्या स्वरूपांत आपला निर्णय जाहीर केला.

एकदम अन्नपूर्णा शिखरावर हल्ला न करतां एक मोठी तुकडी सर्वांत चांगला मार्ग शोधण्यासाठीं पाठवावी. या तुकडीजवळ दहा दिवस पुरेल एवढी शिधासामुग्री द्यावी. आणि नंतर पुन्हा लागल्यास या तुकडीला आणखी शिधा पुरवावा. बिनीच्या तुकडीला योग्य मार्ग सांपडतांच पाहाणी करणाऱ्या तुकडीचे हल्ला करणाऱ्या चमूंत रूपांतर करावें. यांत वेळाचा निष्कारण अपव्यय होणार नाहीं अशी खबरदारी घेतली जावी. एप्रिल २७ रोजीं अन्नपूर्णेची पाहाणी करतांना शोधलेला मार्ग फक्त तिघांनाच माहीत होता. पाहाणीसाठी कराव्याच्या प्रत्येक तुकडीबरोबर या तिघांपैकीं एकेक दिला जाणार होता. इशाक्, रेबूफा व हेर्झोग नुकतेच परतले असल्यानें त्यांना कांहीं दिवस विश्रांती मिळणें जरूर होतें; शिवाय हेर्झोग यांना पत्र-व्यवहार आणि हिशोबांचें कामहि करावयाचें होतें. लाचानेल व तेरे यांनीं अजीबा, आंगदावा आणि दावा थोंडुप या शेर्पांना बरोबर घेऊन निघावें आणि या तुकडीला शाट्झ् यांनीं मार्गदर्शन करावें अशी योजना करण्यांत आली. त्यांच्या मागोमाग एक दिवसानें रेबूफा आणि हेर्झोग यांनीं निघावें व त्यांना कौझी यांनीं रस्ता दाखवावा असें ठरलें. नॉइली यांचेकडे तुक-ड्यांना सामग्री पोहोंचविण्याची कामगिरी देण्यांत आली. इशाक् आणि औडो यांना सहा दिवस तरी कुठलीच कामगिरी नव्हती, त्यामुळें या काळांत त्यांनीं मुक्तिनाथाकडे संचार करून यावा व सहा दिवसांनंतर हेर्झो-गचा आदेश येईल त्याप्रमाणें त्यांनीं करावें असें ठरलें. आंगथार्के यानें इशाक्बरोबर राहावें आणि नॉइली व राणा यांनी पिछाडी सांभाळावी व

आदेशाखेरीज यावयास निघूं नये असें ठरलें. त्यांच्याकडे परतीच्या प्रवासासाठीं वेळींच भारवाहकांची तजवीज करण्याची कामगिरी देण्यांत आली. प्रत्येक तुकडीनें आपली सामुग्री चार गटांत विभागावयाची होती. पहिला गट अगदीं हलका ठेवावयाच्या, दुसऱ्या गटांत गिर्यारोहणांचीं साधनें, गरम कपडे, व इतर वैयक्तिक गरजेच्या वस्तू ठेवावयाच्या व ही सामुग्री भारवाहकांजवळ द्यावयाची. तिसऱ्या गटांत शिखरावरील चढाईच्या प्रयत्नासाठीं लागणाऱ्या वस्तूंचा अंतर्भाव करावयाचा व उरलेली सामग्री चवथ्या गटांत व्यवस्थित बांधून ठेवून तीवर आपलें नांव घालून तुकुचा येथील छावणींत ठेवावयाची अशा सूचना देण्यांत आल्या.

घोडे, भारवाहक आणि सामग्री घेऊन पहिली तुकडी १५ मे रोजीं रवाना झाली आणि तेच तयारीचे सोहळे आणि तसलेच निरोपाचे सोहळे उरकून दुसऱ्या दिवशीं दुपारीं हेर्झोग यांची तुकडी अन्नपूर्णेकडे निघाली.

खान्ती, लार्जुंग, ढुंपू, लेते अशीं खेडीं टप्प्या टप्प्याने मागें टाकीत मंडळी चोया या खेड्यांत पोहोंचली. दरवेळीं भारवाहकांना मार्गक्रमणासाठीं वेळ अधिक लागतो म्हणून त्यांना पुढें पाठविलें जाई. रात्र झाली की तंबू ठोकून मुक्काम करावयाचा आणि सकाळीं पुन्हा प्रवासाला लागावयाचें असा कार्यक्रम चालू होता. दुसरी रात्र त्यांनीं "२७ एप्रिल–खिंडीवर" काढली. या खिंडीचा शोध २७ एप्रिल रोजीं कौझी, औडो आणि शाट्झ् यांनीं लावला होता. तिसऱ्या दिवशीं मिरिस्ती नदीच्या किनाऱ्या किनाऱ्यानें नीलगिरीचीं आधारभिंताडें तुडवीत मंडळी पुढे गेली व दुपारीं त्यांनीं मिरिस्ती खोऱ्यांत उतरण्यास प्रारंभ केला. याच ठिकाणीं बिनीच्या तुकडीनें आदल्या दिवशीं फ्रेंच अल्पाइन मंडळाचें निशाण ठेवलें होतें भारवाहकांचें मनोधैर्य थोडं फार हेलकावलें होतें व ते उतरणीवर वारंवार घसरत होते. पाऊस पडत होता, त्यांतच हिमपाताचीहि झिम्मड लागली होती. तेवढ्यांत आरडाओरडा ऐकूं आला. पुढें जाऊन पाहातां लाकडाचा जाळ दिसला. बिनीच्या तुकडींतील भारवाहक आपलीं ओझीं ठेवून जाळाभोंवतीं बसले होते. मंडळी मिरिस्ती नदीच्या तीरावर पोहोंचली होती. आतां नदी पार करणें भाग होतें. पण ओझीं घेऊन पलीकडे जाण्यास भारवाहक तयार होईनात. पण त्यामुळे हेर्झोग व रेबूफा हवालदिल थोडेच होणार होते? त्यांनीं

ओझीं स्वतःच्या पाठीवर वाहून नेण्याचें ठरविलें. लागलीच ओझ्याचा पट्टा कपाळावर लावून रेबूफा सिद्ध झाले. त्यांनीं एका मागोमाग ओझीं पलीकडे नेलीं. परंतु पायथ्याच्या तळाची सामग्री असलेलें ओझें नेतांना त्यांचा तोल गेला व तो ते कसाबसा सावरतात तोंच कपाळावरील पट्टा घसरून ओझें खळाळणाऱ्या नदींत पडलें व नाहींसें झालें !

दुसऱ्या दिवशीं हवा बरीच चांगली होती. मध्यान्हीला हेर्झोग व शाट्झ् यांची गाठ पडली लाचानेल व तेरे सकाळींच अन्नपूर्णेच्या वायव्य दरडीची पाहाणी करण्यासाठी रवाना झाले होते. पायथ्याच्या तळाशीं उंचसखल खडकाळ जमीन बरीच समतल होती व मिरिस्तीचें पात्रहि चांगलेंच रुंद होतें.

हेर्झोग यांना ही दरड फार सोपी जाईल असें वाटलें नाहीं. त्यामुळें अजूनहि पूर्ण पाहाणी झाल्याखेरीज चढाईचा विचार करावयाचा नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. बर्फ पडतच होतें. सायंकाळीं लाचानेल-तेरे यांची तुकडी पायथ्याच्या तळावर परतली. त्यांनीं अत्यत कठिण प्रस्तरारोहण करून त्या दिवशीं १८००० फूट उंची गांठली होती. हे प्रस्तर अतिशय कठीण होते, परंतु दोर बांधून भारवाहकांना वर चढवावें लागेल असा अभिप्राय दोघांनीहि दिला. अधिक कालापव्यय न करतां शिखर चढण्याच्या उद्योगास लागावें असें आपलें मत त्यांनीं व्यक्तविलें. परंतु इतकी घाई करण्याच्या कल्पनेशी हेर्झोग सहमत नव्हते. त्यांनीं पुन्हा १८००० फुटापल्याड पाहाणी करून निर्णय घ्यावा असें मत दिलें व नॉइली यांना चिठी लिहून अधिक पुरवठ्याची मागणी केली.

इकडे अन्नपूर्णा शिखर चढून जाण्याचा मार्ग शोधण्याची धडपड चालू होती. तेवढ्यांत इशाक्-औडो व आंगथार्के आणि नॉइली व राणा या दोन तुकड्या आळीपाळीनें मुक्तिनाथ या सुंदर बुद्धविहाराचें दर्शन घेऊन आल्या.

१९ मे रोजीं अस्थायी पायतळावर पहाटे अंधारांतच हालचालीस सुरुवात झाली. नाश्ता तयार झाला आणि नंतर आपापल्या थैल्या उचलून रेबूफा, तेरे आणि शाट्झ् अंधारांत नाहींसे झाले. त्यांच्या मागोमाग हेर्झोगहि रवाना झाले. दरडीचा पायथा गाठून त्यांनीं दरडीशीं दोन हात करण्याचा निर्धार केला. भारवाहक, जातां येईल तेवढ्या उंचीपर्यंत ओझीं वाहून, पुन्हा पायतळाला परतणार होते. समोर सरासरी २३,००० फूट

उंची असलेलें भव्य भिंताड एखाद्या जगड्व्याळ भीमाच्या छातीसारखें उभें ठाकलें होतें. त्याचे सरळ कडे निदान १०००० फूट उंच आकाशाकडे चढत होते. सरकी आणि हेझ्रोंग, रेबूफा नि अजीबा असे दोन दोर तयार झाले. तिसऱ्या दोरावर तेरे, अैला आणि शाट्झ् होते. कठीण चढाई लागतांच भारवाहकांनीं परतावयाचें आणि उरलेल्या चार गिर्यारोहकांनीं जातां येईल तेवढें वर जाऊन तळ ठोकावयाचा अशी योजना होती. त्या तळावर रेबूफा व हेझ्रोंग रात्र काढणार होते व तेरे आणि शाट्झ् पुन्हा वशिंडापर्यंत उतरून जाणार होते तेथें लाचानेलची व त्यांची गांठ पडावी व मग शाट्झ् यांनीं पायतळावर परतावें आणि दुसऱ्या दिवशीं पुन्हा कौझीबरोबर परतावें आणि चढाईसाठीं तिसरी तुकडी म्हणून वशिंडावरील तळावर सज्ज राहावें अशा सूचना देण्यांत आल्या.

चढण अगदी उभी होती. हवा बिघडत चालली होती. १८००० फूट उंची खाली राहिली होती. उशीर होत असल्यामुळें योजनेनुसार शाट्झ् व तेरे यांना परतणें आवश्यक होतें. खडकावर जागोजागीं हिम घट्ट होऊन त्याचें बर्फ झालें होतें. वारंवार हिमनग गडगडत होते. या अडचणींच्या आरोहणानंतर मंडळी एका त्रिकोणी आकाराच्या घडवंचीवर आली. हवा अधिकच बिघडली होती. तळासाठीं जागा साफ केली तरी येथें दोन माणसांना बसण्यापलीकडे जागा तयार झाली नाहीं. तेरेनें हिमकुठारीनें दगड फोडण्याचा प्रयत्न केला तेव्हां दगड फुटण्याऐवजीं कुठारीचें पातेंच दुमडलें ! अखेर हेझ्रोंग व रेबूफा यांनीं तेथेंच आसरा उभारण्याचें ठरविलें व तेरे आणि शाट्झ् यांना निरोप दिला. हेझ्रोंग व रेबूफा यांनी ती खळ नसलेल्या हिमपाताची अघोरी रात्र तशीच लोहखुंट्यांना दोरानें बांधलेल्या अवस्थेंत काढली. सकाळीं देखील पुढें जाण्यास योग्य परिस्थितीच्या अभावीं रेबूफानें तेथेंच वाट पाहात थांबण्याचें ठरविलें. जिकडे तिकडे हिमभुकटीचा जाड थर पसरला होता.

तेवढ्यांत लाचानेल व तेरे तेथें चढून आले. त्याच कठिण परिस्थितींत त्यांनीं पहाटेपर्यंत आरोहण केलें होतें. हवामानाच्या सबबीवर आपल्या जागेवरून न हलल्याबद्दल त्यांनी हेझ्रोंग-रेबूफांची चांगलीच निर्भत्सना केली. आणि त्या दोघांनीं स्वतः वर चढण्यास पुन्हा प्रारंभ केला. या

खटाटोपांत लाचानेलचे पाय घसरले. त्यांच्या हाताची पकड घट्ट नसती तर मोठा अनर्थ ओढवला असता पण केवळ अज्ञाताच्या बळकट हातानें तो प्रसंग टळला होता. आपले तंबू बंद करून हेर्झोग--रेबूफा यांनींहि तेरे–लाचानेल यांच्या मागोमाग चढण्यास सुरुवात केली. त्यांना प्रथमच अन्न-पूर्णा हिमनदाचा सर्वांत उंचीवरील हिमप्रपात दिसला. तेरे वगळल्यास बाकीच्यांना आतां या मार्गांत भरवसा वाटेनासा झाला होता. परंतु अन्न-पूर्णा शिखर चढण्याचा तोच मार्ग होता आणि आतां वाया घालविण्यास एकहि दिवस उरला नव्हता. लाचानेल व रेबूफा या मार्गानें वर चढण्यास तयार नव्हते. त्यांना अस्थायी पायतळावर परत पाठविण्यांत आलें व त्यांनी भारवाहकांसह उजव्या किनाऱ्यानें हिमनदावरून पुढे रेटावें व हिम-प्रपात टाळून उत्तर कण्यावर पोहोंचण्याचा प्रयत्न करावा असा आदेश देण्यांत आला. हेर्झोग आणि तेरे यांना हातीं घेतलेल्या चढाईचा सोक्षमोक्ष करण्याचा निर्णय घेतला व कौझी नि शाट्झ् यांनीं वर यावें व हेर्झोग-तेरे यांचे प्रयत्न फलद्रूप झाल्यास त्यांना नवी कुमक पुरवावी, अन्यथा गाशा गुंडाळून छावणीचें सामान परत खालीं नेण्यास त्यांना मदत करावी असा निरोप कौझी-शाट्झ् यांना पाठविण्यांत आला. लाचानेल व रेबूफा यांना अन्नपूर्णा हिमनदाचा हिमप्रपात टाळून वर जाण्यांत यश मिळालें तर त्यांनीं लागलीच तसा निरोप पाठवावयाचा होता.

तेरे व हेर्झोग यांनीं ती रात्र तेथेंच उंचीवर छावणी ठोकून काढली. दुसऱ्या दिवशीं पुन्हा पुढें चढण्यास सुरुवात झाली. लवकरच तें नाकाड असें कांहीं निमुळतें होत गेलें कीं त्यावर तोल सावरून चालणें अशक्य झालें. तेव्हां त्या दोघांनीं एखाद्या समतल गजाला हातानें लोंबकळून पुढें जावें तशी प्रगति त्या :रडीला लोंबकळत चालू ठेवली. अखेर ते एका चंद्रकोरी-सारख्या चढणीवर आले व त्यानंतर मात्र पुन्हा अगदीं उभ्या कड्यावर कसरत करणें भाग पडणार असें त्यांच्या लक्षांत आलें. श्वास पुरत नव्हता अशा अवस्थेंत पायऱ्या खोदून तेरे वर चढत होते व त्यांच्या कंबरेला बांध-लेला दोर ढिला सोडण्यासाठीं हेर्झोग वेळोवेळीं खुंट्या ठोकीत होते. अडचणीच्या ठिकाणीं तेरे हेर्झोगना वर घेत होते. असें करतांकरतां ते दोघे कण्याच्या माथ्यावर पोहोंचले. ती जागा सुमारें २०,००० फूट उंच होती.

स्वच्छ हवा पडली होती. अन्नपूर्णा शिखर दगडफेकीच्या आवाक्यांत असल्या-इतकें जवळ दिसत होतें. ते दोघे ज्या दरडीवर होते ती थेट शिखरापर्यंत जात असल्यासारखी दिसत होती. परंतु हा आभास होता. कण्यामध्यें भगदाडें असणें अगदीं स्वाभाविक होतें. शिवाय स्वच्छ हवेमुळें अन्नपूर्णा शिखर जेवढें जवळ दिसत होतें तेवढें तें जवळ नव्हतें. दुसऱ्या आघाडीवर लाचानेल आणि रेबूफा यांना जर यश मिळत असेल तर तेवढाच या मोहि-मेच्या आशेचा आसरा होता; अन्यथा एवढ्या धडपडीनंतर ' माघार ' एवढें एकच भवितव्य मोहिमेपुढें होतें. ' आपण धडपडतों आहोंत तो अन्नपूर्णा शिखर गांठण्याचा मार्ग नाहीं ' या जाणिवेनें अखेर तेरे-हेझोंगना परत फिरावें लागलें. ते जिवावरची उतरण उतरत असतांना अखेर शाट्झ्चा आवाज त्यांनीं ऐकला. त्यांनीं लागलीच छावणी गुंडाळण्याचा आदेश शाट्झ्ला दिला व जलद गतीनें सर्वांनीं अस्थायी पायतळ गांठला.

पायतळावर शेर्पा भारवाहकानें लाचानेल-रेबूफा यांचेकडून निरोप आणला होता. हिमनदाचा उजवा किनारा चढून जाण्यास सोपा होता. आणि त्या मार्गानें पठार गांठतां येत होतें. लाचानेल-रेबूफांना अद्यापि अन्नपूर्णेच्या चढणीचें दर्शन झालें नव्हतें, परंतु पठार गांठतां आल्यास शिखर हस्तगत होणें शक्य आहे याची जाणीव २०,००० फुटांवरून लाभ-लेल्या विहंगम दर्शन मुळें हेझोंगना झाली होती. मोसमी पर्जन्य अन्नपूर्णेच्या परिसरांत ५ जून रोजीं पोहोंचणार होता. तत्पूर्वीं चढाई उरकून परतीचा मार्ग धरणें आवश्यक होतें. परंतु वर आलेली तुकडी प्रत्यक्ष चढाईच्या तयारीनें आली नव्हती. तिच्याजवळ खाद्यपेयांचा पुरेसा पुरवठा नव्हता. कमींत कमी तळ उभारून चढाईची योजना आखावयाची म्हणजे त्यासाठीं लागणारे भारवाहक त्यांच्याजवळ नव्हते. या सगळ्या अडचणींवर उपाय-योजना करून लागलीच चढाईला प्रारंभ कसा करावा या प्रश्नानें हेझोंग यांना भंडावून सोडलें होतें.

अजीबानें लागलीच पायतळावर जाऊन तेथील मंडळींना पहिल्या तळाचा मार्ग दाखवावा व पहिला तळ पुन्हा उभारला जावा व सध्यांच्या पहिल्या तळाचें साहित्य स्वतःच्या पाठीवर वाहून नेऊन गिर्यारोहकांनीं दुसरा तळ सज्ज करावा अशी योजना हेझोंग यांनीं सुचविली. सरकी यानें

विजेच्या वेगानें तुकुचाला जाऊन हेर्झोग यांचा सविस्तर आदेश छावणीवर पोहोंचवावयाचा होता. अशा तऱ्हेनें सरकी व अजीबा यांची रवानगी केल्यास या चार गिर्यारोहकांजवळ एकहि भारवाहक उरत नव्हता. पाहाणीच्या धडपडीचें प्रत्यक्ष चढाईत रूपांतर होत होतें. तुकुचाच्या छावणीवर निरोप पोहोंचण्यास निदान चार दिवस लागणार होते.

अजीबा व सरकी यांची रवानगी केल्यावर हेर्झोग, तेरे, लाचानेल व रेबूफा प्रत्येकीं ४५ पौंड ओझें घेऊन पठाराकडे चढूं लागले. हें भारवाहकाचें काम लाचानेल व रेबूफा यांना आवाक्याबाहेरचें वाटल्यानें ओझ्याखालीं दबलेल्या अवस्थेंत पायऱ्या खोदण्याची जबाबदारी हेर्झोग व तेरे यांच्यावर आली. रात्र पडण्यापूर्वी पठाराच्या साधारणपणें मध्यावर दुसरा तळ उभारावयाचा होता. वाटेंत अनपेक्षितपणें दुसऱ्या मार्गानें चढून आलेले शाट्झ् व दोन शेर्पा या लोकांना भेटले. संध्याकाळीं तळाच्या जागीं पोहोंचतांच भारवाहकांना परत पाठविणें भाग होतें. पण दोन भारवाहकांना असें केवळ त्यांच्या नशिबावर व कर्तबगारीवर सोडणें बरोबर नव्हतें. सर्व गिर्यारोहक तर दिवसभराच्या परिश्रमानें अर्धमेले झाले होते. तरीहि तेरे यांनीं भारवाहकांबरोबर पहिल्या तळावर जावयाचें ठरविलें. या तळावरून भारवाहकांची पायतळाकडे रवानगी करून ते स्वतः एकटे अजीबाच्या झोपण्याच्या पिशवींत पहिल्या तळावर ती रात्र काढणार होते !

ती अत्यंत कष्टप्रद रात्र दुसऱ्या तळावर घालविल्यावर प्रत्येकीं २२ पौंड ओझें घेऊन मंडळींनीं तिसऱ्या तळाची वाटचाल करण्यास दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजतां प्रारंभ केला. पहिल्या तळावर ‘ उशाला धोंडा ’ घेऊन तेरे यांनीं हिमपातांत गाडले जात असलेल्या अवस्थेंत एकट्यानें ती रात्र घालविली !

तेवढ्यांत शाट्झ् व सरकी परतले. सरकी म्हणाले, “ मला नवा मार्ग सांपडला आहे. मला दोन शेर्पा, दोन वरच्या तळांची सामग्री आणि तीन दिवसांचा शिधा द्या आणि मी हिमनदीवरून मला दिसलेल्या कण्यानें वर जातों....”

हेर्झोग यांना शाट्झ्ची कल्पना पसंत पडली. समजा, लाचानेल-रेबूफांचा प्रयत्न फसला तर आणखी एखादा संभाव्य मार्ग मोहिमेला हवाच होता. हेर्झोग यांनीं शाट्झ्ला दुजोरा दिला. दुसऱ्या दिवशीं आशेनें भारलेल्या

अवस्थेंतच शाट्झनीं आपल्या पराक्रमासाठीं प्रस्थान ठेवलें. त्यांच्याबरोबर पणसी व ऐला गेले. कौझी यांचेवर कायम पायतळ उभारण्याची व दरडीवरील आघाडीचा तळ आवरण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली. त्याला एक भारवाहक मदतीसाठीं देण्यांत आला. याचा अर्थ कौझींना स्वत:लाहि भारवाहकाचें काम करावें लागणार होतें.

दुपारीं तेरे, हेर्झोग आणि सरकी बिनीच्या तुकडीला गांठण्यासाठीं निघाले. अजीबा त्यांना रस्ता दाखविणार होता. हिममय खडकाळतेंतून ते डोंगरचढणीकडे जात होते. अधूनमधून कोणाचा ना कोणाचा पाय बर्फावरून घसरत होता. तेवढ्यांत विरुद्ध दिशेनें अजीबा त्यांना येऊन मिळाला. त्यानें लाचानेल-रेबूफा हिमनद्यांच्या पठारावर पोहोंचल्याची वर्दी आणली. आतां अन्नपूर्णेचा हिमप्रपात टाळून मंडळी अन्नपूर्णेवर चाल करूं शकत होती.

खडकाळ चढणीच्या शेवटीं येतांच हेर्झोग यांनीं भारवाहकांना थांबावयास सांगितलें. त्यांनी कौझी यांना देण्यासाठीं एक भावी पायतळाच्या जागेचें रेखाचित्र दिलें; संध्याकाळपर्यंत पठारी उंचवटा गांठण्याच्या निश्चयानें गिर्यारोहक अजीबाबरोबर भव्य भिंताडाशीं येऊन पोहोंचले. एकावर एक रचलेल्या थरांच्या चळतींतून नळकांड्याच्या पद्धतीनें चढून वर जावयाचें असें करतां करतां एका संपथांतून ते हिमप्रपात टाळून त्याच्या माथ्यावरील पठारावर पोहोंचले. संध्याकाळ झाली होती. येथेंच बिनीच्या तुकडीनेंहि तंबू उभारले होते. ही जागा १६,७०० फूट उंच होती प्रत्यक्ष चढाईचा हा भावी पहिला तळ होता. अन्नपूर्णेची तटबंदी भेदून जाण्याचा मार्ग अखेर सांपडला होता. महिन्याभरापेक्षां अधिक काळपर्यंत केलेली धडपड सार्थकीं लागणार होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं झालेल्या अन्नपूर्णादर्शनानें तर मनांतील सगळ्या शंका आणि किल्मिषें नाहींशीं झालीं होतीं. तो २३ मे चा दिवस होता. अन्नपूर्णा गिर्यारोहणांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याइतका तो दिवस महत्त्वाचा होता. हवा चांगली होती. चारहि गिर्यारोहकांच्या आशेला भरतें आलें होतें.

दुसऱ्या तळापासून तिसऱ्या तळाकडच्या चढाईंत खूप अडचणी आल्या. एका ठिकाणीं प्रचंड पूर गोठून त्याचें बर्फ झालें होतें व सूर्यकिरणांमुळें तें इतक्या राक्षसी तऱ्हेनें वितळूं लागलें कीं या पुराच्या लोंढ्याबरोबर

वाढून न जातां वर चढायचें कसें हाच प्रश्न पडला. त्यांतून परमेश्वर-कृपेनें गिर्यारोहक बाहेर पडतात न पडतात तों समोर सरळ भिंताड उभें राहिलें कमरेपर्यंत हिम व त्याच्याखालीं गुळगुळीत निसरडें बर्फ अशा कठिण जागेवर चढून जावयाचें होतें. या संकटांतून बाहेर पडतांना १५ फूट चढण्यासाठीं मंडळींना एक तास लागला !

२१,००० फूट उंचीवर एका हिममनोऱ्याजवळ तिसऱ्या तळाची जागा ठरवून व आपल्याजवळील बोजे तेथें ठेवून चौघे दुसऱ्या तळाकडे उतरूं लागले. दुसऱ्या तळावर सर्वांना पुरेशी जागा नव्हती. त्यामुळें सर्वजण मोठ्या कष्टानें पहिल्या तळावर आले. शाट्झ् यांनीं तेरे यांचेबरोबर पहिल्या तळावर राहावें व पहिल्या तळावरील शिधासामग्री पुरवण्यासाठीं उरलेल्या तिघांनीं पायतळाकडे जावें असें ठरलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेरे आपल्याबरोबर पणसी व ऐला यांना घेऊन वर जाणार होते. अजीबा-कडे पायतळावरून पहिल्या तळावर पुरेशीं साधनें व शिधासामग्री आण-ण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें.

पायतळावर भरपूर तंबू उभारले होते. खाद्यपेयांचा नवा पुरवठा घेऊन इशाक् व औडो भारवाहकांसह पायतळावर येऊन पोहोंचले होते. सरकीनें नेलेला हेर्झोग यांचा निरोप सार्थकीं लागला होता व पिछाडीच्या तुकडीचा बिनीच्या लोकांशीं पुन्हा संपर्क प्रस्थापित झाला होता. सर्व सुरळीत झालें तर अन्नपूर्णा शिखरावर फ्रेंच निशाण फडकणार अशी बळकट आशा मनांत बाळगणें वस्तुस्थितीला सोडून नव्हतें. आजवर चढल्या गेलेल्या हिमालयाच्या कुठल्याहि शिखरापेक्षां अधिक: उंच शिखर चढून जाण्याचा मान फ्रेंच गिर्यारोहण चमूसाठीं जणुं समोर वाढून ठेवला होता !

* * *

प्रकरण तिसरें :

# अन्नपूर्णा शिखराशीं दोन हात

२३ मे १९५० रोजीं पहिल्या तळावरून श्री. हेझोंग यांनीं सरकी यांचे हातीं तुकुचा छावणीवर खास संदेश धाडला तो असा होता :

तळ १ : अन्नपूर्णा हिमनद.

अन्नपूर्णेवर चढाई करण्याचें ठरविलें आहे.

एक दिवस—एक तासहि—वांया घालवायचा नाहीं असा सर्वांनीं निर्धार केल्यास यश आपलें आहे.

**वैयक्तिक सूचना :**

**कोझी** : पायतळ शक्यतों लवकर हालवावा व त्याची पुनर्रचना करावी; नवा तळ सध्यांच्या तळापासून दोन तासांच्या चालीवर पर्वताकडे, हिमनगशंकूच्या खालीं मोकळ्या जागेवर. सर्व घेऊन येणें. उंचीवरील तळांची सर्व सामग्री पहिल्या तळावर रवाना करावी. शक्य तितकें खाद्य, बिनतारी संदेशवाहक, रेबूफा व हेझोंग यांच्या पिशव्या व तेरेची पादत्राणें.... (सरकीला १५ रुपये द्यावे: माझ्या पदसंरक्षक नायलॉनच्या पिशवीच्या तळाशीं सांपडतील. पिशवी माझ्यासाठीं आणणें.)

**शाट्झ्** : शाट्झ् कण्यावरून उतरून परत पायतळास आल्यास त्यानें पहिल्या तळाची व्यवस्था करावी. कारण लाचानेल, तेरे, रेबूफा आणि मी सर्व साहित्य दुसऱ्या तळावर नेत आहोंत. जागेवर मोठा प्रस्तर चबुतरा खुणेसाठीं रचला आहे. ती जागा हिमनदीच्या एका कडेलाच आहे. शक्य तितकें अन्न व साधनसामग्री पहिल्या तळावर आणणें.

**इशाक्** : लवकर वर येणें. मजजवळ छोटा प्रतिमाग्राहक आहे. फिल्म्स् आण व त्या मजकडे पाठव. भारवाहक पायतळापर्यंत येऊं शकतात. जवळचा इतर सांठा तेथें ठेवतां येईल.

**औडो :** शक्यतों लवकर पहिल्या तळावर यावें, येतांना आवश्यक वैद्यकीय सामग्री आणावी. इतर साहित्य ( मुख्यत्वेंकरून शस्त्रक्रियेचीं साधनें ) पायतळावरच ठेवावींत.

**नॉइली : अतिशय महत्त्वाचें**—एक तासहि वांया न घालवतां पायतळावर, १० उंचीवरील सामग्रीचे डबे, ६ दरींतील सामग्रीचे डबे आणि उंचीवरील तळासाठीं सर्व साहित्य, अखेरचा चलच्चित्रपट, एक डबा स्पिरीट, २ गॅलन पेट्रोल, एक १०० फूट अडीचसुती दोर, दोन ५० फूट तीनसुती दोर, ६५० फूट दीडसुती दोर, १५ खुंट्या, १० दुवे, सर्व दिवे, २ लोंबकळणारे दिवे व विजेऱ्या, ऑस्ट्रेलियन जखमी झोळी, एक जोडी घसरपट्ट्या, २ जोड्या घसर—आधारकाठ्या, ओढगाडी, प्रत्येकाची पाठीवरची पिशवी, एमर्सन सेट व तारा, इत्यादि साहित्य आणणें. दरीमधील तळांचें सामान अस्ताव्यस्तपणें तुकुचाला पडलें आहे त्यांतील आवश्यक वाटणाऱ्या सर्व वस्तू आणाव्यात. सर्व हातमोजे व पायमोजे, शेर्पांसाठीं तांदळाची त्सांपा. इतर साहित्य व्यवस्थित ठेवणें. स्वतः वर यावें. पायतळावरच तुमचेंहि वास्तव्य राहील.

इशाक् यानें डेव्हीज्ना* तार करावी, "पहिला तळ १६,७०० फूट उंचीवर. पाहाणीनंतर उत्तर अन्नपूर्णा हिमनदीवरून चढाई करण्याचें ठरविलें आहे. मार्ग हिम व बर्फाच्छादित, हवा अनुकूल. सर्वजण टंच आहेत. आशादायक परिस्थिति. नमस्कार."

— हेर्झोग

हा महत्त्वाचा संदेश धाडल्यावर, पायतळावर आनंद व आशेच्या वातावरणास भरतें आलें. २४ तारखेस संध्याकाळीं या आशेच्या आनंदांत पायतळावर मेजवानी झाली. २५ तारखेस हेर्झोग व रेबूफा यांनीं कांहीं साहित्य घेऊन चढाईवर निघण्याचें ठरविलें. यश मिळाल्यानंतरच पाय-तळाला परतावयाचें असा निश्चय त्यांनीं केला. निघण्यापूर्वीं हेर्झोग यांनीं ल्यूसीयन डेव्हीज यांना एक पत्र लिहिलें. त्यांत त्यांनीं आपल्या चढाईचा

---

* फ्रेंच हिमालय समितीचे अध्यक्ष.

संभाव्य आराखडा दिला होता. साधारणपणें पांच तळ ठोकून तें शिखर गांठावयाचें अशी त्यांची योजना होती.

सकाळीं साडेसहापासूनच गडबड-धांवपळीला सुरुवात झाली व दहा वाजतां एका दोरावर दावा थोंडुप व रेबूफा आणि दुसऱ्यावर लाचानेल, आंग दावा व स्वतः हेर्झोग अशी मंडळी दुसऱ्या तळाकडे जावयास निघाली. लाचानेल यांचे ओठ भाजल्यासारखे झाले होते व त्यांवर जखमा होत्या. रेबूफा यांना पोटदुखीची व्यथा लागली होती आणि ती इतकी वाढत चालली होती कीं अखेर पाळीपाळीनें त्यांना पाठुंगळीस घालून न्यावें लागलें. दुसऱ्या तळावर या तुकडीला तेरे, पणसी व ऐला भेटले. ते नुकतेच २२,००० फूट उंचीवर रात्र काढून व सामानाचे बोजे ठेवून परतले होते. त्यांना हेर्झोग आदि मंडळींनीं तीन दिवसांपूर्वीं ठोकलेला तंबू व ठेवलेलें सामान सांपडलें नव्हतें. त्या सर्वांवर बर्फाचा सर्वलोपक थर पसरला होता. त्यामुळें त्यांनीं तेथून ५० यार्डांवर दुसऱ्याच जागीं आपल्याबरोबर आणलेले बोजे ठेवले होते. २६ तारखेस लाचानेल व रेबूफा दुसऱ्या तळावर आपल्या तळावर आराम करीत होते तेवढ्या वेळांत हेर्झोग, दावा थोंडुप आणि आंग दावा यांनीं पुन्हा वर चढून तीन दिवसांपूर्वीं हेर्झोग यांच्या तुकडीनें उभारलेल्या तंबूचा शोध लावला व त्यांतील साहित्य तेरे यांच्या साहित्या-जवळ वाहून नेण्याचा खटाटोप आरंभला. अखेर त्यांनीं एका बुजलेल्या हिमजबड्यावरच आपला तिसरा तळ उभारला. हेर्झोग आणि ते दोन शेर्पा यांनीं २६ तारखेची रात्र तिसऱ्या तळावरच काढली. २७ तारखेस त्यांना चवथ्या तळाकडे जावयाचें होतें.

दुसऱ्या व दिवशीं हेर्झोग व दोन्ही शेर्पा वर चढूं लागले. त्यांना मध्य संपथांतूनच जाणें भाग पडलें. हा संपथ वर निसुळता झाला होता व त्याच्या वरच्या टोंकाला ढासळणाऱ्या हिमकड्यांची घसरंड होती. या संपथांतून मुंगीच्या गतीनें वर चढत असतांनाच एका ठिकाणीं आपलीं कीलपादत्राणें बर्फांत रोवण्याच्या खटपटींत दावा थोंडुपचा पाय घसरला व निमिषार्धांत तो उतारावरून खालीं गडगडूं लागला. परंतु हेर्झोग यांनीं थोंडुपवर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवलें होतें. थोंडुपचा दोर त्यांच्या कुऱ्हाडीच्या दांड्यावर गुंडाळला गेला आणि त्या खुंट्याला अडकलेल्या अवस्थेंत थोंडुप

घाबरल्या स्थितींत अधांतरीं लोंबकळत होता. अखेर पुन्हा उठून त्यानें दोराच्या आधारानें ती चढण पार केली. हेर्झोगनंतर थोंडुपनें पायऱ्या खोदण्याची पाळी घेतली. आणि त्या डोंगरघळीपर्यंत पोहोंचल्यावर पुन्हा हेर्झोग यांनीं पायऱ्या खणावयास घेतल्या. त्यांच्या कंबरेला बांधलेल्या दोरीला दावा थोंडुप हळूहळू ढील देत होता व हेर्झोग वर वर चढत होते. हिम अतिशयच नरम होतें व डोंगरघळीवर तें तडकेल कीं काय अशी भीति वाटत होती. वर पोहोंचल्यावर हेर्झोग यांनीं शेर्पांना जवळ जवळ वर ओढूनच घेतलें.

त्यानंतर या त्रिकुटानें 'विळ्या'च्या हिमनदाकडे चढावयास सुरुवात केली. ती हिमनदी तांबुस दगडांच्या पात्रांतून वाहात एकाएकीं अधांतरी थांबल्यासारखी झाली होती आणि तिच्या खालीं ७०० फूट खोल एक खडा कडा होता. विळ्याच्या मुठीकडून बर्फाळ वाटेनें वर जाण्याची शक्यता दिसत होती. कंबरेपर्यंत खोल हिमांतून वाट काढीत आणि पावलागणिक श्वास घेण्यासाठीं थांबत ती मंडळीं भिंताडाजवळ आली. आणि एक तासभराच्या धडपडीनंतर त्यांनीं कड्याचा पायथा गांठला. जवळच एक हिममनोरा होता. त्याच्या आश्रयाला तळ ठोकून घरंगळणाऱ्या कड्यांच्या माऱ्यांतून वांचण्याची शक्यता होती. तेथेंच चौथरा तयार करून चौथा तळ उभारण्यांत आला. शेर्पांना भयंकर डोकेदुखीच्या व्यथेनें पछाडण्यास सुरुवात केली होती. या तळाची उंची २४,८०० फूट होती. ॲनरॉइड भारमापकाची चूक लक्षांत घेऊन हेर्झोग यांनीं ती उंची २३,५०० फूट निश्चित केली. तुकडीनें जवळ जवळ राक्षसी भिंताडाच्या माथ्याएवढी उंची गांठली होती. 'फुलकोबी' पर्वतश्रेणीची ऐट तर केव्हांच जिरली होती आणि एखाद्या खुजट पर्वतराजीसारखी ती पर्वतश्रेणी खालीं दिसत होती.

चौथा तळ ठोकल्यानंतर थोड्याच वेळांत मंडळी परत फिरली. लवकरच त्यांनीं तिसरा तळ गांठला. त्यांचे जोडीदार अगोदरच तिसरा तळ व्यापून बसले होते. "अन्नपूर्णा शिखर सर झाल्यासारखेंच आहे," असें हेर्झोग यांनीं आनंदातिशयानें त्यांना सांगितलें. तिसऱ्या तळावरची मंडळी म्हणजे कौझी, शाट्झ, लाचानेल व रेबूफा ही होती. पहिल्या दोघांनीं पहिल्या तळावरून निघून दुसरा तळ गांठल्यावर तेथें एक रात्र काढली व नंतर

चौघांनींहि दुसरा तळ ते तिसरा तळ मजल मारली होती. ती मेची २८ तारीख होती. जूनच्या ५ तारखेपर्यंत मोसमी पर्जन्य अन्नपूर्णेला घेरणार होता. तत्पूर्वी चढाई यशस्वी करावयाची म्हणजे खालून आणखी साहित्य आणण्याची घाई करणें आवश्यक होतें. त्यामुळें हेर्झोग व दोन्ही शेर्पा दुसऱ्या तळाकडे निघाले. त्या तळावर तेरे यांच्या आरोळ्यांनीं त्यांचें स्वागत केलें. आतां पांचवा तळ ठोकावयाचा व तेथून शिखर गांठण्या-साठीं अखेरची धडक मारावयाची एवढेंच उरलें होतें. तिसऱ्या तळावर चौघेजण होते आणि दुसऱ्या तळावर स्वतः हेर्झोग व तेरे होते. दोन दिवसांनीं हे चार लोक खालीं उतरले कीं त्यांपैकीं चांगल्या अवस्थेंत अस-लेल्या दोघांना परत वर पाठवावयाचे व त्यांच्या मागोमाग एक दिवसानें उरलेल्या दोघांनीं एक दिवस अधिक विश्रांती घेतल्यामुळें ताज्यातवान्या अवस्थेंत पुन्हा शिखर-चमूस मदत करण्यास वर चढूं लागावयाचें असा चढाईचा आराखडा सुचविण्यांत आला. परंतु तेरे यांच्या सुचनेनुसार वेळांत बचत करण्यासाठीं व स्वतःच्या शक्तीचा उपयोग करून घेण्यासाठीं त्यांना एक दिवस अगोदर वर पाठविण्यांत आलें. त्या रात्रीं खूप हिमवृष्टी झाली.

उजाडल्यावर हेर्झोग गिर्यारोहकांची चढाई कशी चालली आहे यासाठीं डोळे ताणताणून पाहातात तो त्यांना तिसऱ्या तळावरून खालीं उतरणाऱ्या दोन मानवी आकृती दिसल्या. खरें म्हणजे मंडळीं चवथ्या तळाकडे चढतांना आढळावयाची. पण हें काय गौडबंगाल आहे तें हेर्झोग यांच्या लक्षांत येईना. दुपारच्या जेवणाच्या वेळेपूर्वीं श्री. लाचानेल आणि कौझी हे दुसऱ्या तळावर पोहोंचले. भयंकर हिमवृष्टी व हवामानां-तील बिघाड यांमुळें त्यांना डोकेदुखी व उलट्या यांचा कसा मरणप्राय त्रास झाला त्याचें वर्णन त्यांनीं केलें. तेरे तिसऱ्या तळावर पोहोंचल्यानंतर उरलेली मंडळी चवथ्या तळावर जाण्याबद्दल विचार करणार होती. इकडे दुसऱ्या तळावर दावा थोंडुप पोटदुखीनें तळमळत पडला होता. त्याची पहिल्या सोबतीबरोबर पहिल्या तळाकडे रवानगी करावयाची होती. दुपा-रचें भोजन रंगलें होतें अशा अवस्थेंत आंग दावानें तंबूत डोकावून दुसरा गोरा खालीं उतरून आल्याची वर्दी दिली. बाहेर हिमवृष्टी चालूच होती. आपले शीततारोधक कपडे घालून हेर्झोग बाहेर पडले. दहा गजांपलीकडे

कांहीं दिसत नव्हतें. कोणाच्या तरी हांका कानीं पडत होत्या. हेर्झोग यांनीं प्रतिसाद घातली. आणि या साद-प्रतिसादांच्या मदतीनें दिशेचा अंदाज घेत एखाद्या पिशाच्चाच्या अवतारांत शाट्झ् हेर्झोग यांच्यासमोर उभे ठाकले !

" रेबूफा कुठें आहे ? " या हेर्झोग यांच्या प्रश्नाला " मी एकटाच उतरून आलों. " असें उत्तर शाट्झ् यांनीं दिलें.

अशा हवेंत आणि त्या जबड्यांच्या वखवखलेल्या प्रदेशांत एकट्यानें तिसऱ्या तळावरून उतरून येणाऱ्या शाट्झ्चा हेर्झोग यांना राग आला. पण कांहीं न करण्याच्या अवस्थेंत केवळ तेरे-रेबूफांना भारभूत होण्यापेक्षां खालच्या तळावर यावें या विचारसरणीनें शाट्झ् यांनीं हा धोका पत्करला होता ! आणि दुसऱ्या दिवशीं तेरे-रेबूफांची जोडी पुढें नेटानें वर वर जाणार होती.

इकडे नॉइली यांनीं साधनसामग्रीसकट वरच्या तळाकडे जाण्याची योजना व्यवहारांत उतरविण्यास सुरुवात केली होती. त्यामुळें अन्नाचा तुटवडा पडण्याची शक्यता नामशेष झाली होती.

३० मे रोजीं सकाळीं लाचानेल यांना रेबूफा आणि तेरे हळूहळू शेर्पासकट वर चढतांना दिसले. त्यांची चाल मंद होती. हिमाचा जाड थर त्यांच्या चढाईंत अडथळा आणीत होता. तेवढ्यांत मिरिस्ती खोऱ्यांतून निळसर धुकें तरंगत वर आलें. हें सुचिन्ह होतें.

अंधार पडण्यापूर्वीं दुर्बिणींतून चवथ्या तळाकडे दृष्टिक्षेप केला तों तेथें कांहींच हालचाल नव्हती. याचा अर्थ मंडळींनीं रात्रीच्या विश्रांतीस सुरुवात केली होती. आतां दुसऱ्या दिवशीं पांचवा तळ ठोकण्याची धडपड ! या दृष्टीनें चवथ्या तळावर हालचाल नव्हती हेंच अधिक धीर देणारें होतें.

३० तारखेस पायतळावरून नॉइली आदींची चिठ्ठी श्री. हेर्झोग यांना आली. मोसमी पर्जन्यानें कलकत्त्यावर वृष्टि केली होती. याचा अर्थ ३–४ दिवसांत तो अन्नपूर्णेवर अभिषेक करणार होता. हाताशीं वेळ अगदीं मर्यादित आणि यश दोनच बोटें पलीकडे दिसत असलेलें ! याशिवाय नॉइली यांच्या चिठ्ठीनुसार परतीच्या प्रवासासाठीं आत्तांपासून हमालांची व्यवस्था तर करणें भाग होतें.

३१ तारखेस सकाळीं हेझोंग व लाचानेल तिसऱ्या तळाकडे जावयास निघाले. ते तसेच पुढें रेटणार होते. शाट्झ् व कौझी यांची तिसरी तुकडी मुक्रर झाली होती. चढाईला सुरुवात करण्यापूर्वीं त्यांनीं डेव्हिस् यांना तार पाठविण्यासाठीं पुढील मसुदा खालच्या तळावर पाठविला :

" अन्नपूर्णेवर स्वारी करीत आहोंत. हिम व बर्फावरील वाट बिकट आहे पण प्रगति जलद आहे. हिमकडे व हिममनोरे यांपासून धोका विशेष नाहीं. पहिला तळ–१६,७५०फूट, दुसरा–१९,३५० फूट, तिसरा–२१६५० फूट, चवथा–२३,५०० फूट. यशाची आशा आहे. प्रकृतिस्वास्थ्य आणि निर्धार उत्तम.–मॉरिस हेझोंग. "

याशिवाय हेझोंग यांनीं अन्न, बिनतारी यंत्र, मोसमी वाऱ्यासंबंधीं सूचना, परतीची तयारी इत्यादिबद्दलचे आपले आदेश खालच्या तळावर कळविले.

हेझोंग आणि लाचानेल यांची जोडगोळी मोठ्या हिमजबड्याला वळसा घालून हिमनगशंकूकडे जाऊं लागली तोंच लाचानेलला वरच्या तळाकडून मंडळी खालीं उतरत असलेली आढळली. त्या काळ्या ठिपक्यांकडे पाहात तो उद्गारला, " मॉरिस्, ही काय भानगड आहे ? "

" खरंच, ते खालीं उतरत आहेत...." त्या घटनेचें पुरतें आकलन न होतांच हेझोंगनें उत्तर दिलें.

आणि पुढें या जोडीची उतरणाऱ्या जोडीशीं गांठ पडली. त्यांनीं चवथ्या तळावरील हवामानाबद्दल आत्मविश्वासाला धक्का देणारी हकीगत सांगितली. भयंकर हिमाच्या पसाऱ्यांत अतिशय धोका पत्करून त्यांनीं आदली रात्र कशीबशी काढली होती व अखेर यशाची आशा सोडून देऊन ते दोघे परत फिरले होते. पण तरीहि हेझोंग यांचा निर्धार अविचल होता. ते म्हणाले, " आम्ही वर जाणार आणि आम्ही जेव्हां परत फिरूं तेव्हां शिखर पादाक्रांत झालेलेंच असेल, यांतच काय तें समजा. " लाचानेल यांचा निर्धार हेझोंगच्या निर्धाराला साथ देत होता. रेबूफा व तेरे यांनीं त्या दोघांना सुयश चिंतिलें आणि लाचानेल व हेझोंग, सरकी आणि अंगथार्के यांच्या-बरोबर पुढें निघाले. उन्हाचे चटके बसत होते. चढाईहि कठीण होती. अगदीं घामाघूम होऊन सर्वजण कसेबसे तिसऱ्या तळावर पोहोंचले. आतां हिमाच्या अवस्थेंत थोडी सुधारणा झाली होती. आणखी चार तासांत चौथा

तळ गांटणें शक्य वाटत होतें. चौथा तळ ऐन विळ्याच्या हिमनदीवर वसवला जाईल असा वर सरकवावयाचा होता. रात्रीं अंगथार्के व सरकी जुन्या चौथ्या तळावर यावयाचे होते. त्यांच्यासाठीं एक तंबू तेथेंच ठेवला होता. नव्या चौथ्या तळावरून दुसऱ्या दिवशीं सकाळीं हेर्झोग-लाचानेल ही जोडी पांचवा तळ ठोकण्यासाठीं पुढें जाणार होती.

प्रथम लादलेल्या गाढवांप्रमाणें आपलीं ओझीं घेऊन त्यांना कंबरेपर्यंत खोल हिमांतून मार्ग काढावा लागला. पण होतां होतां हिम कमी कमी होऊं लागलें व त्यांना आपल्या कीलपादत्राणांवर विसंबून पुढें जातां आलें. ता जूनची २ तारीख होती. दोन शेर्पा आणि दोन फ्रेंच गिर्यारोहक मूर्तिमंत यशापुढें उभे ठाकले होते. २४,६०० फूट उंचीवर पांचवा तळ तर उभा केला गेला होता. आतां दुसऱ्या दिवशीं शिखर ! हेर्झोग यांनीं अंगथार्के व सरकी यांनाहि दुसऱ्या दिवशीं शिखरावर बरोबर नेण्याची तयारी दाखविली. परंतु अंगथार्के याचे पाय गोठूं लागले होते त्यानें हेर्झोग यांना धन्यवाद दिले व शिखराकडे न जातां चौथ्या तळाकडे उतरण्याची इच्छा प्रदर्शित केली. भारवाहकांनीं ते कसलेले गिर्यारोहक नसतांनाहि कठीण चढण चढून पांचवा तळ गांठला होता हीहि कांहीं कमी प्रतीची मर्दुमकी नव्हती. अंगथार्के यांच्या इच्छेनुसार त्याला चौथ्या तळावर जाऊं देण्यास हेर्झोग यांची कांहीच हरकत नव्हती. त्यामुळें अखेर त्या गिर्यारोहक व भारवाहक यांच्या जोड्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला. ऐन यशाच्या समोर येऊन ठेपल्यामुळें दोन गिर्यारोहक शिखराशीं हस्तांदोलन करण्यास उतावीळ झाले होते, तर शिखरावर विजय मिळविण्याची संधि समोर चालून आली असतांना दोन भारवाहक " कांहींशा दूरदर्शीपणामुळें " शिखराकडे व पर्यायानें यशाकडे पाठ फिरवून खालच्या तळावर परतत होते ! हा दोन मनोवृत्तींच्या घडणींतीलच मूलभूत फरक होता ! !

पांचव्या तळावरची ती रात्र म्हणजे चेटकिणीची रात्र होती. वाऱ्यानें हिम घरंगळत खालीं येत होते व तंबूच्या एका कडेवर त्याचा सारा भार पडत होता. बर्फांत ठोकलेल्या तंबूच्या मेखा या हिमाच्या वजनानें निखळून आल्यास सर्वच रामायण आटोपणार होतें ! आणि तंबू ज्या चौथऱ्यावर उभा केला होता तो चौथराच घरंगळला तर ?—या भेडसावणाऱ्या

जाणिवांमुळें हेझोंग व लाचानेल एकमेकांशीं अवाक्षरहि बोलत नव्हते. भयंकर वादळी वाऱ्यावर तंबू फडफड करीत होता आणि वाऱ्याचा झोत आला कीं, आधारासाठीं तंबूचे खांब घट्ट धरून गिर्यारोहकांची जोडी भ्रामक आसऱ्यावर विसंबत होती. त्या रात्रीं त्यांना त्यांच्या तंबूचा निर्माता पियरी ॲलॅं याची कृतज्ञतापूर्वक आठवण झाली. लाचानेल चौथ्याच्या कडेवर झोपले होते तेथून ते घसरले असते तर एखाद्या उल्केप्रमाणें ते अंतराळांतच फेकले गेले असते. त्यांच्या उलट हेझोंग सांठणाऱ्या हिमाच्या दडपणाखालीं जणूं अधिकाधिक गाडले जात होते आणि त्यामुळें त्यांना साधा श्वासोच्छ्वास करणेंहि दुरापास्त झालें होतें. ती रात्र दोघांनीं घड्याळाकडे पाहात पाहात घालविली.

हेझोंग आणि लाचानेल शिखरावर धडक मारण्यापूर्वीची रात्र पांचव्या तळावर घालवीत होते, त्याच वेळीं एक तळ पाठीमागें कौझी आणि शाट्झ् ठरल्याप्रमाणें येऊन टेपले होते व त्यांच्या मागोमाग रेबूफा आणि तेरे यांनींहि चौथा तळ गांठला होता. हिमालयावरील हवामानच असें लहरी ! चार दिवसांपूर्वीं याच जोडगोळीला मोठ्या मुष्किलीनें सात तासांत तिसरा तळ गांठून निराशेनें परतावें लागले होतें व आज त्यांनीं सकाळीं ११ वाजेपर्यंत तळ क्रमांक २ ते ३ चें अंतर तोडलें होतें. एवढेंच नव्हे तर सर्व साहित्य घेऊन दोन भारवाहकांसमवेत त्यांनीं चौथा तळहि गांठला होता !

३ जून १९५० रोजीं सकाळीं साडेपांचला चहापान वगैरे कसलाच उपद्व्याप न करतां हेझोंग व लाचानेल चढाईच्या उद्योगाला लागले व आपलीं कील पादत्राणें चढवून त्यांनीं सहा वाजतां शिखरासाठीं प्रस्थान ठेवलें. त्यांनीं चढण्यासाठीं दोरहि बरोबर घेतला नव्हता.

लाचानेल यांच्या पायाला हिमदाहाचा त्रास होऊं लागला. त्यांना पायाचीं सर्व बोटें हिमदाहांमुळें झडलेल्या *लॅंबर्ट या स्विस् गिर्यारोहकाची आठवण झाली " या हिमदाहाची किंमत देण्याइतकें अन्नपूर्णा गिर्यारोहणाचें यश अमोल आहे का ? " असा प्रश्न मोहिमेचे नेते या दृष्टीनें साहाजिकच श्री. हेझोंग यांच्या मनांत डोकावून गेला.

* याच लॅंबर्टनीं तेनसिंग नोर्केबरोबर मे १९५२ मध्यें शैल राधानाथावर २८,२१५ फूट उंची गांठली होती.

तेवढ्यांत लाचानेल यांनीं मर्मभेदक प्रश्न विचारला, " समज, मी आतां परत फिरलों तर तूं काय करशील ? "

या प्रश्नानें हेर्झोग यांना ब्रह्मांड आठवलें ! यशाच्या इतक्या निकट पोहोंचल्यावर यशाकडे पाठ फिरवावयाची म्हणजे मोहिमेंतील सर्व सदस्यांचे इतके परिश्रम मातीमोल करण्यासारखें झालें असतें. सर्व स्वप्नांचा मुलामा एकाएकीं उडून गेला असता. लाचानेल यांना काय उत्तर द्यावें ? या, प्रश्नानें निमिषार्धातच हेर्झोग यांच्या मनांतून स्पष्ट, निःसंदिग्ध शब्द उमटले— " मी शिखराकडेच जाणार ! तुझा विचार ठरविण्याचें स्वातंत्र्य तुला आहे. तुला जें योग्य वाटेल तें तूं कर. "

आणि लागलीच लाचानेल यांचें प्रत्युत्तर आले, " तर मग मीहि तुझ्या मागोमाग शिखराकडेच येणार ! " निर्धार सांच्यांत ओतला गेला होता. मनाचें वातावरण एकाएकीं बदललें होतें. दोन भाऊ जणूं निर्धारानें शिखर गांठण्यासाठीं खांद्याला खांदा लावून पुढें पुढें पावलें टाकीत होते !

अखेरीस शिखरांवरील चढाईचा शेवटचा अडथळा आला. हिमसंपथांतील रंगीत प्रस्तरांची ती अखेरची चढण. कील पादत्राणांमुळें प्रस्तर टाळून बर्फावरून जाण्याची खटपट करावी लागत होती. आणि अखेर दुपारीं २ वाजतां हेर्झोग व लाचानेल २६,४९२ .फूट उचीच्या अन्नपूर्णा शिखरावर उभे ठाकले. अभिमानानें आणि आनंदानें त्यांचा ऊर भरून आला. आतां वर आकाशाखेरीज कांहीं उरलें नव्हतें ! खालीं अर्ध्या उंचीवर तरंगणाऱ्या ढगांनीं पोखारा खोऱ्यावर दुशाला पसरली होती. हेर्झोग व लाचानेल यांनीं फ्रेंच राष्ट्रध्वज व इतर निशाणांची माळ हिमकुठारीच्या दांड्याला बांधून एकमेकांच्यीं छायाचित्रें घेतलीं. हेर्झोग यांचें छायाचित्रणांचें वेड संपेचना. अखेर भोंवती भरून येणाऱ्या दुश्चिन्ह-हवेमुळें अस्वस्थ होऊन लाचानल म्हणाले, " चल आटप लवकर. तुला वेड तर लागलें नाहीं ना ? आपल्याजवळ वाया घालवायला आतां एक क्षणहि नाहीं. आपल्याला परतलेंच पाहिजे ! "

१९५० पर्यंत सर झालेल्या शिखरांत अन्नपूर्णा अत्युच्च होतें. हेर्झोग यांच्या मनांत ममरी, मॅलरी व इर्विन, बॉऊअर, वेल्झेनबाख, टिलमन्, शिप्टन् आदि पट्टीच्या गिर्यारोहकांच्या स्मृति पिंगा घालूं लागल्या.

अन्नपूर्णेवर हेझोंग-लाचानेल जोडगोळीनें विजय मिळवला नव्हता तर हें शिखर पादाक्रांत झाल्यामुळें अन्नपूर्णेवरील ' फ्रेंच मोहीम यशस्वी ' झाली होती.

लाचानेलनें खालीं उतरण्यास सुरुवात केली. हेझोंग यांनीं बाटलींतील दूध पिऊन बाटली शिखरावर खूण म्हणून ठेवली व ते लाचानेलला गांठण्यासाठीं झपाझप उतरण उतरूं लागले. एकाएकीं त्यांचे दोन्ही हातमोजे घरंगळत खालीं गेले. हेझोंग पांचव्या तळावर पोहोंचले त्या वेळीं त्यांच्या दोन्ही हातांचीं बोटें जांभळीं झालीं होतीं.

पांचव्या तळावर तेरे व रेबूफा यांनीं अत्यानंदानें हेझोंग यांचें स्वागत केलें. परंतु थोड्याच वेळांत बाहेर लाचानेल यांच्या मदतीसाठीं हांका ऐकूं येऊं लागल्या. ते घसरून १०० गज खालीं गेले होते. तेरे यांनीं प्रयत्नांची शिकस्त करून त्यांना तंबूंत आणलें. बाहेर वादळाचें तांडवनृत्य चालू होतें आणि दोन सोबती यश गांठून आलेल्या दोन सहकाऱ्यांच्या हिमदग्ध हातापायांत जीव आणण्याचा तंबूंत प्रयत्न करीत होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हवाहि फारच खराब होती व शिवाय हेझोंग–लाचानेल यांना तेरे-रेबूफा यांची खालीं उतरून जाण्यासहि मदत नितांत आवश्यक होती. त्यामुळें ते दोघेहि सकाळ होतांच दोन दोर तयार करून आपल्या असहाय जोडीदारांसह खालीं उतरूं लागले व त्या दोघांनीं शिखर पादाक्रांत करण्याची चालून आलेली संधि त्यागपूर्वक हातचीं जाऊं दिली. परत उतरतांना वादळामुळें व धुक्यामुळें दिशेचा आणि रस्त्यांचा अंदाज येईना व पांचव्या तळावरून चौथा तळ सांपडेना. हिमपातालाहि याच वेळीं भरतें आलें होतें. शिवाय या दोन दोरांवर मिळून फक्त दोनच हिम-कुठारी होत्या सर्व प्रयत्न करूनहि चौथ्या तळाचा मार्ग सांपडेना. अखेर सर्वांनीं मिळून मदतीसाठीं साद घालावयाची आणि मोहिमेंतील दुसऱ्या एखाद्या सदस्याच्या कानीं ती पडलीच तर कुठल्या ना कुठल्या तळावर पोहोंचतां तरी येईल असा सर्वमतानें विचार ठरला. एक दोन...तीन... करून सगळ्यांनीं एकजुटीनें एका स्वरांत मदतीसाठीं साद घालायची असा प्रयोग करून पाहिला तथापि त्या वैराणतेंत त्या हांका कोणाच्या कानीं पडेनात. तीन दिवसांत हेझोंग-लाचानेल यांनीं कांहीं खाल्लें नव्हतें. परतु तरीहि या मरणप्राय संकटांत त्यांच्यांतील जिगीषा नेट धरून होती. रात्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वत्व.
अनुक्रम....33018.... दि ....2-4-2014
वर्गांक ....2...



येत होती तथापि तंबूचा पत्ता नव्हता. आतां रात्रभर एखाद्या हिमभग-दाडांत आसरा घेऊन बसणें व दिवस उजाडण्याची वाट पाहाणें आवश्यक होतें. उतरणीवर उघड्यावर रात्रभर जिवंत राहाणेंच अशक्य होतें. कोठें-तरी तात्पुरता आसरा शोधणें भाग होतें.

तेरे आपल्या हिमकुठारीनें एक खड्डा खणूं लागले; पण तेवढ्यांत लाचानेल एका हिमजबड्यांत पडले व नाहींसे झाले. ते जेथून आंत पडले तेवढें बिळासारखें तोंडच काय तें उघडें होतें. बाकी हिमभेग हिमानें बुजली होती. तेरे यांनीं लाचानेलना हाका मारून तें कुठें आहेत त्याचा पत्ता काढला. दोराला झटके दिले तेव्हां खालून लाचानेल यांचें उत्तर आलें, " मी इथें आहें " तेरे यांनीं विचारलें, " कांहीं दुखापत झाली नाहीं ना ? " पुन्हा लाचानेल यांचें उत्तर आलें, " नाहीं. सर्व ठीक आहे. रात्रींला आसरा छान आहे. आंत या ! "

तेरे यांनीं धाडशीपणें हिमभेगेंत उडी मारली व उरलेल्या दोघांना आंत येण्यास आवाहन केलें. तें ३० फूट खोल भगदाड होतें. चौघेहि आंत कडबोळें करून बसले वरून लटकणारे हिमलोलक चोखून त्यांनीं आपली तहान भागविली. ती रात्र त्यांनीं त्याच भगदाडांत काढली. तेरे यांनीं आपली झोपण्याची पिशवी तिथेंच उलगडली. तेरे आळीपाळीनें लाचानेल व हेर्झोग यांना मालिश करून त्यांचा हिमदाह वाढणार नाहीं अशी खबर-दारी घेत होते. दिवस उजाडला तेव्हां त्याच्या प्रकाशाबरोबरच एका गड-गडणाऱ्या हिमनगाबरोबर घसरलेलें बर्फ या भगदाडांत धस्सकन् आलें आणि त्या खालीं चौघेहि गिर्यारोहक अर्धवट गाडले गेले. कसेंबसें उठून त्यांनीं तें हिम झटकलें. त्या हिमाच्या ढिगाऱ्यांतून त्यांनीं आपले जोडे शोधण्यास सुरुवात केली होती. डोळ्यांवरील गारेचे चष्मे काढून ठेवल्यामुळें तेरे व रेबूफा यांना हिमांधत्व आलें होतें.

स्वतःला दिसत नसल्यानें हवामान कसें काय आहे म्हणून तेरेनीं रेबू-फांना विचारलें. तों त्यांनीं उत्तर दिलें, " मला तर कांहीं दिसत नाहीं. वादळ मात्र जोरांत आहे. " तेरे प्रथम त्या भगदाडांतून बाहेर गेले व त्यांनीं लाचानेल यांना बाहेर ओढलें. हेर्झोग यांनीं मोठ्या मुष्किलीनें त्या हिमाच्या पसाऱ्यातून पादत्राणें शोधून काढलीं. त्यांचा चलच्चित्र प्रतिमाग्राहक

मात्र त्यांना हिमाच्या पसाऱ्यांत सोडावा लागला. तेरे यांनीं हेझोंग यांनाहि बाहेर काढलें तेरे व रेबूफा या सशक्त आंधळ्यांना हेझोंग व लाचानेल या डोळस शक्तिहीनांचें मार्गदर्शन असा त्यांचा त्या उतरणीवर प्रकार झाला होता. हेझोंग यांनीं जीवनाची आशाच सोडली होती व केवळ तेरे यांच्या चिवटपणामुळें ते खुरडत उतरणीवरून खालीं उतरत होते. लाचानेल यांना खोल खालीं दुसरा तळ दिसत होता व तेथे ऐकूं जाईल या वेड्या आशेनें ते मदतीसाठीं साद घालीत होते. अखेर शाट्झ् ताज्या हिमाच्या ढिगांतून हळूहळू वर चढून आले व त्यांनीं हेझोंग यांना आधार देऊन खालीं नेण्यास प्रारंभ केला व जीवदान दिलें.

शाट्झ, रेबूफा, हेझोंग व लाचानेल खालच्या चौथ्या तळाकडे जावयास निघाले. तेरे यांनाहि हिमदाहाची व्यथा सुरू झाली होती व इतरांना डॉ. औडोंकडे शक्यतों लवकर जाऊन आपली व्यथा बरी करण्याची चिंता लागली होती. त्याउलट काय भलें बुरें व्हायचें असेल तें इथेंच अशा वृत्तीनें तेरे वरच्या चौथ्या तळावरच राहावयाच्या बिचारांत होते. " मला उद्यां येथून न्या. एकतर धडपणें उतरावें किंवा इथेंच मरावें असें माझें मत आहे," त्यांनीं ठामपणें सांगून टाकलें. रखडत खुरडत डॉक्टरपर्यंन्त जाण्याची त्याच्या मनाची तयारी नव्हती. रेबूफा, लाचानेल व कौझी यांनीं एका दोरावर खालीं उतरण्यास सुरुवात केली व शाट्झनें हेझोंग यांचा ताबा घेतला. चौथ्या तळानंतर हेझोंग यांना ऐला व सरकी या शेर्पांच्या स्वाधीन करून शाट्झ, अंगाथार्के व पणसी तेरेला आणण्यासाठीं वरच्या चौथ्या तळाकडे गेले. तेरेला घेऊन येण्यापूर्वीं शाट्झ् यांनीं तीस फुटी भगदाडांत शिरून हेझोंग यांचा प्रतिमाग्राहक हिमाच्या ढिगाऱ्यांतून शोधून आणला.

हवा इतकी गरम होती कीं अन्नपूर्णेच्या महाभारतावर तिथेंच पूर्णविराम पडतो कीं काय अशी हेझोंग यांना धास्ती वाटूं लागली होती. इतकें कडक ऊन व आदल्याच दिवशीं पडलेलें भरमसाट हिम यांतून आगामी संकटांची चाहूल हेझोंग यांना लागत होती. सूर्याच्या उन्हांतील तिरीप गारांचा चष्मा लावल्यावरहि डोळ्यांना एकप्रकारचें हिमांधत्व आणीत होती जणूं. लाचा-नेल यांना वारंवार विश्रांतीसाठीं टेकावें लागत होतें. त्यांच्या डोळ्यांवरहि

हिमांधपणाचा थोडा परिणाम झाला होता. रेबूफांना हिमदाह आणि हिमांधत्वाचा असह्य त्रास होत होता व तो त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्टपणें चित्रित झाला होता.

एकाएकीं शेर्पांच्या पायाखालची जमीन दुभंगली व त्या भेगेचा जबडा होऊं लागला. ऐला आणि सरकी एकाएकीं दिसेनासे झाले व त्या झटक्यानें हेर्झोग साष्टांग बर्फावर पडले. ऐला व सरकी यांच्या वजनामुळें हेर्झोग यांच्या गळ्याला दोराचा फास लागूं लागला व ते हिमावर गडगडत ठेचाळत खालीं जाऊं लागले. थोड्याच वेळांत गळ्याभोंवतींच्या दोराच्या फासामुळें हेर्झोग डोकें खालीं व पाय वर अशा अवस्थेंत एकाद्या लंबकाप्रमाणें खालीं लोंबकळूं लागले दोर एका कण्यावर स्थिरावला होता आणि त्याच्या दोन टोकांना अनुक्रमें ऐला सरकी आणि हेर्झोग यांचीं ओझीं लोंबकळत होती. ऐला व सरकी यांनीं वर येऊन मोठ्या शिताफीनें हेर्झोग यांना वर खेंचून काढलें. केवळ परमेश्वरी कृपेनें या कोसळणाऱ्या हिमनगाच्या संकटांतून मंडळी सुखरूप बाहेर पडलीं. या मोजक्या क्षणामधें पुनर्जन्मापूर्वीं काय यातना सोसण्याची वेळ हेर्झोग यांचेवर आली असेल तें त्यांच्याच शब्दांत वाचण्यानें अधिक योग्य कल्पना येईल. हेर्झोग म्हणतात :

सूर्य चांगलाच वर आला होता. हवा उत्तम होती आणि संपथ चांगल्या अवस्थेंत होता. या पराकोटीच्या संकटाच्या क्षणांत मला पर्वत जितके सुंदर दिसले तेवढे सुंदर ते मला कधींच दिसले नव्हते.

एकाएकीं शेर्पांच्या पायांखालीं एक भेग दिसली आणि ती मोठी व अधिक रुंद झाली. माझ्या डोक्यांत एक वेडसर कल्पना चमकून गेली.—पटकन् मागें वळून चढण चढून जावी नि ठाम असलेल्या भागावर पोहोंचावें. पण तेवढ्यांत, मी अमानुष ताकदीनें उचलला गेलों आणि माझ्या डोळ्यांसमोर शेर्पा अदृश्य होत असतांनाच मीहि कोलांटी खाऊन कोसळलों. काय होत होतें तें मला समजत नव्हतें. माझें कपाळ बर्फावर आदळलें. प्रयत्न करूनहि मला श्वासोच्छ्वास करतां येईना; आणि डाव्या मांडीवर अचानकपणें बसलेल्या तडाख्यामुळें मला तीव्र वेदना होऊं लागल्या. एखाद्या टांगलेल्या बाहुलीप्रमाणें मी गरगर फिरत होतों. माझ्या डोळ्यां-वरून घसरणाऱ्या हिमांतून एकाएकीं मला सूर्याच्या तळपणाऱ्या उन्हाची

जाणीव झाली. सरकी व ऐला यांच्याशीं मला जोडणारा दोर माझ्या गळ्याला विळखा घालीत होता—खोलखोल गर्तेत कोसळणाऱ्या शेर्पांमुळें माझ्या गळ्याला दोरखंडाचा फास लागून माझा गळा आवळला जात होता. पुन:पुन्हा मी कडक बर्फावर आदळत होतों आणि एका हिममनोऱ्या-वरून दुसऱ्या हिममनोऱ्याकडे गडगडत जात होतों. इतक्यांत अचानकपणें माझ्या गळ्याभोंवतींचा दोर अधिकच आवळला गेला आणि मी गडगडा-यचा थांबलों. काय झालें तें मला समजण्यापूर्वी मला अनावरपणें जोरदार लघवी होऊं लागली.

"मीं डोळे उघडले. डोकें खालीं पाय वर अशा अवस्थेंत एखाद्या लंबकाप्रमाणें मी लोंबत होतों. दोर माझ्या गळ्याभोंवतीं गुंडाळला होता व माझ्या डाव्या पायाभोंवतींहि त्याचा विळखा पडला होता. मी निळ्या-हिमाच्या खाचींतच जणूं लोंबकळत होतों. माझें हिंदकळणें थांबवण्यासाठीं मी कोंपरे ताणून भिंतीवर आदळत होतों. तेवढ्यांत मला खालच्या बाजूला हिमसंपथाचा उतार दिसला. माझा श्वास संथ झाला आणि एवढ्या भयं-कर झटक्यांत न तुटतां शाबूत राहिलेल्या दोरखंडाला मीं धन्यवाद दिले.

"आतां बाहेर निघण्याचा प्रयत्न करण्यावाचून गत्यंतर नव्हतें माझे हातपाय थिजले होते. पण भिंताडांतील कांहीं कंगोऱ्यांचा मी उपयोग करूं शकत होतों माझ्या पादत्राणांच्या कडेपुरती आधाराला जागा होती माझ्या झटकेदार धडपडीमुळें मला एकदांचा दोरखंडांतून माझा डावा पाय मोकळा करून घेतां आला. आणि मग सरळ अवस्थेंत येऊन मी एक-दोन गज उंची चढून गेलों. दर हालचालीनंतर मी थांबत होतों; आणि माझी खात्री पटत होती कीं, माझ्या शरिरांतील शक्तीचा अखेरचा कण संपुष्टांत आला होता आणि क्षणार्धांत मला जग सोडून द्यावें लागेल.

आणखी एक निर्वाणीचा प्रयत्न केला नि मी आणखी कांहीं इंच वर आलों— दोरावर मीं जोर लावला आणि एकाएकीं दुसऱ्या टोंकाला कांहींतरी निसटल्यासारखें मला वाटलें— शेर्पांचीं शरीरें ! मीं ओरडण्याचा प्रयत्न केला, पण कुजबूजच काय ती माझ्या तोंडावाटे बाहेर पडली. मृत्यूची शांतता पसरली होती. गॅस्टाँ ( रेबूफा ) कुठें होता ?

एखाद्या तरंगणाऱ्या ढगाच्या सांवलीचा भास झाल्यामुळें मीं स्वाभाविकच

वर पाहिलें, आणि काय चमत्कार ! घाबरेघुबरे झालेले दोन काळसर चेहरे मला त्या उघड्या भगदाडांतून निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसले. ऐला नि सरकी ! ते सुखरूप आणि धडधाकट होते आणि लागलीच ते माझ्या सुटकेच्या उद्योगाला लागले होते. त्यांना थोडासादेखील सल्ला देण्याच्या अवस्थेत मी नव्हतों. भगदाडाच्या तोंडाशीं सरकीला ठेवून ऐला नजरेआड झाला. त्यांनीं मला इजा होऊं नये अशा बेतानें हळूहळू दोर ओढण्यास सुरुवात केली. आणि दमदारपणें त्यांनीं मला वर ओढून घेतलें. त्यामुळें मला विश्वास वाटूं लागला. अखेर मी बाहेर आलों. मी हिमांत निपचित पडलों.

दोर एका बर्फाळ डोंगरकडेवर अडकला होता आणि आम्ही दोन बाजूंना लोंबकळत होतों; सुदैवानें दोन शेर्पांच्या वजनाला माझ्या वजनानें तोलून ठेवलें होतें. असें जर आम्ही सांवरले गेलों नसतों तर आम्ही १५०० फूट खोल फेंकले गेलों असतों. आमच्या भोंवतीं सर्व अस्ताव्यस्त झालें होतें; रेबूफा कुठें होता ? मला आत्यंतिक काळजी लागली, कारण तो दोराशिवाय होता. मीं नजर वर वळवली; तो सुमारें १०० गज अंतरावर होता.

" कांहीं इजा झाली का ? " त्यानें मला ओरडून विचारलें.

मला अगदीं हायसें वाटलें, पण ओरडण्याचें व उत्तर देण्याचें त्राण माझ्यांत नव्हतें. निपचित पडून मी शून्य नजरेनें सभोंवारच्या अस्ताव्यस्तते-कडे पाहात होतों.

आम्ही सुमारें ५०० फूट गडगडत आलों होतों. ती रेंगाळत थांबण्या-साठीं फारशी सुखरूप जागा नव्हती—तेवढ्यांत दुसरा हिमकडा कोसळला असता तर ?—मीं शेर्पांना ताकीद दिली—

" चला, डॉक्टरकडे. लवकर, अगदीं लवकर ! "

मीं खुणांनीं सांगितलें कीं, त्यांनीं आतां मला पक्कें धरलें पाहिजे. पण माझ्या लक्षांत आलें. माझा डावा हात निकामी झाला होता. मला तो हलवतां येईना. माझें कोंपर अवघडलें होतें—तें मोडलें तर नव्हतें ? तें लव-करच समजणार होतें. आतां आम्हांला औडोंपर्यंत पोहोंचणें आवश्यक होतें.

रेबूफा आतां खालीं उतरूं लागले. त्यांना हिमांधत्व आलें असल्यामुळें चाचपडत, अडखळत पावलें टाकावीं लागत होतीं. शिवाय तेहि हिम-नगाच्या धडपडाटांत आपटल्यामुळें त्यांच्या जिवणींतून रक्त वाहात होतें !

या गोंधळांत रेबूफा व हेझॉग या दोघांचेहि गारेचे चष्मे नाहींसे झाले होते. ऐलाजवळ एक जुना गारेचा चष्मा होता तो त्यानें हेझॉग यांना दिला. रेबूफांची शोचनीय अवस्था पाहून सरकीनेंहि तात्काळ आपला स्वतःचा गारेचा चष्मा रेबूफांना दिला.

दुसऱ्या तळावरच्या बर्फाच्या भिंताडावरून उतरतांना दोरावर लोंबकळत उतरणें भाग होतें. हेझॉग यांना आधींच घेऱ्या येत होत्या. हिमदाहामुळें पाय थिजले होते व सुजलेहि होते. हिमपातावरून ते बधीर पाय घसरत होते. हातांत दोर पकडण्याचेंहि त्राण त्यांच्यांत उरलें नव्हतें. पण अशा अवस्थेंत आपल्या भुजांनीं दोरखंडाचा आधार घेत झटक्या झटक्यानें हेझॉग खालीं उतरत होते. भुजांची कातडी सोलली जाऊन ती दोरखंडाला चिकटत होती, हाताचें मांस उघडें पडत होतें; पण आतां पूर्ण हिमप्रपात उतरून जाणें भागच होतें, अर्ध्या उंचीवर हातपाय गाळण्याची शक्यता नव्हती. शेवटचे सुमारें तीन फूट राहिले तेव्हां हेझॉग एकाएकीं धपकन् खालीं आले. त्यांच्या आधींच बधीर झालेल्या हिमदग्ध पायांना या पडण्यामुळें चांगलाच धसका बसला. खरें म्हणजे त्यांचें त्राण संपुष्टांत आलें होतें. आणखी एक तासांत तळ गांठला नाहीं तर जिथें पोहोंचले असूं तिथेंच हिममय शांततेंत झोंपावयाचें असा विचार हेझॉग यांनीं केला.

दुसरें भिंताड अधिक उंच होतें. प्रथम हेझॉग यांनीं सरकी व ऐला यांचा दोर खालीं सोडावयाचा व ते उभे राहूं शकतील अशा उंचीवर पोहोंचले म्हणजे त्यांनीं आधार दिलेल्या दोरावरून आपण खालीं उतरावयाचें असें हेझॉग यांना ठरवावें लागलें. परंतु ऐला व सरकी उतरूं लागतांच दोरांचें असें असह्य वजन हेझॉग यांच्या हातांवर आलें कीं, दोर सोडला तर ऐला व सरकी यांच्या प्राणांना धोका व धरला तर हात कापले जाण्याची भीति अशी अवस्था झाली. एक एक इंच म्हणजे यातनांची परमावधी अनुभवणें असा या निर्धाराचा अर्थ होता. पण हेझॉग यांचा निर्धार प्रबळ होता. त्यांचे हात रक्तबंबाळ झाले होते व त्या रक्तानें दोर रंगत होता. अखेर त्यांनीं आपलें पोट, खांदे वगैरे शरीराच्या इतर भागांचा आधार देऊन सरकी व ऐला यांना बांधलेला दोर ते खालीं उतरतील तसतसा सोडण्यास सुरुवात केली. हेझॉग स्वतः बर्फावरून थोडे

थोडे घसरत होते. हिमांत ते कंबरेपर्यंत रुतले होते. आणखी थोडा वेळ–आणि ते कड्यावरून कलंडणार होते !

" जलदी... सरकी... ऐला !... " ते गांगरून ओरडले. ऐला व सरकी अधिकच भरभर उतरूं लागले. त्यामुळें दोरहि अधिक गतीनें घासूं लागला. अखेरचे तीन यार्ड ! हेर्झोग एकाएकीं कोसळले. पुन्हा त्यांनीं अर्धवट डोळे उघडले तेव्हां त्यांच्याभोंवतीं रेबूफा व शेर्पा होते. दोन काळे ठिपके दुसऱ्या तळावरून वर येत असलेले दिसत होते. ते हिमनगशंकूच्या पायथ्याशीं आले होते.

तेवढ्यांत हिमसेकास सुरुवात झाली. अतिशय बिकट वाटेनें लांब वळणें, वांकणें घेत खालीं उतरतांना हेर्झोग यांना प्रत्येक पाऊल अखेरचें असल्या-सारखें वाटत होतें. अखेरीस ते हिमनगशंकूजवळ येऊन पोहोंचले. फुथार्के व आंगदावा द्रुतगतीनें वर चढून येत होते. कांहींतरी वाईट बातमी ऐक-ण्याची त्यांना अपेक्षा असावी. आंगदावाच्या मनांत त्याचे दोन भाऊ ऐला व पणसी यांच्याबद्दल चिंता असणें स्वाभाविक होतें. त्या दोघांना येतांना पाहून हेर्झोग यांच्या जिवांत जीव आला. आणि या दोन शेर्पांच्या मदतीनें ते दुसऱ्या तळावर येऊन पोहोंचले. त्यांच्या अंगांत ताप भरला होता !

अन्नपूर्णा शिखर पादाक्रांत करून एक फ्रेंच वीर परत आला होता. नेपोलियनच्या सैन्यांतील शिपायांची रशियावरील स्वारीनंतर झाली तशीच त्याचीहि अवस्था झाली होती. पण नेपोलियनचें सैन्य पराभव पावून परत फिरलें होतें तर या फ्रेंच वीरांची चमू विजयी होऊन परत आली होती ! हेर्झोग यांच्या पाठोपाठ रेबूफा व नंतर तेरे हे दोन हिमांध दुसऱ्या तळावर येऊन पोहोंचले हिमदाह आणि हिमांधत्व यामुळें त्यांची चांगलीच परवड झाली होती तरीहि तेरे दुरूनच ओरडत आले, " माझं सर्व ठीक आहे. मला दिसत असतं तर कुणाच्याहि मदतीशिवाय खालीं उतरूं शकलों असतों." ही घोषणा करतांनाहि त्यांच्या दुःखाकुल चेहेऱ्यावर एक विचित्र हास्य होतें.

तेरे यांच्यामागोमाग शाट्झ आणि कौझी येऊन पोहोंचले. आणि सरतें शेवटीं लाचानेल यांना दोन शेर्पांनीं जवळ जवळ उचलूनच आणलें. आणखी एक तासभर या यातना सहन करण्याची पाळी आली असती तर लाचा-नेल यांचें प्राणोत्क्रमणच झालें असतें. तरी ते इशाकृना म्हणत होते,

" बघायचंय आल्प्स्मधल्या शामोनीचा ( Chamonix ) वाटाड्या कसा हिमालयावरून येतो तें ? " मरणान्तिक वेदनांनीं व्याकुळ झालेले लाचानेल मोठ्या मुष्किलीनें आपलें पाऊल पुढें झटकीत होते व प्रत्येक पावलागणिक त्यांच्या मलूलपणें लोंबणाऱ्या डोक्याला हिसके बसून तें डोकें मागेंपुढें हिंदकळत होतें !!

आतां सर्वजण दुसऱ्या तळावर येऊन पोहोंचले होते. मोसमी पर्जन्यानें आभाळ फाटण्यापूर्वी त्या सर्वांना आपला गाशा गुंडाळून आतां परतीच्या प्रवासाला लागणें आवश्यक होतें.

* * *

प्रकरण चवथें :

# परतीची वाटचाल

दुसऱ्या तळावर परतीच्या वाटचालीची तयारी चालू असताना त्याच तळावर दुसऱ्याच एका नाटकालाहि चांगलाच रंग भरला होता. श्री. मॉरिस हेर्झोग यांच्या हिमदाहाची अवस्था अत्यंत गंभीर स्वरूपाची होती व एका तंबूचें इस्पितळ बनवून डॉ. औडो हेर्झोग यांना नसांत मोठमोठी इंजेक्शनें देत होते व कुठल्याहि प्रकारची बेशुद्ध करण्याची व्यवस्था नसल्यानें हीं असह्य इंजेक्शनें घेतांना हेर्झोग यांचे प्राण कासावीस होत होते. दुसऱ्या तंबूंत श्री. लाचानेल व रेबूफा यांनाहि वैद्यकीय मदत दिली जात होती.

मांडवपरतणीची तयारी होतांच तिन्ही रुग्णांना ओढगाड्यांवर घालून नेण्याची व्यवस्था करण्यांत आली. यांशिवाय दोघांची अवस्था कुणाच्या ना कुणाच्या मदतीनें रखडत चालण्यासारखी होती. उरलेले चौघे मात्र पूर्णपणें धडधाकट होते. मोसमी पर्जन्याचीं पावलें हिमालयाच्या छायेंत येऊन पोहोंचलीं होतीं आणि त्या बिकट ऋतूंत अद्यापि मैलचे मैल हिमनद तुडवावयाचे होते, खडकाळ भिताडें ओलांडावयाचीं होतीं, प्रस्तर पसारे आणि दऱ्याखोऱ्यांच्या उतरणी पार करावयाच्या होत्या. एक नदी उल्लंघून जावयाची होती आणि एक १३००० फुटी खिंडहि मागें टाकावयाची होती ! एक आठवड्याच्या अवधींत या सर्व यमलोकींच्या पसाऱ्यांतून इहलोकांत प्रवेश करणें आवश्यक होतें. अन्यथा मोसमी पर्जन्याच्या संपूर्ण तावडींत सांपडून हाल होण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. इतरांची प्रकृति हळूहळू सुधारत होती, परंतु हेर्झोग यांचीं किती बोटें तोडून टाकावीं लागणार व आणखी कशाकशाला काट मिळणार हें अद्यापि अनिश्चित होतें. अशा परिस्थितींत हेर्झोग यांच्या भावी जीवनाचें स्वरूप आणि भवितव्य हीं कृष्ण मेघांनीं दगाळलेल्या आकाशासारखीं होतीं. वाटेंत हेर्झोग यांच्या हातापायांना इंजेक्शनें द्यावीं लागत होतीं व दरवेळीं ते त्याच भयंकर दिव्यांतून जात होते. तशांतहि त्यांचें हिमांधत्व नाहींसें झालें नव्हतें. त्यामुळें कायकाय होतें आहे तें सर्व त्यांना अंध धृतराष्ट्राप्रमाणें इशाकच्या 'संजय उवाचां' तूनच ऐकावें लागत होतें.

पहिल्या तळावर प्रथमच चढाईतील सर्व सदस्य व शेर्पा एकत्र आले होते. त्यामुळें जवळ असलेला एकमेव ' कोंबडी ' चा डबा आणि एकमेव ' शांपेन ' ची बाटली यांच्या सुखांत फ्रेंच चमूनें अन्नपूर्णा शिखरावरील यशाची घटना साजरी केली. त्याच दिवशीं टपाल नेणाऱ्या इसमाबरोबर डेव्हिस यांना पाठविण्यासाठीं तारहि लिहून देण्यांत आली. " १९५० ची फ्रेंच हिमालय चमू यशस्वी. अन्नपूर्णा शिखर ३ जूनला सर झालें— हेर्झोग. "

अन्नपूर्णा यशाचा जल्लोष संपला नि पुन्हा हेर्झोग यांच्यावर शस्त्रक्रिया नि इंजेक्शनें यांचें सत्र सुरू झालें. अत्यंत हाल होत असल्यामुळें साश्रु नयनांनीं हेर्झोग आपलें गिर्यारोहकांचें जीवन सरल्याची जाणीव बोलून दाखवीत होते आणि लियोनेल तेरे अश्रुभरल्या नयनांनींच सहानुभूती-पूर्वक त्यांना जिव्हाळा देत होते, धीर देत होते. ९ ऑगस्ट रोजीं हेर्झोग यांच्या डोळ्यांची पट्टी निघाली. त्यांचें हिमांधत्व नाहींसें झालें होतें. बरेच दिवसानंतर भोंवतालचें विश्व पहाण्यांतील त्यांचें सुख कल्पनातीत होतें.

मजल दरमजल करीत मोहीम पायतळावर येऊन पोहोंचली होती. अद्यापि आकाशवाणीवर दिल्लीहून प्रक्षेपित होणारें हवामानाचें पत्रक फ्रेंच मोहिमेसाठीं ध्वनिपेक्षित केलें जात होतें. १० जून रोजीं मोसमी पर्जन्य पूर्व हिमालयांत येऊन धडकणार होता.

हेर्झोग व लाचानेल या दोघांना अद्यापि उचलून न्यावें लागत होतें. इतर मंडळी आपापल्या पायांवर उभीं होतीं. मिरिस्ती खोरें, शाड्झिड खोरें असे टप्पे गांठीत मंडळी लेतेच्या जंगलांत येऊन पोहोंचली. मोठ्या मुष्कि-लीनें प्रवासांतील कठिण भाग संपला होता. हेर्झोग यांच्या अंगांत मात्र आतां १०५° ताप होता व ते ग्लानींतच होते. त्यांच्यावर पेनिसिलिनचा मारा चालू होता. हेर्झोग यांच्यावर मृत्यूची छाया पडली होती जणूं ! त्यांना डोंगर बोलल्याचा भास होत होता, वारा शीळ घालीत होता अन् तिथेंच हिमालयाच्या छायेंत एका ढिगाराभर दगडांच्या थडग्यांत क्रूसाखालीं हेर्झोग यांचा देह कायमचा विसांवणार अशीं लक्षणें दिसत होतीं.

परंतु याहि मृत्यूच्या पिंजऱ्यांतून हेर्झोग निसटले. आतां मोहीम तांदळाच्या शेतांतून, केळ्यांच्या मळ्यांतून पुढें चालली होती. हिमालयाची

उत्तुंग शिखरें कुठल्या कुठें मागें पडलीं होतीं. चोया, दाना, बाङ्क अशीं खेडीं मागें टाकीत टाकीत मोहीम गंडकी पार करून पुढें आली. मोहीम मनुष्यवस्तीकडे–सुधारणेकडे वाट चालत होती आणि वेळाशीं चढाओढ लावून बेकाम होणारीं हेर्झोग यांचीं बोटें शस्त्रवैद्य औडो यांना एकामागून एक कापून टाकावीं लागत होतीं. लागवडीच्या कामांमुळें ओझीं वाहून नेणारे हमाल दुर्मिळ झाले होते आणि जो कोणी धडधाकट माणूस सांपडेल त्याला जबरदस्तीनें वेठीस धरावयाचा असें तंत्र शेर्पा अवलंबीत होते. असेंच होतां होतां मोहिमेनें तानसिंग गांठलें व भारतीय लोहमार्गा-वरील गोरखपूर या स्थानकावरून सामान रवाना करण्याची व्यवस्था करण्यासाठीं पुढें गेलेले नॉइलीहि पुढील बुटवंल या मुक्कामापूर्वी परत मोहिमेस येऊन मिळाले. ६ जुलै रोजीं नौतनवा स्थानकावर गाडीचे डबे मिळणार होते. त्याच दिवशीं सकाळीं मोटारी मिळाल्या. त्या प्रलयी पाव-सांतून धडपड करून एकदाचें नौतनवा स्थानक गांठण्यांत आलें व आपल्या दोन राखीव डब्यांतून आपल्या लव्याजम्यानिशीं मोहीम गोरखपूरकडे रवाना झाली. आतां सर्व सदस्यांचे डोळे फ्रान्सकडे लागले होते.

अन्नपूर्णेकडे फ्रेंच मोहीम रवाना होण्यापूर्वीं हेर्झोग यांनीं नेपाळच्या महाराजांना परततांना भेटावयाचें कबूल केलें होतें. त्यांच्याबरोबर औडो, इशाक् व नॉइलीहि खाटमांडूला जाणार होते. बाकी मंडळी दिल्लीकडे रवाना व्हावयाची होती. रेबूफा यांना थंड हवेसाठीं मसुरीसारख्या एखाद्या ठिकाणीं पाठवावयाचें होतें. दोन तासांनंतर लाचानेल यांच्याकडे शस्त्रवैद्य लक्ष देऊं शकणार नसल्यामुळें आगगाडीच्या डब्यांतच लाचानेल यांच्या उजव्या पायांवर शस्त्रक्रिया करून त्यांचीं बोटें कापून टाकण्यांत येत होतीं. त्यांच्या उजव्या पायाचीं दोन बोटें तर कापून झालीं होतीं. उरलेल्या दोन तासांच्या प्रवासांत आणखी तीन बोटें कापावयाचीं होतीं. गाडी चालू असतांना शस्त्रक्रियेची सर्व तयारी करून ठेवण्यांत येई व एखाद्या स्थानकावर गाडी थांबली कीं औडो यांची कात्री आपल्या कामास लागे !

गोरखपूरला ठरल्याप्रमाणें मोहिमेचे सदस्य दोन चमूंत वांटले गेले. खाटमांडूला जाणारे लोक पहाडी नेपाळमधील लोहमार्ग, मोटरमार्ग व अखेर दंडींतून, खांद्यावरून वाहून नेण्यांच्या सर्व सोपस्कारांतून आपला प्रवास

उरकून खाटमांडूला पोहोंचले. तेथें मोठा दरबार भरवून त्यांचा सत्कार करण्यांत आला. १२ जुलै रोजीं मंडळींनीं खाटमांडूचा निरोप घेतला.

आतां विमानाचा प्रवास आणि फ्रेंच मोहिमेचें फ्रान्सला प्रयाण! नंतर नातेवाईक आणि इष्टमित्रांच्या भेटी!! आणि लाचानेल व हेर्झोग यांची ही अशी दयनीय अवस्था! परंतु या सर्व दुःखांतून एक सुख डोकावत होतें— जीवन मरणाच्या सीमेवर उत्तुंगाशीं स्पर्धा–करीत त्यांनीं उत्तुंगावर विजय मिळवला होता; तोंवर पादाक्रांत झालेल्या शिखरांत सर्वोच्च म्हणून ओळखलें जाणारें अन्नपूर्णा शिखर त्यांच्या उत्तुंगतेपुढें ठेंगणें झालें होतें व या यशांतून लाभलेल्या नव्या आध्यात्मिक दृष्टिकोनांतून आतां हे अन्नपूर्णा विजेते आयुष्यांतील इतर अन्नपूर्णांवर विजय मिळविण्याची उमेद बाळगीत होते!

* * *

## पूर्व नंदादेवी सर्ग

नेता : श्री. रॉजर डचुप्ला.

आरोग्याधिकारी : डॉ. लुइ पायाँ.

छायाचित्रकार : श्री. जीन-जाकीज लांगुपिन्.

संपर्काधिकारी : कॅप्टन् नंदू जयाल ( हिंदी सैन्याधिकारी .

गिर्यारोहक : सर्वश्री गिल्बर्ट व्हिग्ने, लुइ गेव्हिल, पॉल गेंडर्
लुइ डचूबो, ॲलें बर्बेझा.

भारवाहकांचा सरदार : श्री. तेनसिंग नोर्के.

भारवाहक : सर्वश्री *पणसी, दा नोर्बू, पा नोर्बू,
*आंगदावा,* सरकी, ग्यालझेन्, दा नामग्याल.

---

* या शेर्पांनीं अन्नपूर्णा मोहिमेंतहि भाग घेतला होता.

प्रकरण पहिलें :

# नंदादेवी

अन्नपूर्णा विजेता वीर मॉरिस हेर्झोग फ्रान्समधील रुग्णालयांत अद्यापि खितपत पडले होते. त्यांच्या दोन्ही हातांचीं व पायांचीं बोटें कापून टाकण्यात आलीं होतीं. व त्यांच्या रुग्णशय्येभोंवतालीं बसून कांहीं मित्रमंडळी त्यांचे अन्नपूर्णेवरील रोमांचकारी अनुभव ऐकत होती. या श्रोत्यांत रॉजर डय़ुप्ला, जीन–जॉकीज् लांगुपिन् आदि गिर्यारोहक होते. त्यांच्या डोक्यांत नंदादेवी शिखरावरील चढाईचे बेत रंगत होते.

'अन्नपूर्णा' हें शिवपत्नी, हिमालयकन्या पार्वतीचें नांव. सकलजनावर तुष्टिपुष्टींची खैरात करते तेव्हां ती अन्नपूर्णा; पण तीच रुद्र स्वरूप धारण करते तेव्हां तिचेंच नांव दुर्गा. ही युद्धदेवता; या अवतारांतच ती काली या नांवानें ओळखली जाते आणि उत्पत्ति–स्थिति–लय यांपैकीं 'लया' चा ईश्वर–महेश, शंकर–याची पत्नी म्हणून ती सार्थवती ठरते. तिचेंच आणखी एक नांव नंदा; नंदादेवी ! गढवाल प्रदेशांतून नंदादेवीकडे जातांना नदी पार करतांना खिंड ओलांडून जातांना कुठें याग तर कुठें प्रस्तरांच्या मनोऱ्यावर लावलेला आपलाहि छोटा दगड असे नजराणे देत देतच नंदादेवीच्या परिसरांत पोहोंचण्याची धार्मिक प्रथा आहे. मारटोळी गांवांतील एका देवळांत तर दरवर्षीं सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्याच्या सुमारास या हिमालयकन्या–महेशपत्नी–नंदादेवीला दहा रेडे व तीनशें बोकड 'दिले' जातात ! ही लक्षावधि लोकांची देवता नंदा ज्या शिखरावर वास करून राहाते त्या शिखराकडे गिर्यारोहणासाटीं मोहीम नेण्याचा बेत डय़ुप्ला आदि फ्रेंच गिर्यारोहकांनीं पक्का केला होता. अन्नपूर्णेनें यशाचें माप हेर्झोग यांच्या मोहिमेच्या पदरांत टाकलें होतें. आतां नंदादेवीची कृपादृष्टि होते किंवा काय हें अजमावून पाहण्यासाठीं डय़ुप्लांची मोहिम हिमालयाकडे निघाली होती.

नंदादेवीचा गिर्यारोहण-इतिहास थोडक्यांत असा होता :
१८३० सालीं ट्रेल यानें नंदादेवी व नंदकोट शिखरांना जोडणारा प्रपाती उंचवटा ( १६,५०० फूट उंच ) पार केला होता. १८५५ सालीं भूगोल-

शास्त्री श्लागिंटवैट बंधूंनीं कामेत शिखरावर चढाई करण्याच्या प्रयत्नाचे वेळीं नंदादेवीच्या परिसराचें पद्धतशीर संशोधन केलें होतें. १८८३ मध्यें इंग्लिश गिर्यारोहक ग्रॅहम यानें स्विस वाटाड्यांच्या मदतीनें प्रथमच नंदादेवीच्या परकोटांवर हल्ला चढविला होता; परंतु वसंतांत एका जलस्रोताच्या बाजूबाजूनें आक्रमण करींत असतां अलंघ्य गिरिभगदाडांनीं त्याला अडविलें होतें. हेमंतांत त्यानें पुन्हा वळसा घालून हा प्रदेश पार केला. पण पुन्हा त्याला थांबावें लागलें. त्याला नंदादेवी शिखर कधींच दिसलें नाहीं. १९०५ मध्यें आंग्ल गिर्यारोहक लॉंगस्टाफ यानें ब्रोशेरल बंधू आणि श्री. कौर्मायूर यांचेसह नंदादेवीवर पूर्वेकडून हल्ला चढवून एक प्रपाती उंचवटा गांठला व त्यास त्यानें 'लॉंगस्टाफ् प्रपाती उंचवटा' असें नांव दिलें. या उंचवट्यावरून त्याला नंदादेवीच्या दोन्ही शिखरांचें दर्शन झालें. परंतु आंतील हिमतसराळ्यांत उतरणें तितकें सोपें नव्हतें. त्यामुळें त्यानें या खेपेस माघार घेतली. पुन्हा १९०७ सालीं लॉंगस्टाफ् नंदादेवीच्या परिसरांत येऊन पोहोंचला; व त्यानें १८८३ सालीं ग्रॅहमनें अवलंबिलेल्या मार्गानें मजल दरमजल करीत ऋषिगंगा खोऱ्याचा भेद केला. आणि १२ जून रोजीं ब्रोशेरल बंधू व भारतीय गिर्यारोहक श्री. गुरखा करभार यांचे समवेत त्यानें २३,३६० फूट उंच त्रिशूळ शिखर सर केलें. तोंपावेतों मानवानें सर केलेलें जगांतील हें सर्वोच्च शिखर होतें. या विजयानें नंदादेविवर विजय मिळविण्याची अदम्य ईर्ष्या गिर्यारोहकांच्या मनांत प्रबळ झाली. एकामागोमाग एक मोहिमा गढवाल प्रदेशावर स्वाऱ्या करूं लागल्या व एकएक गढवाली दरीखोरें मानवाला ज्ञात होऊं लागलें. १९१० सालीं मीड यानें श्रोनेव्हाल येथील मार्गदर्शक पियरी ब्लॅक यांच्यासमवेत मोहीम नेली. १९११ मध्यें डॉ. केल्लास; १९१२ मध्यें पुन्हा मीड यानें स्विस् व इटालियन मार्गदर्शकांच्या मदतीनें कामेत शिखरासाठीं प्रस्थान ठेवलें. पण वाईट हवेमुळें त्यांना परतावें लागलें. १९१३ मध्यें त्यांनीं पुन्हा नवा प्रयत्न करून पाहिला. १९२० सालीं डॉ. केल्लास व मोर्सहेड यांनीं पुन्हा चढाई केली पण भोतिया भारवाहकांनीं पुढें जाण्यास नकार दिल्यामुळें त्यांना मागें परतावें लागलें.

अद्यापि शेर्पा भारवाहकांचे गिर्यारोहण-गुण गिर्यारोहकांच्या नजरेस आले नव्हते. हिमालयांतील कष्टप्रद प्रवासामुळें क्षीण होऊन अखेरीस त्यावर्षी डॉ. केल्लास यांनीं शैल राधानाथाच्या नजरेखालीं आपला पार्थिव देह तिबेटच्या भूमीवर ठेवला. २१ जून १९३१ रोजीं शिप्टन्, स्माइद् आणि होल्ड्स्वर्थ यांनीं आपल्या हिंदी सेवकांसमवेत २५,४४७ फूट उंचींचें कामेत हें एक शिखर काबीज केलें. आग्नेय दिशेस क्षितिजावर नंदादेवी शिखर ढगांत डोकें खुपसून उभें होतें. त्याकडे शिप्टन यांचें चित्त आकर्षित झालें. त्यांनीं टिलमन् यांच्या सहकार्यानें १९३४ मध्यें नंदादेवी शिखराकडे धडक मारली आणि ऋषि-गंगेच्चें खोरें पार करून एक रमणीय 'ओलाव्याची जागा' गांठली. हिमालयाच्या वैराणतेंत येथें वनस्पतीची सृष्टि हिरवा साज लेवून सजली होती. या जागेला त्यांनीं 'मृगवन' Sanctuary असें नांव दिलें.

पर्जन्यागमनामुळें शिप्टन्-टिलमन् यांना परत फिरावें लागलें. त्यांनीं पुन्हा हेमंतांत ऋषिगंगेच्या खोऱ्यांत भ्रमंति केली. पुन्हा १९३६ मध्यें टिलमन् यांनीं नंदादेवीकडे आपला मोर्चा वळवला. त्यांच्याबरोबर तीन आंग्ल व तीन अमेरिकन गिर्यारोहक साथीदार होते. २९ ऑगस्ट रोजीं टिलमन् व ओडेल् यांनीं नंदादेवीचें पश्चिम शिखर ( २५६६० फूट उंच ) सर केलें. १९३९ सालीं पोलिश गिर्यारोहकांनीं नंदादेवीचें पूर्व शिखरहि पादाक्रांत केलें होतें.

* * *

प्रकरण दुसरें :

# शिखराकडील वाटचाल

मॉरिस हेर्झोग यांच्या मोहिमेच्या विजयानें फ्रेंच गिर्यारोहकांना हिमालयानें वेड लावलें होतें. व अन्नपूर्णेपेक्षां उंच शिखर सर करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें ड्युप्ला यांची मोहीम मूलतः हिमालयाकडे आली होती. तथापि त्यांना संबंधित शासनांची परवानगी मिळालेली नसल्यानें या मोहिमेनें एका दमांत पूर्व आणि पश्चिम नंदादेवी शिखरें काबीज करण्याचें उद्दिष्ट आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें होतें.

● ● ●

मॉरिस हेर्झोग यांच्या अन्नपूर्णा मोहिमेचे सदस्य निवडतांना श्री. रोजर ड्युप्ला व श्री. जीन लांगुपिन् यांचीं नांवें राखीव गिर्यारोहक म्हणून विचारांत घेतलीं गेलीं होतीं. पुढें लांगुपिन् १९५० च्या ग्रीनलंड मोहिमेंत गेले, व तेथेंच त्यांना ड्युप्ला यांचें हिमालय-गिर्यारोहण मोहिमेविषयीं पत्र आलें. आणि हिमालयीन गिर्यारोहणांचीं चाकें फिरूं लागलीं. २३ मे १९५१ रोजीं नंदादेवी मोहिमेचे सर्व सदस्य दिल्ली येथें एकत्र आले.

या मोहिमेचा नेता मेजर ड्युप्ला हा शरिरानें दिसण्यांत जरा अशक्त व अस्वस्थ स्वभावाचा होता. १९४७ सालीं जीन-पॉल शार्ले, जेम्स कौटे आणि लुई लाचानेल यांच्याच समवेत तो फ्रान्समधील ' हौटे मोंटाने ' या संस्थेचा सदस्य बनला. त्याच्या पाठीशीं पंधरा वर्षांची गिर्यारोहण–तपस्या होती.

गिल्बर्ट व्हिग्ने हे तेवीस वर्षें वयाचे सशक्त गिर्यारोहक होते. त्यांची मुद्रा शांत आणि आत्मविश्वासी होती. फ्रान्समधील त्यांचें गिर्यारोहणांतील स्थान त्यांच्यापरीनें विशेष होतें. गिर्यारोहण हें त्यांच्या जीवनांतील स्वाभाविक आकर्षण होतें.

लुई ग्रेव्हिल हे एक पट्टीचे आल्पस्-गिर्यारोहक होते. स्वभावानें ते धिमे होते. त्यांच्यांत पद्धतशीरपणा होता, संघटनकुशलता होती आणि त्यामुळें साहजिकच मोहिमेच्या पूर्वतयारींत त्यांनीं मोठा वांटा उचलला होता.

पॉल गेंडर हा नंदादेवी मोहिमेंतील ' बच्चा ' गिर्यारोहक. त्याचें वय केवळ बावीस वर्षांचें, स्वभाव कोंवळा, भावनाप्रधान आणि थोडा फार गुलछबू.

लुई ड्यूबो हे चोवीस वर्षें वयाचे गिर्यारोहक बरेचवेळां गिर्यारोहणांत श्री. व्हिग्ने यांचेबरोबर भागीदारी केलेले होते. त्यांचीहि प्रकृति सुदृढ होती व स्वभाव विनोदी होता. गिर्यारोहण करतांना आपण सर्वांत पुढें असावें ही त्यांची प्रबल इच्छा.

ॲलें बर्बेझा हे २८ वर्षें वयाचे रसायन–शास्त्राचे अभ्यासक. त्यांचीहि वृत्ति शांत, स्वभाव अबोल.

या गिर्यारोहकांखेरीज या मोहिमेंत लिऑं येथील चिकित्सालयाचे प्रमुख शस्त्रवैद्य डॉ. लुइ पायाँ हे आरोग्याधिकारी म्हणून समाविष्ट झाले होते. ते पट्टीचे गिर्यारोहक नसले तरी युद्धकाळांत त्यांनीं आल्प्समध्यें लिओनेल तेरे या गिर्यारोहकाबरोबर दिवस काढले होते.

आणि या मोहिमेंतील छायाचित्रकार-गिर्यारोहक सदस्य श्री. लांगुपिन् हे एकमेव गृहस्थ लिऑं येथील रहिवासी नव्हते.

या मोहिमेची चमू सर्वसाधारणपणें उत्तम होती. चमूंतील सदस्यांना एकमेकांबद्दल सौहार्द आणि आदर होता. श्री. रोजर ड्युप्ला हे तर चमूं-तील सदस्यांचे अगदीं ' देव ' होते !

नव्या दिल्लींत आल्यावर फ्रेंच वकिलातीच्या मदतीनें मोहिमेनें संबंधित सरकारांकडून परवाने मिळविले. भारतीय सैन्याकडून संपर्काधिकारी म्हणून कॅप्टन नंदू जयाल यांचें सहकार्य मिळविण्यांत आलें. दार्जीलिंग येथून शेर्पा भारवाहक आले. त्यांचा प्रमुख, प्रसिद्ध गिर्यारोहक तेनसिंग नोर्के हा होता. हिमालय क्लबचे सदस्य प्रा. राहुल यांनीं दुभाषाचें काम करून शेर्पांची भरती करून दिली व त्यांचे पगार ठरवून दिले. अशा तऱ्हेनें भारवाहकांचा प्रमुख ( सरदार ) शेर्पा तेनसिंग याखेरीज या मोहिमेबरोबर पणसी, सरकी, आंग दावा, दा नोर्बू, ग्यालझेन, दा नामग्याल् हे भारवाहक होते. त्यांपैकीं पणसी, सरकी व आंग दावा यांनीं अन्नपूर्णा मोहिमेंतहि भाग घेतलेला होता.

२५ मे १९५१ रोजीं फ्रेंच वकिलातींत मोहिमेसाठीं ' खान्या 'चा सरंजाम केला होता. दुसऱ्या दिवशीं श्री. लांगुपिन् सोडून इतर मंडळी आपल्या चंबूगबाळ्यासकट दिल्लीहून कोटवाऱ्याला, रवाना झाली. श्री. लांगुपि

यांच्यावर ऑडिनन्स नकाशे शोधून करण्याची कामगिरी सोपविण्यांत आली होती. व ते लष्करी सहकारी श्री. हेन्री ड्यूमाँ यांचे बरोबर येऊन मुख्य चमूला गांठणार होते.

कमाऊन, अलकनंदा आणि मंदाकिनीच्या संगमावर वसलेलीं रुद्रप्रयाग, चामोली, पिपलकोठी, अशीं ठिकाणें आपल्या मोटार बस व नंतर खेंचरावरील प्रवासांत मागें टाकीत, लांगुपिन् व ड्यूमाँ यांनीं मुख्य मोहिमेस गांठलें व पुढें ही मोहीम जोशीमठ या गांवीं येऊन पोहोंचली.

३ जून रोजीं जोशीमठाहून निघून मोहीम अलकनंदा खोऱ्याच्या अनुरोधानें निति आणि तिबेटच्या रोखानें निघाली. आतां रस्त्याला मैलांचे दगड नव्हते. व्हिग्ने, गेंडर् व लांगुपिन् यांचेवर पुढील मुक्कामासाठीं जागा मुक्रर करण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली होती. स्वतः ड्युप्रा कारव्याच्या प्रगतीकडे बघत होते. आठ तासांच्या वाटचालीनंतर ऋषिगंगा नदी पार करून आघाडीची तुकडी लता खेडेगांवाजवळ आली या तुकडीजवळ नंदादेवी–विजेता श्री. टिल्मन् याचीं पुस्तकें होतीं. व त्या दिशेनें खाणाखुणा पटवून घेत मोहीम पुढें पुढें जात होती.

लता हें अत्यंत दरिद्री खेडें होतें. हंगामाचे दिवस असल्यानें तें बरेंच निर्जन झालें होतें त्या खेड्यांतील शाळेच्या चौकांत मोहिमेनें मुक्काम केला व जोशीमठाहून सर्व साधनसामग्री आणण्यासाठीं हमालांनीं दुसरी खेप करण्यासाठीं पुन्हा जोशीमठाकडे मोर्चा वळविला.

नंदादेवीचा पायथा गांठणें हें एक कठीणच काम होतें. शैल राधानाथ शिखर जरी जगांत सर्वोच्च असलें तरी त्याच्या पायथ्यापर्यंत पोहोंचणें फार सोपें आहे. खेचरें व याक यांचें लमाण शैल राधानाथाच्या थेट पायथ्याच्या तळापर्यंत पोहोंचूं शकतें. परंतु नंदादेवी मोहिमेला आपली सारी साधनसामग्री हमालांच्या डोक्यांवर वाहून न्यावी लागते. त्यामुळें त्यांची मर्जी असेल तोंपर्यंत मोहीम पुढें वाटचाल करते आणि त्यांचें शेपूट वांकडें झालें कीं मग तेथें अक्कलहुशारी, युक्तिवाद कशाचीच मात्रा चालत नाहीं. ड्युप्रा यांच्या मोहिमेला मोसमी पर्जन्याची डोक्यावर लोंबकळणारी आपत्ति लक्षांत घेऊन जलद हालचाल करणें भाग होतें. तथापि हमाल अडल्यानंतर या गिर्यारोहकांना रडकुंडीस येण्याखेरीज कांहीं करतां येत

नव्हतें. स्वतः गिर्यारोहक नि शेर्पा भारवाहक यांनीं मोठमोठालीं ओझीं उचलून वाटचाल करण्याचा चंग बांधला. तरी या घटनांनीं या आडमुठ्या हमालांच्या मनांत स्फूर्तीचें वारें संचारण्याचीं लक्षणें दिसेनात.

लता खेड्यांतून एकाला तिबेटमध्यें पाठवून हमालांची भरती करण्याची खटपट करण्यांत आली. व व्यवस्था होईपर्यंत त्या खेड्यांतच मुक्काम ठोकण्यांत आला. बर्बेझांचा गुडघा सुजला होता. त्यांनाहि दोन दिवस विश्रांतीची आवश्यकता होती. लता खेड्यांत कधींहि वैद्यकीय मदत मिळाल्याचें चिन्ह दिसत नव्हतें. मोहिमेबरोबर डॉक्टर आहेत हें कळतांच खेडुतांनीं मदतीसाठीं एक रीघच लावली.

४ जून रोजीं ड्यूबो आणि हमालांची एक तुकडी जोशी मठाहून अखेरचें सर्व सामानसुमान घेऊन लता खेड्यांत येऊन पोहोंचली दुसऱ्या दिवशीं सकाळीं आणखी नवीन एकोणीस हमाल येऊन पोहोंचतील अशी बातमी तेनसिंगांनीं जाहीर केली. सर्वच गिर्यारोहक पुढच्या मुक्कामाकडे जावयास उत्सुक होते. पण पहिल्या तुकडींत ग्रेव्हिल, व्हिग्ने, गेंडर आणि लांगुपिन्, यांचा समावेश करण्यांत आला. फ्रेंच वकिलातींतील ड्यूमॉं येथून बद्रिनाथमार्गें दिल्लीस परतणार होते.

शेतें, झाडेंझुडपें मागें टाकीत टाकीत ५ जून रोजीं आघाडीची तुकडी पुढें पुढें जात होती. हळूहळू झाडेंझुडपें कमी कमी होत होतीं. व अधिकाधिक कठीण चढणी लागत होत्या. रस्ता असा ओळखायला ‘ मार्गावरील खुणा ’ कांहींच नव्हत्या. परंतु एका ओझेवाल्याला हा मुलुख माहीत होता. होतां होतां ही मंडळी ७४५० फूट उंचीवरून १२०२५ फूट उंचीवर चढून आली. सभोंवतालीं पिवळ्या ऱ्होडोडेन्ड्रॉनचें ‘ बन ’ फुललें होतें ! गवताळ पठारावर पोहोंचतांच शेर्पांनीं थकव्याची पर्वा न करतां विस्तव पेटवून चहा तयार केला आणि मुक्कामासाठीं तंबू ठोकले ! मोहिमेंतील फ्रेंच गिर्यारोहकांचा या शेर्पा मंडळींशीं प्रथमच या मोहिमेच्या निमित्तानें परिचय झाला होता. पण हे शेर्पा म्हणजे निव्वळ पैशाच्या मोबदल्यांत काम करणारे, भारवाहक नव्हेत, ते नोकर नसून जोडीदार आहेत, सहाध्यायी आहेत; याची जाणीव गिर्यारोहकांना पदोपदीं होत होती.

दुसऱ्या दिवशीं पहाटे साडेपांचला छावणी जागी झाली. उत्तरेकडे

बर्फाळ शिखरें उभीं ठाकलीं होतीं. या उंचीवरून शिखरें अमर्यादपणें रुंदावली असल्याची जाणीव होत होती. लांगुपिन् कण्यावरूनच पुढें चालूं लागले. त्यांच्या उजव्या अंगास ६००० फूट खोल ऋषिगंगा खळाळत होती. आणि डाव्या अंगास ६०० फूट खालीं हमालांचा जथा एका रांगेत एका मागून एक ओझीं वाहून वाटचाल करीत होता. दुपारीं दोन वाजतां लांगुपिन् एका भगदाडाशीं येऊन पोहोंचले. गेव्हिूलहि त्यांना येऊन मिळाले. हमाल वाटेंत सारखे थांबत होते व पुढें जाण्यास कांकूं करीत होते. हा मार्ग योग्य नव्हताच. मोठ्या मिनतवारीनें हमालांना ओझीं उचलावयास लावून कसेंबसें शंभर गज अंतर तोडलें नाहीं तों चमू भुसभुशीत हिमसंपथांत येऊन पोहोंचली. हमालांनीं पुढें जाण्यास साफ नकार दिला ! गेव्हिूल यांनीं रस्ता तयार केला, आणि व्हिग्ने यांनीं नाना खाणाखुणा आणि भाषणांनीं ओझेवाल्यांच्या मनांत निर्धार जागविण्याची शर्थ केली व अखेर त्यांचे हात धरून त्यांना दहा फूट रुंद संपथांतून पार केलें. पण कांहीं यार्ड अंतर गेल्यावर पुढें प्रगति करणें खरोखरच बिकट आहे याची जाणीव होतांच त्यांनीं आपलीं ओझीं खालीं उतरविलीं आणि एका वर्तुळांत बसकण मारून त्यांनीं बैठा सत्याग्रह सुरू केला.

प्रस्तराशीं आणि निसर्गाशीं झगडणाऱ्या गिर्यारोहकांवर आतां मानवी स्वभावाशीं झगडण्याची वेळ आली होती. हवा अधिकाधिक थंड होत होती व भुरक्या ढगांतून हिमपात होत होता. खडकाळ उतरणीवर तंबू ठोकण्यासाठीं सोयीस्कर जागाहि नव्हती. तेथें मुक्काम करणें अशक्य होतें. हमाल थकले होते व थंडीनें गारठून गेले होते. त्यांचा पुढारी त्यांच्यावर कुठलाहि अधिकार गाजवूं शकत नव्हता. पणसीनें धाकदपटशा दाखवून त्यांना कामाला लावण्याचा प्रयत्न केला. गेव्हिूल यांनीं आरडाओरड करून आणि सुस्त हमालांना थोडें हलवून त्यांना उभें करण्याचा सपाटा चालविला. एकाएकीं हमालांनीं आपलीं ओझीं उचललीं व खोऱ्याचा रस्ता धरला. हां हां म्हणतां तीनशें फूट अंतर उतरून मंडळी दरींत शिरली आणि पुन्हा हमालांनीं आपलीं ओझीं टाकून सत्याग्रहाचा नवा पवित्रा घेतला. समोर ६०० फूट उंचीवर मंडळींचें उद्दिष्ट असलेला प्रपाती उंचवटा होता. आणखी तासभराची वाटचाल, जेमतेम अर्ध्या मैलाचें अंतर,

आणि ते आपल्या मुक्कामीं पोहोंचणार होते. पण हमाल पुढें चलावयास तयार होईनात. तेव्हां गेव्हिल यांनीं स्वतः एकट्यानेंच पुढें होऊन प्रपाती उंचवटा गांठण्याचें ठरविलें. 'आपणांस वर पोहोंचल्याचें पाहिलें म्हणजे कदाचित् या हमालांना वर चढण्याचें अवसान येईल' अशी त्यांची विचारसरणी होती.

गेव्हिल वर गेले. त्यांनीं आरोळ्या ठोकल्या, खाणाखुणा केल्या. सिगारेट, रुपये, गोड बोलणीं, मिनतवाऱ्या...कशानेंहि हमालांना कामगिरीसाठीं उद्युक्त करतां येईना. अखेर गेव्हिल यांना परतावें लागलें. दा नोर्बूनें तिथेंच उतरणीवर तंबूसाठीं जागा केली आणि रात्रीचा तळ ६०० फूट खालीं तेथेंच ठोकावा लागला! दुसऱ्या दिवशीं सकाळचे साडेदहा वाजले तरी तळ हलण्याचीं लक्षणें दिसेनात. दोन शेर्पा आणि हमालांचा नायक एवढेच काय ते गिर्यारोहकांना साथ द्यायला होते. बाकी हमालांची पुढें येण्याची तयारी नव्हती. ते परत जायला उत्सुक होते. दा नोर्बूनें शिष्टाई करून व अधिक मजुरीचें आमिष दाखवून हमालांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण अखेर एकामागोमाग एक सर्व हमाल परत गेले आणि गिर्यारोहक, दोन शेर्पा आणि तो हमालांचा नायक एवढेच काय ते तेथें उरले.

गेव्हिल यांनीं व्हिग्ने यांचेवर लता खेड्याकडे परत जाऊन ड्युप्ला यांना सर्व अहवाल सादर करण्याची कामगिरी सोपविली व हमालांची व्यवस्था करण्यास सांगितलें.

उरलेल्या मंडळींनीं सर्व सामान 'प्रपाती उंचवट्या'वर नेण्यासाठीं दोन दोन खेपा केल्या व स्वतः गेव्हिल यांनीं तर तीन खेपा केल्या आणि प्रपाती उंचवट्यावर त्यांनीं छोटी छावणी उभी केली.

● ● ●

इकडे लता खेड्यांतहि ओझेवाल्यांची वाट पहात मंडळी कालक्रमणा करीत होती. निति खेड्यांतून हमालांची भरती करण्यासाठीं माणूस रवाना झाला होता. आणि तेवढ्यांत व्हिग्ने परत येत असल्याची बातमी ग्यालझेन यांनीं जाहीर केली. व्हिग्ने यांनीं ड्युप्लांना दुराशी प्रपाती उंचवट्याचे पलीकडे घडलेली सर्व हकीगत सांगितली. लता येथें सात हमाल होते. शिवाय

अनुक्रम ...३९२६.... वि... शिखराकेंडोले वाटचाल
क्रमांक ...३१३.... नों दि.

निति खेड्याहून हमालांची नवी कुमक येतांच व्हिग्ने यांनीं आपली हमालांची टोळी घेऊन निघावें असें ड्युप्लांनीं सुचविलें. परंतु १५ ऑगस्टपर्यंत नंदा-देवीचा तळ गांठावयाचा होता. त्यामुळें वेळ न घालवितां परत जावयाचें व जातांना लता खडक छावणीहून ड्यूबो सरकी नि त्यांचे सहकारी घेऊन पुढें व्हावयाचें असें व्हिग्ने यांनीं ठरविलें. आतां सर्व मिळून पुन्हा २३ हमालांचें छोटें सैन्य जमा झालें होतें. ८ जून रोजीं ही नवीन कुमक घेऊन व्हिग्ने दुराशी उंचवट्यावर पोहोंचले; परंतु वाटेंत १७ हमालांनीं गुंगारा दिल्यासुळें नवीन कुमकींतील सातच जण उरले होते. आतां गिर्यारोहकांनींहि आपले बोजे वाढविले व अधिक सामग्री आपल्या ओझ्यांत लादली. गेव्हिल यांना नायकाचें काम करून पुढचा मार्ग तयार करावयाचा असल्यामुळें त्यांनाच फक्त कमी वजनाचें ओझें देण्यांत आलें. हिमसंपथ आणि गवताळ उतरणी यांच्या चक्रव्यूहांतून कसाबसा मार्ग काढीत चमू पुढें पुढें रेटीत होती. मध्येंच उतरणीचें रूपांतर एखाद्या हवेंत लोंबकळत्या कड्यांत होऊन ढगां-वर तरंगणाऱ्या उतरणीवर चालल्यासारखें वाटत होतें; या प्रकाराला हमाल बिचकत होते ! अशाच प्रकारें होतां होतां १२००० फुटांवर 'धाराणसी तळ' उभारण्यांत आला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सरकी व हमाल प्रपाती उंचवट्यावरून उरलेली ओझीं आणण्यास गेले. गेव्हिल एकटेच पुढची वाट शोधणार होते व ड्यूबो, व्हिग्ने आणि लांगुपिन् यांना तो दिवस सभोंवारच्या सृष्टिसौंदर्याचें अव-लोकन करण्यास आणि पुढील मुक्कामासाठीं नेण्याच्या ओझ्यांची व्यवस्था लावण्यास मोकळा होता.

व्हिग्ने आणि लांगुपिन् यांनीं छावणीपासून सुमारें १०० यार्ड अंतरावर असलेल्या एका ओहोळावर स्नान केलें.

१० जून रोजीं लांगुपिन 'पडदा'-उंचवट्यावर ( Curtain col ) येऊन पोहोंचले. नंदादेवी शिखर नजरेआड लपविणाऱ्या या अखेरच्या उंचवट्याला प्रसिद्ध गिर्यारोहक एरिक् शिप्टन यांनीं हें नांव दिलें होतें. या उंचवट्यावरून सभोंवतालीं निराळाच निसर्गदेखावा दिसत होता. समोर पल्याड नंदादेवी पर्वत उभा होता. तो भारवाहक नि हमालांना जसा पवित्र वाटत होता तसा गिर्यारोहकांनाहि पवित्र होता. त्याच्या दर्शनानें सर्वांच्याच

हृदयांत आनंदाची एक लाट उसळून गेली. पडदा-प्रपाती-उंचवट्याचा उंबरठा ओलांडला कीं ज्यांत जगावेंसें वाटावें असें नवें जग सुरू होतें अशी स्वप्नमयी जाणीव गिर्यारोहकांना झाली. याच दरींत टिल्मनना सांपडलेलें तें नयनरम्य 'मृगवन' नंदनवनासारखें दडून बसलें होतें. त्या वनांतील गुलाबी-जांभळीं र्‍होडोडेन्ड्रॉनचीं फुलें, नाजुक थरथरतीं हिरवीं पानें, आणि त्यांच्या पार्श्वभूमीला असलेल्या हिममय शुभ्र पर्वतश्रेणी ! पहांटे हा नयनरम्य देखावा झिरझिरत्या धुक्याच्या पटलाआड लुप्त झालेला असे व दिवस वर वर येऊं लागला कीं आपला बुरखा फेकून देऊन तो सुंदर मेनकेप्रमाणें नयनांना मुग्ध करीत राही. आणि या स्वर्गीय मृगवनांत फ्रान्स, पुरुष व स्त्रिया, आणि गिर्यारोहकांना जें जें प्रिय होतें तें तें सारें या सर्वांचा विचार करण्यांत केवढा स्वर्गीय आनंद ओतप्रोत भरला होता ! या सर्वांचें वर्णन करण्यास कुठले तरी नवीनच शब्द हवे होते ! परंतु ते कुणासच सुचत नव्हते ! मृगवनाचें वर्णन खरोखरच शब्दातीत ! ! दररोज मजल दरमजल करीत मृगवनाच्या अगदीं जवळ जवळ मोहीम पोहोंचत होती.

आणि लता खेड्याहून नव्या हमालांच्या कुमकीबरोबर निघालेली बर्बेझा, पायाँ आदि मंडळीहि कूच करून ऋषिगंगेच्या खोऱ्याकडे वाटचाल करीत होती.

गेव्हिल आणि गेंडर् पुढें वाट शोधायला गेले होते. वाटेंत मार्गावरील खुणा म्हणून त्यांनीं लहान लहान दगडांच्या राशी रचून ठेवल्या होत्या. त्या खुणांच्या मदतीनें पुढें पुढें जात संकटमय वाटेनें आपलीं ओझीं पुढें नेत. तेरा तासांच्या वाटचालीनंतर उरलेली चमू या आघाडीच्या जोडीच्या तंबूशीं येऊन पोहोंचली. ऋषिगंगा आणि रमणी नद्यांचा संगम केव्हांच मागें पडला होता. गेव्हिल यांच्या तंबूंत सर्वांना त्या भागांत सांपडणाऱ्या निळ्या हरिणाच्या मांसाची मेजवानी मिळाली !

येथून गढवालमधील खेडूत हमाल एकाएकीं परत निघून गेले. कांहींहि करून त्यांचें मन वळविणें शक्य नव्हतें. त्यामुळें पुढच्या वाटचालींत गिर्यारोहक आणि शेर्पा भारवाहक यांनाच हमाली करून आपली सामग्री पुढें न्यावी लागली. गेव्हिल, गेंडर् आणि दोन शेर्पा पुन्हा पुढील मार्ग शोधण्यासाठीं आघाडीवर गेले होते.

१४ जूनचा दिवस उजाडला होता. त्याच दिवशीं मागें राहिलेली मुख्य चमू एकोणचाळीस हमालांचा ताफा घेऊन आघाडीच्या चमूला येऊन मिळाली. या आनंदांत नि समाधानांत सर्व परिश्रमांचा सर्वांना लागलीच विसर पडला. आणि खेळीमेळीच्या वातावरणाला पूर आला. सर्वजण पुलाच्या तळावर ( Bridge Camp ) एकत्र आले होते.

दुसऱ्या दिवशीं पावसानें झोड लावली. गवताळ उतरणीचें लवकरच चिखलांत रूपांतर झालें. मोठ्या कष्टांनीं मंडळी गोव्हिल यांनीं रचलेल्या एका प्रस्तरराशीपर्यंत येऊन पोहोंचली. तेथें त्यांना चिठी सांपडली; " चौथऱ्यावर पोहोंचण्याचा निष्फळ प्रयत्न केल्यावर आम्ही अखेर तळ ठोकीत आहोंत " ही चिठी वाचल्यावर आपणहि तळ ठोकावा कीं आणखी पुढें जावें या विषयावर मतें घेण्यांत आलीं. रात्र पडेपर्यंत जातां येईल तेवढें पुढें जावें असें सर्वांचें मत पडलें; त्याला अपवाद होते एकटे लांगुपिन्. सर्वसाधारणपणें पायाँ नि बर्बेझा हे त्यांच्याशीं सहमत होत परंतु आज त्यांचीहि साथ लांगुपिन् यांना मिळाली नाहीं. हमालांचा म्होरक्या काल्ू याला या विभागांतील १९३६ च्या टिल्मन मोहिमेच्या वेळच्या आपत्तींची आठवण होती. पण थोड्या सिगरेट्स् देतांच तोदेखील हमालांना पुढें हाकारूं लागला. हिमालयांतील पंचभूतांचा अवमान करणाऱ्या गौरवर्णियांना अद्दल घडवावयाची असेंच जणूं तेथील शक्तींनीं ठरविलें होतें. कारण एकाएकीं पावसाचा जोर दुप्पट झाला आणि वरून वाहणाऱ्या ओढ्यांचे बांध फुटले. अखेर सायंकाळीं पांचाच्या सुमारास तळ ठोकण्यासाठीं जागा तयार करण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं. हमालहि नाराजीनें ' साहेबां 'कडे पाहूं लागले. अखेर ड्यूबो यानें एक एक रुपया अधिक कबूल करून त्यांची तात्पुरती समजूत घातली.

१६ जून रोजीं हमाल पुढें जाण्यास तयार होईनात. तेवढ्यांत ड्युप्ला यांचा संदेश घेऊन एक निरोप्या आला. पायथ्याचा तळ लॉंगस्टाफ--प्रपाती उंचवट्यावरील तळ आणि चढाईचा पहिला तळ वसविण्याचें आघाडीच्या चमूचें उद्दिष्ट ड्युप्ला यांच्या हुकूमवजा संदेशानें पुन्हा प्रस्थापित केलें होतें.

' वाईट पट्टा ' या नांवानें ओळखली जाणारी चढण पार करून मंडळी १२६५० फूट उंचीवर आली. हीच १९३६ च्या मोहिमेची तळाची

जागा होती. सर्वत्र रंगीबेरंगी फुलांचे ताटवे फुलले होते. समोर नंदादेवी शिखराचें मनोहारी दर्शन घडत होतें. हमालांनीं नंदादेवी शिखरासमोर आदरानें साष्टांग दण्डवत घातले. लवकरच त्या उंचवट्यावर तळ उभारण्यांत आला. गेव्हिल यांनीं ठेवलेल्या हरिणाच्या मांसाची मेजवानी करण्यांत आली आणि रात्रीं हमालांच्या शेकोटीनें काळोखावर मयसृष्टि चितारली.

१७ आणि १८ जून रोजीं मोहीम 'मृगवनांतील' हिरवळीच्या रुजाम्यांवरच चालत होती जणूं. हिम नाहीं, कठिण चढणी नाहींत, संकटें नाहींत अशा सुखकर प्रवासांत मजल दरमजल करीत टप्पे मागें पडत होते मधेंच श्रीबहादुरानें बंदुकीनें निळ्या हरणाची शिकार केली होती तर एकदां गेव्हिल यांना 'का ऽ व,' 'का ऽ व' करणारा मोठा थोरला कावळा दिसला होता. होतां होतां १८ तारखेस सायंकाळीं मंडळी १६०७६ फूट उंचीवरील १९३६ च्या मोहिमेच्या तळावर पोहोंचली. येथें पंधरा वर्षांपूर्वीं उपयोगांत आलेली स्वयंपाकाचीं उपकरणीं, प्रायमस् स्टोव्ह, गंजलेले टिनचे डबे दुसऱ्या मोहिमेची वाट पाहात पडले होते. डोंगरमाथ्याच्या टोंकास कितार नांवाच्या शेर्पा भारवाहकाचें १९३६ सालीं उभारलेलें थडगें होतें. त्यांतच त्याची हिमकुठार रोवून ठेवलेली होती.

पायथ्याचा तळ गांठल्यामुळें सर्वांना निरतिशय आनंद झाला. नंदादेवीच्या निळ्या छायेंत मोहीम सुखरूपपणें पोहोंचली होती. आतां दुसऱ्या दिवसापासून प्रत्यक्ष नंदादेवीवरच्या चढाईस तोंड लागणार होतें.

***

प्रकरण तिसरें :

# लढा

१९ जून या दिवशीं पायथ्याच्या तळावर हालचाल सुरू झाली. त्यावेळीं बाकीचें विश्व अंधाराची काळी कांबळी पांघरून निद्रेंत सुस्त पडलें होतें. नाहीं म्हणायला बर्फाळ पर्वतावर वादळवाऱ्याचा धुडगूस चालला होता. या धुडगुसाची शिरशिरी नंदादेवी हिमनदीच्या थरथरींतूनहि जाणवत होती.

सकाळपासून सर्व मंडळी पर्वताशीं दोन हात करण्याची तयारी करीत होती. कोणी आपापलीं ' चिलखतें ' वापरून पाहण्याच्या ठेक्यांत ' वातरोधक ' कपडे चढवीत होते तर कोणाची आपलीं ' आयुधें ' वापरून पाहण्याची खटपट चालूं होती. कोणी आपले प्रतिमाग्राहक सुखरूपपणें पाठंगुळीस बांधावयाच्या ' पिट्टूं 'त ठेवीत होता; तर कोणाची बिनतारी यंत्र ' बोलकें ' करण्याची खटपट चालू होती. सुमारें दोन वाजतां आपापले शेर्पा घेऊन मंडळींनीं चढण चढावयास सुरुवात केली. प्रमुख हिमनदी म्हणजे एक बर्फ आणि खडक यांचा पसाराच होता. १७००० फूट उंचीवर ड्यूबो, गेंडर, आणि लांगुपिन् आपले शेर्पा घेऊन नव्या जगाचीं क्षितिजें कुतूहलपूर्वक पाहात आणि संकटांना तोंड देत पुढें रेटीत होते. त्यांचा मोर्चा लाँगस्टाफ प्रपाती उंचवट्याकडे चालला होता. सागरावर लाटांची जशी अक्षय गर्जना चालूं असते तशीच पर्वतावरील वादळाची व त्यांत भर घालणाऱ्या कोसळणाऱ्या हिमकड्यांची गर्जना संतत चालूं होती. हिमाचे ढग, हिमतुषार, अंधारांत चमकणाऱ्या ठिणग्यांसारख्या हिमाचे स्रोत यांची एकच धुमाळी माजली होती. रात्रीसाठीं तंबू ठोकून या हिमप्रवाश्यांनीं छावणी उभारली. ' उद्यां 'च्या विवंचनेनें सर्वांना जणूं मुकें केलें होतें ! झोपण्याच्या पिशव्या एवढीच काय ती उबेसाठीं निवाऱ्याची जागा होती. पहांटे उठून तिघांनींहि शेर्पांनीं तयार केलेला चहा घेतला व सुस्ती झटकून पुढच्या प्रवासाची तयारी केली. लांगुपिन् यांची गिर्यारोहण पादत्राणें पायथ्याच्या तळावरच राहिलीं होतीं. त्यामुळें जातां येईल तेवढें त्यांनीं

एकट्यानेंच जावें असें ठरलें. ड्यूबो आणि सरकी यांची जोडी एका दोरा-वर, गेंडर् आणि दा नोर्बू यांची जोडी दुसऱ्या दोरावर आणि लांगुपिन् एकटे अशी चढाईस सुरुवात झाली.

सगळीकडे सूर्यकिरणांचा सडा पडला तेव्हां हीं पांच हृदयें लॉंगस्टाफ उंचवट्याच्या चढणीवर धडपडत होतीं; दृढनिश्चयानें पुढें पुढें रेटीत होतीं. न थांबतां संपथ पार करून तीं प्रपाती उंचवट्यावर चढत होतीं. ड्यूबो सर्वांच्या पुढें होते. सर्वच थकले होते; लांगुपिन् यांचीं पायाचीं बोटें थिजलीं होतीं; ठणकत होतीं. आपलीं कील पादत्राणें मागें विसरल्याद्दल ते स्वतःलाच शिव्याशाप देत होते. त्या २० जूनच्या सकाळीं गिर्यारोहक—भारवाहकांची ही पंचकडी अतिशय थकलेल्या अवस्थेंत १९००० फूट उंचीवर बर्फाळ पसाऱ्यावर बसली होती. त्यांच्या बाजूस १५० फूट उंच मनोरा उभा होता ते ज्या पर्वतश्रेणीवर बसले होते ती पूर्व नंदादेवी व नंदाखत या शिखरांना जोडीत होती. आतां या पर्वतश्रेणीवर आपल्या हिमकुठारी चालवून ही मंडळी रात्रीच्या विसाव्याकरितां तळ उभारण्यासाठीं चौथरा तयार कर-णार होती. या तुकडीच्या कामगिरींतील पहिलें पर्व संपलें होतें. दुसऱ्या दिवशीं लॉंगस्टाफ उंचवटा उतरून ही तुकडी परत पायथ्याच्या तळाकडे जाणार होती. रात्रीं ठोकलेले तंबू पूर्व नंदादेवीच्या उतरणीवरील पहिला तळ म्हणून कायम राहाणार होते !

याच मध्यंतरीच्या काळांत दुसऱ्या तुकडीनें पश्चिम नंदादेवी शिखराच्या चढणीवर हल्ला चढवून १८४२० फुटांवर पहिला तळ ठोकला होता. ड्यूबो यांची तुकडी पायथ्याच्या तळावर आल्यानंतर दुपारीं ४ च्या सुमारास गेव्हिल्, व्हिग्ने आणि आंगदावा आपल्या पहिल्या तळावरून पायथ्याच्या तळावर उतरले. दोन्ही तुकड्यांनीं आपापल्या कामगिरीचा अहवाल एकमेकींना सादर केला व अखेरीस २२ तारखेस पायथ्याच्या तळावर विश्रांति घेण्याचा निर्णय एकमतानें घेतला ! ड्युप्ला अद्यापि पुलाच्या तळावर होते, पायाँ भुजगढ तळावर होते आणि बर्बेझा नंदनवना-बाहेर पडले नव्हते. २३ तारखेस लांगुपिन् व दा नोर्बू छायाचित्रणासाठीं हिमनदावर गेले. त्याच दिवशीं बर्बेझा आपल्याबरोबर एकोणीस भार-वाहक घेऊन पायथ्याच्या तळावर आले. गेव्हिल्, ड्युबो, व्हिग्ने आणि

गेंडर् पहिल्या तळाकडे गेले होते व ते ती रात्र पहिल्या तळावरच काढणार होते. इयुप्ला दोन दिवसांत पायथ्याच्या तळावर येऊन पोहोंचतील असा अंदाज होता. बिनतारी संदेशवाहकावर लांगुपिन् पहिल्या तळाशीं संभाषण करण्याची धडपड करीत होते. तेवढ्यांत संध्याप्रकाशांतून दोन व्यक्ती उंचावर दिसल्या. ती व्हिग्ने आणि गेव्हिल यांची दुक्कल होती. कड्याच्या कडेवर येऊन ते दोघे पायथ्याच्या तळाकडे बघत होते. लवकरच त्यांनीं पुन्हा आपल्या तंबूचा आश्रय घेतला. लवकरच सूर्यास्तानें पर्वताच्या उतरणीवर रंगपंचमी केली आणि थोड्याच वेळांत हिमालयाचीं शिखरें काळ्याशार अंधारांत बुडून गेलीं !

**२४ जून :** पहिल्या तळावरील तुकडीचें नायकपद गेव्हिल यांचेकडे होते. त्यांच्याबरोबर रात्री सरकीहि पहिल्या तळावर राहिला होता. आंग दावा मात्र पायथ्याच्या तळाकडे आला होता व दुसऱ्या दिवशीं दा नोर्बूसमवेत तो पुन्हा पहिल्या तळावर जाणार होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठतांच पहिल्या तळावरील मंडळींनीं वर जाऊन दुसरा तळ ठोकण्याच्या कामगिरीस हात घातला. दुसरा तळ उभारला जात असतांना सरकी थकव्यानें हिमांत पडला. त्याचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता. ड्यूबो व व्हिग्ने यांनीं खालीं जाऊन त्याला दुसऱ्या तळावर आणलें. गेंडर्देखील थकून गेले होते. गेव्हिल यांनीं एकट्यानें दुसरा तंबू ठोकला व थोड्या वेळानें तंबूंत जाऊन त्यांनीं बर्फ वितळविण्यासाठीं प्रायमस् स्टो ह पेटविण्यास सुरुवात केली. पण कांहीं केल्या तो पेटेना. कागद शोधून जेव्हां तो त्यांनीं पेटवला तेव्हां एकाएकीं तंबूसच आग लागली. बर्फ मारून गेंडर् व गेव्हिल यांनीं ती आग विझविली; पण या धडपडींत स्टोव्हदेखील विझला. पुन्हा स्टोव्ह पेटवून रात्र पडेपर्यंत मधून मधून त्यांनीं बर्फ वितळवून तृष्णा शमविली. बिस्किटें, चॉकलेट, शेवया इत्यादि खाद्यपदार्थ खाल्ले न खाल्ले असे उष्टावून त्यांनीं क्षुत्शांतिहि साधली. गेंडर् आधींच झोपले होते. तंबू बंद करून अर्धवट गारटलेल्या अवस्थेंत गेव्हिलहि झोपीं जाण्याचा प्रयत्न करूं लागले पण झोपच लागेना.

**२५ जून :** रोजीं उन्हें पडलीं तेव्हां ते जागे झाले. परंतु गेंडर् पांढरे फटक् पडले होते. गेव्हिल यांचेंहि डोकें असह्य दुखत होतें. दोघांनाहि

तिसरा तळ ठोकण्यासाठीं निघणें अशक्य होतें. त्यांनीं २५ जून हा दिवस दुसऱ्या तळावरील तंबूत लोळण्यांतच घालविला.

● ● ●

२५ जून रोजींच ड्युप्लाहि पायथ्याच्या तळावर येऊन दाखल झाले होते. व्हिग्ने दुसऱ्या तळावरून खालीं परतले होते. सरकी पहिल्या तळावर झोपेंतच होता, त्याच्यावर पडण्याचा परिणाम झाला होता. ड्यूबो सरकी-बरोबर पहिल्याच तळावर होते. तेनसिंग व डॉ. पायॉं नुकतेच पायथ्याच्या तळावर पोहोंचले होते. अद्यापि मोसमी पर्जन्यानें अनपेक्षितपणें सुटी घेतली होती; जणुं त्यानें आपली रजा वाढविण्याचीच तार पाठविली होती! ड्युप्ला यांनीं चढाईचा निर्णय जाहीर केला होता.

२६ जूनला सकाळपासूनच पायथ्याच्या तळावर लढाईची तयारी ऐन लगीनघाईच्या तालांत सुरू झाली! ड्युप्ला यांच्या पायाला चांगली रुपया-पेक्षां मोठ्या आकाराची जखम झाली होती; पण तशाहि अवस्थेंत त्यांनीं व व्हिग्ने यांनीं पश्चिम नंदादेवी शिखराकडे जावयाचें ठरविलें व तयारी चालविली. बिनतारी संदेश देऊन ड्यूबो यांना पहिल्या तळावरून खालीं बोलावण्यांत आलें. ड्युप्ला यांनीं नंदादेवी पश्चिम शिखरावर चढाई करण्यासाठीं व्हिग्ने यांना जोडीदार निवडलें होते. ड्यूबो आणि तेनसिंग यांनीं लॉंगस्टाफ प्रपाती उंचवट्यावर तळ ठोकून या जोडगोळीची वाट पहावयाची होती.

पहिला आणि दुसरा तळ वसविले गेले होते. तिसरा तळहि उभारला गेला असणें संभवनीय होतें. ड्युप्ला-व्हिग्ने यांची जोडी भराभर शेर्पांच्या मदतीनें चवथा तळ वसविणार होती. नंतर पांचवा तळ आणि शिखरावर हल्ला! असा चढाईचा आराखडा होता. पश्चिम-शिखर ते पूर्व-शिखर पर्वतश्रेणी वरून पार करावयाची होती व एकाच चढाईत पश्चिम आणि पूर्व शिखरें काबीज करून ही गिर्यारोहकांची जोडी लॉंगस्टाफ प्रपाती उंचवट्या-वर पोहोंचणार होती.

२६ तारखेस संध्याकाळीं ड्युप्ला, पायॉं, व्हिग्ने, ड्यूबो, लांगुपिन् आणि नंदू जयाल यांनीं एकत्र जेवणाच्या मेजावर बसून जेवणावर यथेच्छ

हात मारला. दुसऱ्या दिवसापासून लढाईला पक्कें तोंड लागणार होतें. रात्रीं ड्युप्ला यांनीं सर्वांना ' शुभ-रजनी ' म्हणून आपापल्या अंथरुणांत धाडलें. आणि तळावर शांतता पसरली. संध्याकाळपासून गिर्यारोहणाच्या जगांतील गप्पा आणि दंतकथांना आलेला ऊत एकदम ओसरला. ड्युप्ला यांच्या डोक्यांत त्यांची एक कविता सतत घोळत होती :

**" त्या तिथें पल्याडहि टाकूं अति खंबीर**
**उत्साह नि अवघी उदात्तता गंभीर**
**कार्यक्षमतेनें करूं यशाला अपुलें**
**विजयी हो आम्ही विजयश्री लुटूं थोर "........**

झोपतां झोपतां ते म्हणत होते, " उद्यां आम्ही धाडसाचीं आणि नशिबाचीं आडदांड पोरें बनणार आहोंत. कारण दोघांवरहि अधिकार सांगण्याची आमची पात्रता आहे. लढाईची परिणति कशीहि होवो; त्यांत आमच्या वांट्याला यशच आलेलें असेल; कारण आम्हीं संदिग्धतेवर आणि संदेहावर मात केलेली असेल. "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं थकव्यानें हैराण होऊन पांढरे फटफटीत पडलेले गेंडर् पायतळावर आले. बर्बेझा आणि गेव्हिल तिसरा तळ उभारावयास वर रवाना झाले होते. तेनसिंग आणि सरकी यांनीं ड्युप्ला व व्हिग्ने यांच्या पोतड्या घेऊन पहिल्या तळाची वाट धरली. त्यांच्या मागोमाग ड्युप्ला व व्हिग्नेहि रवाना झाले. नंतर लांगुपिन् प्रतिमाग्राहक घेऊन पहिल्या तळावर जाणार होते. त्यांचा, गिर्यारोहक जोडीचीं छायाचित्रें घेण्याचा विचार होता. परंतु ड्युप्ला यांच्या मनांत वेगळीच योजना होती. एकाच दिवसांत दुसरा तळ गांठावयाचा व रात्र तेथें काढून दुसऱ्या दिवशीं चवथ्या तळावर मजल मारावयाची असें त्यांनीं सर्वांच्या विरोधाला न जुमानतां ठरविलें होतें.

पायथ्याच्या तळावरील लोक या दोन गिर्यारोहकांच्या प्रगतीकडे डोळे लावून होते. दगडांच्या एका राशीपलीकडे जातांच ते दोघेहि दिसेनासे झाले होते. सुमारें एक तासानंतर ते पिवळ्या खडकाच्या कड्यापलीकडे गेलेले दिसले. ड्युप्ला यांच्या हृदयाचें स्पंदन वाढलें होतें व व्हिग्ने यांची दांत-खिळी बसल्यासारखी होऊन त्यांचा श्वास लोहाराच्या भात्यासारखा आवाज

करीत होता. पहिल्या तळावरून दा नामग्याल त्यांच्या दिशेनें हात हलवीत होता. गिर्यारोहकांजवळ ओझीं नसल्यामुळें त्यांनीं तेनसिंग व सरकी यांना मागें टाकलें होतें. ते दोघेहि ओझीं घेऊन त्यांच्या मागोमाग चढत होते.

पहिल्या तळावरून तेनसिंग यांनीं मागें फिरावयाचें असा बेत होता. कारण तेनसिंगांना ड्यूबो यांचेबरोबर लाँगस्टाफ उंचवट्यावर जावयाचें होतें. परंतु चहा घेतल्यावर ताजेतवानें झालेल्या तेनसिंगांना दुसऱ्या तळापर्यंत जाण्याची सुरसुरी आली. दा नामग्याल यानें सरकीजवळील ओझें घेतलें व तेनसिंग त्याच्याबरोबर वर जाऊं लागले. सुमारें ३०० फूट वर गेल्यावर त्यांना मागून हांका ऐकूं आल्या. लांगुपिन् आपला प्रतिमाग्राहक घेऊन पहिल्या तळावर येत होते! "आतां छायाचित्रण उद्यां करूं" असा विचार करून ड्युप्ला तसेच पुढें चढत राहिले. सगळीकडे पांढऱ्या धुक्याचा पडदा पसरत होता आणि आभाळांत ढगांची गर्दी होती. ती मोसमी पर्जन्याची नांदी होती.

अखेरची कठीण दरड चढून ते दुसऱ्या तळावर पोहोंचले. तेथें कोणीच नव्हतें. दुपारचे ४ वाजले होते. ड्युप्ला यांनीं आतां खाणें आटोपतांच तेनसिंग व दा नामग्याल यांना परत पाठवावयाचें ठरविलें. त्यांनीं पायतळावर पाठविण्यासाठीं चिठ्ठी लिहिली, "दुपारचे चार. दुसऱ्या तळावर पोहोंचलों; थोडी डोकेंदुखी आहे. एखाद्या सैन्याच्या पलटणीला महिनाभर पुरेल एवढी शिधासामग्री आहे. आम्ही पुढें जात आहोंत, उद्यां आम्ही शिखराच्या शक्य तितक्या जवळ छावणी ठोकण्याचें ठरवीत आहोंत. बर्बेझा नि गेव्हिूल तिसरा तळ उभारायला गेले आहेत, त्यांची आम्ही वाट पाहात आहोंत. आम्ही उद्यां तिसऱ्या तळावर पोहोंचूं. तो केकचा तुकडाच आहे."

—रोजर.

तेनसिंग यांनीं जड पावलांनीं दुसरा तळ सोडला. त्यांचे पाय ड्युप्लांबरोबर वर चढण्यास आतुर झाले होते. पण ड्युप्ला यांनीं परवानगी दिली नाहीं. त्या दोघांना सुयश चिंतून व नमस्कार करून तेनसिंग खालीं उतरूं लागले. दा नामग्याल अगोदरच पुढें झाला होता

व्हिग्ने एका तंबूंत शिरले. ड्युप्ला मात्र तंबूच्या दारांतच बसून पूर्व

नंदादेवी शिखराकडे पाहात होते. पश्चिम नंदादेवी शिखर त्यांच्या डोक्यावर उभें होतें.

सायंकाळीं सात वाजतां गेव्हिल नि बर्बेझा तिसरा तळ उभारून खालीं उतरतांना दुसऱ्या तळावर थांबले. लता खेड्यांतून गेव्हिल पुढें गेल्यानंतर आज प्रथमच त्यांची व ड्युप्लांची गांठ पडत होती. ड्युप्लांनीं आपला दुसऱ्या दिवसाचा विचार त्या दोघांना सांगितला. थकलेल्या अवस्थेंत अर्धवट झोपेंत त्या सर्वांनीं व्हिग्ने यांच्या हातच्या स्वयंपाकावर भूक भागविली. वरची चढाई अधिक कठीण असल्याचा आपला अभिप्राय गेव्हिल यांनीं व्यक्त केला. रात्रीं सर्वजण झोपी गेले.

ड्युप्ला यांच्या चढाईच्या रूपरेषेनें गेव्हिल यांना विवंचनेंत टाकलें होतें. रात्रींच्या शांततेंत पुन्हा फेरविचार करून ड्युप्लांनीं आपली योजना बदलावी व थोडें धिमेपणानें पुढें व्हावें असें त्यांना वाटत होतें. पण हें मत बोलून दाखविण्यानें ड्युप्लांच्या बेतांत बदल होणार नव्हता म्हणून ते स्वस्थ राहिले.

२८ तारखेस हवामानांत बदल होऊं लागला. गेव्हिल यांनीं न राहवल्या-मुळें ड्युप्ला यांना विचारलेंच, " तर मग, तुम्ही तिसऱ्या तळावर झोपणार नाहीं ? वर वर चढणार ? "

" होय वर वर ! "

" आणि दुसऱ्या दिवशीं शिखर काबीज करून तुम्ही पर्वतश्रेणीच्या दिशेनें खालीं उतरणार. "

" अगदीं असेंच ! तुम्ही पाहालच." ड्युप्ला म्हणाले.

" काय, झाली निघण्याची तयारी ? " त्यांनीं व्हिग्ने यांना विचारलें.

गेव्हिल यांनीं शेर्पांनीं खालून आणलेल्या त्या प्रतिमाग्राहकानें भराभर निघणाऱ्या मंडळींचे कांहीं फोटो घेतले आणि शेर्पा व गिर्यारोहकांची दुकल दुसऱ्या तळाचा निरोप घेऊन वर चढूं लागली.

शीस्ट दगडांचे सुटे खडे केवळ दहिवरामुळें पकडून बसले होते. प्रत्येक खडकाचा पक्का अंदाज घेऊन हाताला अगर पायाला आधार घेत वर चढावें लागत होतें. व्हिग्ने एखाद्या सराईत गिर्यारोहकाप्रमाणें झपझप वर चढत होते. शेर्पांना ओझीं घेऊन एवढें लवकर पुढें जातां येत नसल्यानें

व्हिग्ने यांना वारंवार संथ चालण्याची आठवण द्यावी लागत होती. एकदां ड्युप्ला जवळ जवळ पडतां पडतां सावरले !

दोन तासांच्या चढणीनंतर ते तिसऱ्या तळावर पोहोंचले. व्हिग्ने यांना असह्य डोकेंदुखीची व्यथा छळीत होती. पंधरा मिनिटें विश्रांती घेऊन चवथ्या तळाची वाटचाल सुरू करावयाचा निर्णय ड्युप्लांनीं जाहीर केला.

आतां त्यांना गुडघाभर हिमांतून पुढें जावें लागलें. चढाईसाठीं शेर्पांना दोरावर बांधलें होतें. वाटेंत दोनदां दा नोर्बूला ओझ्याच्या वजनामुळें बसावें लागलें होतें. अखेरीस ते ड्युप्लांनीं ठरविलेल्या स्थळीं पोहोंचले.

इतक्या थकलेल्या अवस्थेंत धुक्यांतून शेर्पांना तिसऱ्या तळाकडे पाठविणें योग्य नव्हतें. त्यामुळें ते चौघेहि एका छोट्याशा तंबूंत गुरंगुटी करून विसांवले. रात्रीं थंडी मी म्हणूं लागली. शेर्पांजवळ झोपण्याच्या पिशव्याहि नव्हत्या. व्हिग्ने आणि ड्युप्ला यांनीं आपल्या जाड बंड्या त्यांना घालावयास दिल्या. अतिशय कष्टांत त्या चौघांनीं ती अविस्मरणीय रात्र कुडकुडत काढली. त्यांचे हातपाय थंडीनें धरले होते. एका शेर्पाचे दांत सतत थडथडत होते.

सकाळीं ड्युप्ला सर्वांआधीं उठले. आकाश निरभ्र झालें होतें. ज्या कण्यावरून ड्युप्लांना पूर्व नंदादेवी गांठावयाचें होतें तो उन्हानें न्हाऊन निघाला होता. ड्युप्लांनीं व्हिग्नेना व शेर्पांना उठविलें व शेर्पांजवळ चिठी लिहून दिली:

२१ जून (?)

उद्दिष्ट-
मध्यान्हींस शिखर
पूर्वशिखरावर अगर त्याच्या छायेंत तळ.
उद्यां मध्यान्हींस पूर्व शिखर
लाँगस्टाफ उंचवट्यावर झोंप. "

आंगदावा अगदीं थकून गेला होता पण त्याची गिर्यारोहकांबरोबर शिखरावर जाण्याची इच्छा होती. ड्युप्लांनीं त्याला नकार दिला.

" आंगदावा व नोर्बू यांना आजारी अवस्थेंत परत पाठवीत आहें; त्यांच्याकडे लक्ष द्या. उद्यांपासून भारवाहकांच्या मदतीनें तिसरा व दुसरा

तळ खालीं करा आणि हमालांच्या करवीं सामान पहिल्या तळावरून पायतळावर न्या." ड्युप्ला चिठी लिहीत होते. तेवढ्यांत व्हिग्ने यांनीं ॲस्पिरिन्‌ची गोळी घेतली.

" सर्व परत घेऊन जा ( माझ्यासाठीं टिल्‌मनचा दोरहि ) गिल्‌चें नि माझें डोकें दुखत आहे. बाकी ठीक.

" तळ २४,३०० फुटांवर आहे ?

— रोजर

चिठी लिहून संपली होती. त्यांनीं तिची घडी करून ती आंगदावाजवळ दिली व जातांना तिसऱ्या तळाची मांडवपरतणी उरकावयाचा आदेश दिला.

निघण्यापूर्वी वरून एक धोंडा कोसळत आला व त्याच्या मागोमाग दगडांची मालगाडीच घरंगळली. दरींतून ढगांचें सैन्य उठूं लागलें. पण ड्युप्ला यांचें धैर्य रतिभरहि खचेना. त्यांच्यांतला उत्साह शिगोशिग उसळत होता. आपापल्या पोतड्या घेऊन गिर्यारोहक निघाले. ड्युप्ला यांनीं आपल्या प्रतिमाग्राहकानें आंगदावा व दा नोर्बू यांचें छायाचित्र घेतलें. शेर्पांनीं 'साहेबां'ना सुयश चिंतिलें.

गिर्यारोहकांचा आपल्या शरीरावर संपूर्ण ताबा होता. त्यांची छाती लक्ष्याला तोंड देण्यास सिद्ध होती. एकएक दमदार पाऊल पुढें टाकून ते चढत होते. होत असलेल्या त्रासांतून त्यांना एक निर्भेळ आनंद लाभत होता. त्यांच्या हिमकुठारी बर्फावर चालविल्या जात होत्या. वाऱ्याचें वादळांत रूपांतर होत होतें, पण त्याची त्यांना तमा नव्हती.

ड्युप्लांच्या मनांत भावतरंग उठत होते. त्यांच्या हालचालींत युद्ध-नृत्याचा आवेश होता. त्यांचा स्वतःवर ताबा होता. त्यांचा भूतकाळ भरीव होता, भविष्यकाळ उजळ होता. ते खुशालचंदू जगांत कधींच रममाण झाले नव्हते. त्यांचें व्यक्तिमत्व विश्वासास पात्र होतें. त्यांना विशुद्धाची ओढ होती—आपले भावतरंग त्यांनीं आपल्या लाल वहींत शब्दरूप केले होते.

" मला चिरंतन निवांततेची ओढ आहे. जनसंमर्दाच्या बंदरापासून सागरावर दूरदूर जाण्यासाठीं मी अस्वस्थतेनें माझ्या जहाजाची वाट पाहात आहें. मला सागराच्या अमर्यादपणाची ओढ आहे; विश्वाच्या पोकळीच्या अनंततेचें वेड आहे."

व्हिग्ने यांना वारंवार संथ चालण्याची आठवण द्यावी लागत होती. एकदां ड्युप्ला जवळ जवळ पडतां पडतां सावरले !

दोन तासांच्या चढणीनंतर ते तिसऱ्या तळावर पोहोंचले. व्हिग्ने यांना असह्य डोकेंदुखीची व्यथा छळीत होती. पंधरा मिनिटें विश्रांती घेऊन चवथ्या तळाची वाटचाल सुरू करावयाचा निर्णय ड्युप्लांनीं जाहीर केला.

आतां त्यांना गुडघाभर हिमांतून पुढें जावें लागलें. चढाईसाठीं शेर्पांना दोरावर बांधलें होतें. वाटेंत दोनदां दा नोर्बूला ओझ्याच्या वजनामुळें बसावें लागलें होतें. अखेरीस ते ड्युप्लांनीं ठरविलेल्या स्थळीं पोहोंचले.

इतक्या थकलेल्या अवस्थेंत धुक्यांतून शेर्पांना तिसऱ्या तळाकडे पाठविणें योग्य नव्हतें. त्यामुळें ते चौघेहि एका छोट्याशा तंबूंत गुरंगुटी करून विसांवले. रात्रीं थंडी मी म्हणूं लागली. शेर्पांजवळ झोपण्याच्या पिशव्याहि नव्हत्या. व्हिग्ने आणि ड्युप्ला यांनीं आपल्या जाड बंड्या त्यांना घालावयास दिल्या. अतिशय कष्टांत त्या चौघांनीं ती अविस्मरणीय रात्र कुडकुडत काढली. त्यांचे हातपाय थंडीनें धरले होते. एका शेर्पाचे दांत सतत थडथडत होते.

सकाळीं ड्युप्ला सर्वांआधीं उठले. आकाश निरभ्र झालें होतें. ज्या कण्यावरून ड्युप्लांना पूर्व नंदादेवी गांठावयाचें होतें तो उन्हानें न्हाऊन निघाला होता. ड्युप्लांनीं व्हिग्नेना व शेर्पांना उठविलें व शेर्पांजवळ चिठी लिहून दिली:

२१ जून (?)

उद्दिष्ट-
मध्यान्हींस शिखर
पूर्वशिखरावर अगर त्याच्या छायेंत तळ.
उद्यां मध्यान्हींस पूर्व शिखर
लाँगस्टाफ उंचवट्यावर झोंप. "

आंगदावा अगदीं थकून गेला होता पण त्याची गिर्यारोहकांबरोबर शिखरावर जाण्याची इच्छा होती. ड्युप्लांनीं त्याला नकार दिला.

" आंगदावा व नोर्बू यांना आजारी अवस्थेंत परत पाठवीत आहें; त्यांच्याकडे लक्ष द्या. उद्यांपासून भारवाहकांच्या मदतीनें तिसरा व दुसरा

तळ खालीं करा आणि हमालांच्या करवीं सामान पहिल्या तळावरून पायतळावर न्या. " ड्युप्ला चिठी लिहीत होते. तेवढ्यांत व्हिग्ने यांनीं ॲस्पिरिन्‌ची गोळी घेतली.

" सर्व परत घेऊन जा ( माझ्यासाठीं टिल्मनचा दोरहि ) गिल्‌चें नि माझें डोकें दुखत आहे. बाकी ठीक.

" तळ २४,३०० फुटांवर आहे ?

– रोजर

चिठी लिहून संपली होती. त्यांनीं तिची घडी करून ती आंगदावाजवळ दिली व जातांना तिसऱ्या तळाची मांडवपरतणी उरकावयाचा आदेश दिला.

निघण्यापूर्वीं वरून एक धोंडा कोसळत आला व त्याच्या मागोमाग दगडांची मालगाडीच घरंगळली. दरींतून ढगांचें सैन्य उठूं लागलें. पण ड्युप्ला यांचें धैर्य रतिभरहि खचेना. त्यांच्यांतला उत्साह शिगोशिग उसळत होता. आपापल्या पोतड्या घेऊन गिर्यारोहक निघाले. ड्युप्ला यांनीं आपल्या प्रतिमाग्राहकानें आंगदावा व दा नोर्बू यांचें छायाचित्र घेतलें. शेर्पांनीं 'साहेबां'ना सुयश चिंतिलें.

गिर्यारोहकांचा आपल्या शरीरावर संपूर्ण ताबा होता. त्यांची छाती लढ्याला तोंड देण्यास सिद्ध होती. एकएक दमदार पाऊल पुढें टाकून ते चढत होते. होत असलेल्या त्रासांतून त्यांना एक निर्भेळ आनंद लाभत होता. त्यांच्या हिमकुठारी बर्फावर चालविल्या जात होत्या. वाऱ्याचें वादळांत रूपांतर होत होतें, पण त्याची त्यांना तमा नव्हती.

ड्युप्लांच्या मनांत भावतरंग उठत होते. त्यांच्या हालचालींत युद्ध-नृत्याचा आवेश होता. त्यांचा स्वतःवर ताबा होता. त्यांचा भूतकाळ भरीव होता, भविष्यकाळ उजळ होता. ते खुशालचंदू जगांत कधींच रममाण झाले नव्हते. त्यांचें व्यक्तिमत्व विश्वासास पात्र होतें. त्यांना विशुद्धाची ओढ होती–आपले भावतरंग त्यांनीं आपल्या लाल वहींत शब्दरूप केले होते.

" मला चिरंतन निवांततेची ओढ आहे. जनसंमर्दाच्या बंदरापासून सागरावर दूरदूर जाण्यासाठीं मी अस्वस्थतेनें माझ्या जहाजाची वाट पाहात आहें. मला सागराच्या अमर्यादपणाची ओढ आहे; विश्वाच्या पोकळीच्या अनंततेचें वेड आहे. "

व्हिग्ने यांना वारंवार संथ चालण्याची आठवण द्यावी लागत होती. एकदां इयुप्ला जवळ जवळ पडतां पडतां सावरले !

दोन तासांच्या चढणीनंतर ते तिसऱ्या तळावर पोहोंचले. व्हिग्ने यांना असह्य डोकेंदुखीची व्यथा छळीत होती. पंधरा मिनिटें विश्रांती घेऊन चवथ्या तळाची वाटचाल सुरू करावयाचा निर्णय इयुप्लांनीं जाहीर केला.

आतां त्यांना गुडघाभर हिमांतून पुढें जावें लागलें. चढाईसाठीं शेर्पांना दोरावर बांधलें होतें. वाटेंत दोनदां दा नोर्बूला ओझ्याच्या वजनामुळें बसावें लागलें होतें. अखेरीस ते इयुप्लांनीं ठरविलेल्या स्थळीं पोहोंचले.

इतक्या थकलेल्या अवस्थेंत धुक्यांतून शेर्पांना तिसऱ्या तळाकडे पाठ-विणें योग्य नव्हतें. त्यामुळें ते चौघेहि एका छोट्याशा तंबूंत गुरंगुटी करून विसांवले. रात्रीं थंडी मी म्हणूं लागली. शेर्पांजवळ झोपण्याच्या पिशव्याहि नव्हत्या. व्हिग्ने आणि इयुप्ला यांनीं आपल्या जाड बंड्या त्यांना घालाव-यास दिल्या. अतिशय कष्टांत त्या चौघांनीं ती अविस्मरणीय रात्र कुडकुडत काढली. त्यांचे हातपाय थंडीनें धरले होते. एका शेर्पाचे दांत सतत थडथडत होते.

सकाळीं इयुप्ला सर्वांआधीं उठले. आकाश निरभ्र झालें होतें. ज्या कण्यावरून इयुप्लांना पूर्व नंदादेवी गांठावयाचें होतें तो उन्हानें न्हाऊन निघाला होता. इयुप्लांनीं व्हिग्नेना व शेर्पांना उठविलें व शेर्पांजवळ चिठी लिहून दिली:

२१ जून (?)

उद्दिष्ट-
मध्यान्हींस शिखर
पूर्वशिखरावर अगर त्याच्या छायेंत तळ.
उद्यां मध्यान्हींस पूर्व शिखर
लॉंगस्टाफ उंचवट्यावर झोंप. "

आंगदावा अगदीं थकून गेला होता पण त्याची गिर्यारोहकांबरोबर शिखरावर जाण्याची इच्छा होती. इयुप्लांनीं त्याला नकार दिला.

" आंगदावा व नोर्बू यांना आजारी अवस्थेंत परत पाठवीत आहें; त्यांच्याकडे लक्ष द्या. उद्यांपासून भारवाहकांच्या मदतीनें तिसरा व दुसरा

तळ खालीं करा आणि हमालांच्या करवीं सामान पहिल्या तळावरून पायतळावर न्या. ” ड्युप्ला चिठी लिहीत होते. तेवढ्यांत विह्ग्ने यांनीं ॲस्पिरिन्‌ची गोळी घेतली.

“ सर्व परत घेऊन जा ( माझ्यासाठीं टिल्मनचा दोरहि ) गिल्‌चें नि माझें डोकें दुखत आहे. बाकी ठीक.

“ तळ २४,३०० फुटांवर आहे ?

– रोजर

चिठी लिहून संपली होती. त्यांनीं तिची घडी करून ती आंगदावाजवळ दिली व जातांना तिसऱ्या तळाची मांडवपरतणी उरकावयाचा आदेश दिला.

निघण्यापूर्वी वरून एक धोंडा कोसळत आला व त्याच्या मागोमाग दगडांची मालगाडीच घरंगळली. दरींतून ढगांचें सैन्य उठूं लागलें. पण ड्युप्ला यांचें धैर्य रतिभरहि खचेना. त्यांच्यांतला उत्साह शिगोशिग उसळत होता. आपापल्या पोतड्या घेऊन गिर्यारोहक निघाले. ड्युप्ला यांनीं आपल्या प्रतिमाग्राहकानें आंगदावा व दा नोर्बू यांचें छायाचित्र घेतलें. शेर्पांनीं ‘ साहेबां’ना सुयश चिंतिलें.

गिर्यारोहकांचा आपल्या शरीरावर संपूर्ण ताबा होता. त्यांची छाती लक्ष्याला तोंड देण्यास सिद्ध होती. एकएक दमदार पाऊल पुढें टाकून ते चढत होते. होत असलेल्या त्रासांतून त्यांना एक निर्भेळ आनंद लाभत होता. त्यांच्या हिमकुठारी बर्फावर चालविल्या जात होत्या. वाऱ्याचें वादळांत रूपांतर होत होतें, पण त्याची त्यांना तमा नव्हती.

ड्युप्लांच्या मनांत भावतरंग उठत होते. त्यांच्या हालचालींत युद्ध-नृत्याचा आवेश होता. त्यांचा स्वतःवर ताबा होता. त्यांचा भूतकाळ भरीव होता, भविष्यकाळ उजळ होता. ते खुशालचंदू जगांत कधींच रममाण झाले नव्हते. त्यांचें व्यक्तिमत्व विश्वासास पात्र होतें. त्यांना विशुद्धाची ओढ होती—आपले भावतरंग त्यांनीं आपल्या लाल वहींत शब्दरूप केले होते.

“ मला चिरंतन निवांततेची ओढ आहे. जनसंमर्दाच्या बंदरापासून सागरावर दूरदूर जाण्यासाठीं मी अस्वस्थतेनें माझ्या जहाजाची वाट पाहात आहें. मला सागराच्या अमर्यादपणाची ओढ आहे; विश्वाच्या पोकळीच्या अनंततेचें वेड आहे. ”

त्या दोघांसमोर पर्वताचा कणाच काय तो होता. बाकी सर्व आकाश व पृथ्वी धुक्यांत गळफटलीं होतीं !

त्याच दिवशीं ड्युप्ला यांच्या आदेशानुसार शेर्पा तिसऱ्या तळावरील तंबू काढीत होते, तेवढयांत गेव्हिल आणि बर्बेझा त्या तळावर येऊन पोहोंचले. त्यांनीं ड्युप्लांची चिठ्ठी वाचली. पूर्व नंदादेवी शिखरावर ती गिर्यारोहकांची जोडी पोहोंचलेली दिसेपर्यंत या तळावर मुक्काम करावयाचा असें त्यांनीं ठरविलें. शेर्पांनीं पुन्हा तंबू ठीकठाक केले. गेव्हिल आपली नजर ताण ताणून शिखराकडे पाहात होते. त्यांना दोन काळ्या सावल्या वर सरकत असलेल्या दिसल्या. त्याचवेळीं शेर्पांचेंहि लक्ष त्या काळ्या ठिपक्यांकडे गेलें. ड्युप्ला आणि व्हिग्ने धिमेपणानें चालत वर वर चढत होते. दुपारचा एक वाजला होता. नंदादेवीच्या पश्चिम शिखरमाथ्यापासून अद्यापि ही जोडी बरीच खालीं होती. गेव्हिल यांनीं एक चिठ्ठी लिहून तिसऱ्या तळावर अधिक सामग्री पाठविण्याची मागणी केली व शेर्पांची खालच्या तळाकडे रवानगी केली.

नंदादेवी शिखर ढगाआड झांकलें गेलें होतें. हिमपातास सुरुवात झाली होती. आतां गेव्हिल उरलेल्या मोहिमेचे नेते होते. ड्यूबो व तेनसिंग लॉंगस्टाफ उंचवटयावर गेले असतील, डॉक्टर व गेंडर् पायतळावर होते, लांगुपिननें शेर्पांना तेल व इतर सामग्री आणण्यासाठीं खालच्या तळावर पाठविलें होतें व ते स्वतः त्या शेर्पांची वाट पाहात दुसऱ्या तळावर थांबले होते.

गेव्हिल यांनीं पुन्हा आकाश स्वच्छ होईल म्हणून अमर आशेच्या कैफांत वाट पाहिली. पण अंधार पडला तरी तिसऱ्या तळावरून पलीकडचें कांहीं दिसलें नाहीं. संध्याकाळीं ७ वाजतां बिनतारी ग्राहकावर कांहीं ऐकूं येतें कां म्हणून गेव्हिल यांनीं प्रयत्न केला. पण व्यर्थ ! वाऱ्यांतून वादळ निर्माण होऊं लागलें होतें. दुसऱ्या दिवशीं पूर्व शिखराजवळ कांहीं मागमूस लागतो का तें पाहावयाचें असें ठरवून ते दोघे झोपीं गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दोघांनींहि आपली नजर ताणून पश्चिम शिखराकडे व पूर्व शिखराकडे पाहिलें, पण त्यांना कांहीं हालचाल दिसली नाहीं. दुपारीं ३ वाजतां पुन्हां हवा बिघडली, हिमवृष्टी होऊं लागली.

तळावरील शिधासामुग्री संपत आली होती. बर्बेझांनीं खालीं जाऊन सामग्री आणावी व गेव्हिल यांनीं आपला पहारा चालू ठेवावा असें ठरलें. परंतु चार वाजतां लांगुपिन्, जयाल व शेर्पा नामग्याल यांचेबरोबर तिसऱ्या तळावर आले. त्यांनीं शिधासामुग्री आणली होती. त्यामुळें बर्बेझा यांची चक्कर वांचली.

सूर्यास्ताच्या सुमारास हिमवृष्टी थांबली व ढगांचा पडदा थोडासा उघडला. गेव्हिल यांची दुर्बीण आपलें लक्ष्य शोधूं लागली. परंतु कुठें कांहीं दिसेना. त्यांनीं शिट्या वाजविल्या, नामग्यालनें साद घातली पण कुठूनहि पडसाद येईना.

पुन्हा दुसऱ्या दिवशीं अधिक वर जाऊन दिशा धुंडाळावयाच्या असें गेव्हिल यांनीं ठरविलें. १ जुलैला गेव्हिल व बर्बेझा वर जावयास निघाले. तीन तास धडपड करूनहि त्यांना इयुप्ला–व्हिग्ने जोडगोळीचा मागमूस लागला नाहीं. पूर्व नंदादेवी, त्या शिखराकडे जाणारा पर्वताचा कणा सर्व कांहीं स्पष्ट दिसत होतें ! एकाएकीं गेव्हिल यांच्या पायांतली ताकद नष्ट झाली ! पुन्हा हवा बिघडूं लागली होती. त्यांना परत फिरणें भाग होतें.

गेव्हिल तिसऱ्या तळावर आले. 'त्यांना कोणी दिसलें नव्हतें' हें जाहीर न करतांच सर्वांना कळलें. तिसऱ्या तळावरील शिधा संपुष्टांत येत चालला होता. त्यांचा एकुलता एक शेर्पा आजारी पडला होता. सर्वजण थकले होते. त्यांना पायतळाकडे परतणें अपरिहार्य होतें. सर्वांच्याच मनांत आशा नि विवंचना यांचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. दररोज दुपारीं पडणारी वाईट हवा, आघाडीच्या जोडीचा गिर्यारोहणाचा वेग व मार्गा-वरील खुणांची उणीव यांतून निघणारा निष्कर्ष कटू होता. कदाचित् ते पर्वताच्या कण्याच्या आड असतील....लाँगस्टाफ् उंचवट्यावरील मंडळींना त्यांचा तंबू दिसला असेल...अनेक उलटसुलट शंकाकुशंका त्या सर्वांच्या मनांत घोटाळत होत्या !

तिसऱ्या तळावरील मंडळींनीं ती रात्र तिथेंच झोपून काढली. तारे लोपले होते व हिमवादळाचें तांडवनृत्य चालू होतें.

२ जुलैला मोसमी पर्जन्याच्या पावलांनीं सर्वांची खात्री पटविली. तंबू आणि बाहेरचें बर्फ एकजीव झालें होतें. तंबू काढणें जवळजवळ अशक्य होतें.

चार तास धडपड करून त्यांनीं तिसरा तळ गुंडाळला. थकलेल्या मंडळींचे 'दोर' आतां उतरणीवरून खालीं येऊं लागले. धडपडत, अडखळत ते खालीं उतरत होते. अखेरीस ते पहिल्या तळावर पोहोंचले व तेथेंच झोपले.

३ तारखेस ते पायथ्याच्या तळावर पोहोंचले. २ तारखेस ग्यालझेन व सरकी लॉंगस्टाफ् उंचवट्यावरून निरोप घेऊन आले होते. ड्यूबो यांनीं पूर्व नंदादेवीकडे जाऊन येणाऱ्या गिर्यारोहकांना भेटण्याचा प्रयत्न केला होता, परंतु ढग आणि धुक्यामुळें त्यांना ड्युप्ला-व्हिग्ने यांची जोडी पश्चिम शिखर पार करून पलीकडे आली कीं नाहीं तें कांहींच दिसलें नव्हतें. पण हवामानामुळें व चुकीच्या अंदाजामुळें त्या दोघांना वेळ लागला असेल असा आशादायक विचार सगळ्यांनीं मान्य केला. ६ तारखेस दुपारीं एक वाजतां आंगदावा हिमनदीवरून धांवत आला व त्यानें दोन आकृती खालीं उतरत असल्याची वर्दी दिली. त्या व्यक्ती म्हणजे ड्युप्ला व व्हिग्नेच असणार याबद्दल सर्वांची खात्री होती. गेव्हिल यांच्या परवानगीनें गेंडर् व लांगुपिन् दोन शेर्पा घेऊन लॉंगस्टाफ् उंचवट्याकडे जायला निघाले.

अडचणींना तोंड देत ते उंचवट्यावर पोहोंचले. पण तळ रिकामा होता. ड्युप्ला यांनीं ड्यूबो यांना लॉंगस्टाफ् उंचवट्यावर थांबण्याचा आदेश दिला होता; परंतु हा तळ रिकामा होता. यावरून ड्यूबो यांना ड्युप्ला भेटले असतील व त्यांची परवानगी घेऊन ड्यूबो पूर्व शिखराकडे गेले असतील असा निष्कर्ष गेंडर-लांगुपिन् यांनीं काढला. अखेर तेनसिंग व ड्यूबो पूर्व शिखराची उतरण उतरून आले व इतका वेळ टाळीत असलेलें सत्य सर्वांना उमजलें. ड्युप्ला आणि व्हिग्ने नंदादेवीवरील लढ्यांत कामीं आले होते.

आतां लॉंगस्टाफ् उंचवट्यावरील मंडळींना पायथ्याच्या तळाकडे जाणें भाग होतें व दोन जिवांच्या हरपण्याची दुष्ट वार्ता इतरांना सांगण्याचें त्यांच्या नशिबीं आलें होतें !

* * *

प्रकरण चवथें:

# पूर्व नंदादेवी-विजय आणि निरोप

ठरल्याप्रमाणें ड्यूबो, तेनसिंग आणि पायाँ यांनीं लॉंगस्टाफ् प्रपाती उंचवट्यावर तळ उभारला होता व मोहिमेचे नायक ड्युप्ला यांच्या आदेशानुसार या मंडळींनीं ड्युप्ला-व्हिग्ने या जोडीची उंचवट्यावर वाट पाहात राहावयाचें असें ठरलें होतें. आभाळ मेघाच्छादित होतें आणि वातावरण वादळी हवेनें भारलेलें होतें. तथापि आपल्या दुर्बिणी लावून मंडळी धुक्यांतून दिसेल तेवढें पलीकडचें पाहाण्याचा प्रयत्न करीत त्या दोन गिर्यारोहकांची वाट पाहात होती. सरकी आणि ग्यालझेन यांच्यावर पायथ्याच्या तळावरून सामग्री आणण्याची कामगिरी सोपवून ड्यूबो आणि तेनसिंग पहिल्या तळाच्या पलीकडे गेले. परंतु पश्चिम नंदादेवी शिखर धुक्याच्या पडद्याआड लोप पावलें होतें व दुर्बीण लावूनहि कांहीं दिसत नव्हतें. नाहीं म्हणायला पश्चिम नंदादेवीच्या दक्षिण उतरणीवर वसलेल्या पहिल्या तीन तळांवर माणसांची हालचाल दिसत होती. परंतु या लोकांत ड्युप्ला होते कीं त्यांनीं अगोदरच शिखर पादाक्रांत करण्यासाठीं प्रस्थान ठेवलें होतें हें कळण्यास कांहीं मार्ग नव्हता. पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणें ड्युप्ला व व्हिग्ने कणा पार करून लॉंगस्टाफ् प्रपाती उंचवट्यावर यावयास हवे होते.

ड्यूबो यांना काय करावें तें कळेना. त्यांचें मन म्हणे, " पूर्व नंदादेवी शिखरावर चढून जावें. ड्युप्ला दोन शिखरांमधील कण्यावर कुठें तरी असतील तर त्यांना मदत करण्यासाठीं वर जाणें अधिकच अगत्याचें आहे. "

तिसऱ्या दिवशीं सायंकाळीं शेर्पा प्रपाती उंचवट्यावर आले. गिर्यारोहकांची जोडी केव्हांच पश्चिम शिखरमाथ्याकडे रवाना झाली असल्याची वार्ता त्यांनीं आणली. आतां मात्र काळजी करण्यासारखी परिस्थिति होती. ४ जुलै रोजीं सकाळीं ड्यूबो, तेनसिंग व सरकी आणि पायाँ व ग्यालझेन वर जावयास निघाले. उंचवट्यावर हिमवृष्टी झाली होती. पायऱ्या खोदीत वर जावें लागत होतें. सायंकाळीं त्यांनीं दुसरी छावणी उभारली.

रात्रीं कोणासहि झोप लागेना. 'वैदू'नें * झोपेच्या गोळ्याहि बरोबर आणल्या नव्हत्या. शेवटीं मंडळी कशीतरी झोपली. दुसऱ्या दिवशीं हा तळ ग्यालझेन व सरकी यांचेवर सोपवून उरलेले तिघे पुन्हा गिर्यारोहणाच्या उद्योगास लागले. त्यांच्याजवळ उंची मोजण्याचें यंत्र नव्हतें. शिखराचा धुक्यांत मागमूसहि लागत नव्हता. वाऱ्याचा झोत असह्य होता. मिलाम खोऱ्यांतून ढग उठत होते. पुढें जाण्याचा प्रयत्न करणें अशक्य होतें. बर्फात चौथरा खोदून तिसरा तळ उभारण्यांत आला.

ती तिसऱ्या तळावरची रात्र अविस्मरणीय होती. चौथरा उतारावर होता व उतार कांचेसारख्या बर्फाचा होता. त्यामुळें शरीरें सारखीं खालीं घसरत होतीं. वाऱ्याला उसंत नव्हती. तहानेनें कंठशोष पडला होता परंतु बर्फ वितळविणेंहि कठिण झालें होते. वाऱ्यानें तंबू उडून जाईल कीं काय अशी धास्ती वाटत होती. ड्यूबो यांनीं बर्फात कुऱ्हाड रोवून दोरानें जागेवर खिळून राहाण्याचें साधन तयार केलें. ऊब म्हणून कुठें नव्हती. दोन दिवस एकमेकांचे शरीर चोळून देत ऊब कायम राखण्याची त्यांची सर्वांची धडपड चालू होती. सकाळीं सूर्याच्या किरणांची ऊब मिळाली. पूर्व व पश्चिम शिखरांना जोडणारा कणाहि दिसला. पण कोणी त्या कण्यावरून येत असल्याचीं कसलींहि चिन्हें दिसेनात.

पुन्हा तिघेहि पर्वतावर चढूं लागले. पण अगोदरच पावलें बधीर झालेले पायाँ आतां हात बधीर पडत असल्याची तक्रार करूं लागले. अखेर डॉ. पायाँ यांना मागें परतावें लागलें व अशाहि स्थितींत एकट्यानें त्या तळावर थांबून ड्यूबो व तेनसिंग परत येईपर्यंत वाट पाहाण्याचा शूर निर्णय त्यांनीं घेतला.

तेनसिंग व ड्यूबो यांचीं पावलेंहि बधीर होऊं लागलीं होतीं. मधून मधून तीं चोळून ते पुन्हां पुढें जात होते.

वादळी वाऱ्यामुळें हिमाची भुकटी त्यांच्या तोंडावर मारली जात होती. केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीच त्यांना पुढें पुढें नेत होती. मध्यान्हीपूर्वी दोघेहि पूर्व नंदादेवी शिखरावर येऊन उभे ठाकले ! पण ते दोघेहि सपशेल थकलेले

---

* डॉ. पायाँ हे शस्त्रवैद्य असले तरी फ्रेंच मोहिमेंत वारंवार चेष्टेनें यांचा उल्लेख वैदू (Quack) असा केलेला आढळतो.

होते व आपण कांहीं विक्रम केला आहे याची त्यांना शुद्धहि नव्हती. एवढा ‘ तेज ’ वारा नसता तर त्यांना पलीकडे कण्यावरहि जातां आलें असतें.

ते खालीं उतरले. त्यांना वाऱ्यापासून आश्रय हवा होता. तिसऱ्या तळावर डॉ. पायॉ यांनीं केलेलें पेय ते प्याले व अत्यंत कठिण अवस्थेत खालीं उतरून दुसऱ्या तळावर पोहोंचले.

८ जुलै रोजीं सर्वजण पायथ्याच्या तळावर एकत्र जमले. पण यांत दोघे-जण कमी होते-- ड्युप्ला आणि व्हिग्ने ! नऊ दिवसांपूर्वी ते पश्चिम नंदा-देवी काबीज करावयास गेले होते व नंदादेवीनें त्यांची आहुती घेतली होती. ही सत्यस्थिति होती व ती कितीहि कठोर असली तरी तिला तोंड देणें व ती सहन करणें भाग होतें ! गेव्हिल यांनीं उत्तर तसराळ्यांत शिरून कांहीं थांग लागतो का तें पाहण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! मोसमी पर्जन्याचें अस्त्र डोक्यावर लोंबकळत होतें. आतां माघार घेणें भाग होतें. ड्युप्ला यांनीं पायथ्याच्या तळावर फडकाविलेला मोहिमेचा झेंडा अर्धा खालीं उतर-वून सर्वांनीं ‘ हरपलेल्यां ’ना श्रद्धांजलि वाहिली आणि गेंडर् यांनीं त्या दोघांचीं नांवें एका पक्क्या उभ्या असलेल्या शिलेवर कोरलीं ! सर्वांनीं परमेश्वरास प्रार्थना करून मृतात्म्यास, सद्गति मिळण्यासाठीं परमेश्वराची करुणा भाकली. कदाचित ते दोन गिर्यारोहक चढत असलेला कडा कोस-ळला असेल...किंवा कोसळणाऱ्या हिमकड्यांनीं त्यांना पर्वतावरून टिपलें असेल...किंवा एखाद्या छावणींत लागलेली त्यांची झोंप चिरनिद्रा ठरली असेल...ड्युप्ला नि व्हिग्ने यांची अखेर कशी झाली असेल, त्यांनीं काय यातना सहन केल्या असतील यांच्या कल्पना करण्यापलीकडे कोणाच्याच हातीं कांहीं नव्हतें. पर्वताच्या ओढीनें, पर्वतावरील खेळांत ती जोडी नाहींशी झाली होती; ज्या पर्वतावर त्यांनीं प्रेम केलें त्या पर्वतांत ते विलीन झाले होते ! या दुर्घटनेमुळें पूर्व नंदादेवी विजयाच्या पराक्रमावर विरजण पडलें होतें. विजयोन्मादाच्या जल्लोषाच्या दुधांत सुहृदांच्या चिरविरहाचें मीठ कालवलें गेलें होतें !

आतां ड्युप्ला यांच्या कवितेंतील ओळी आठविण्याची वेळ होती.

**मेलों जर, मित्रा, एक दिनीं गिरिवरतीं**
**मम दोरावरच्या सुहृदा तुजला काम :**

आईला माझ्या भेटुनि तिजला सांग
" आनंदें गेलों सोडूनि मी हें धाम....
एक दुःख केवळ, ' आई नव्हती जवळी ' "
बाबांना वद तूं, " मर्द मनुज मी होतों "
बंधूस म्हणावें माझ्या, " ठेवित काठी,
तूं पुढें गिरीवर पुन्हा नेऊनी कवळी "
पत्नीस सांग बा, " तिच्याविना मी जगलों
त्या धैर्यानें ती जगो अतां विणमाझ्या.... "
मम पुत्रांनीं प्रस्तरीं खिळे शोधावे
अन् पुन्हा नवनवें गिरिशृंग जिंकावें !
मित्रा, परि, माझी कुठार नेई संगें
लाजेचें मरण न लाभावें तिज ' संगें '
उभवून तिच्यास्तव मानमनोरा कोठें
तिज स्मारकावरी उभार गिरिवर जेथें
ती प्रातःकाळीं बघेल नव हिमसरिता
अन् लुटील अस्ताचलीं रक्तिमा विरता !

जुलैच्या ११ तारखेस मोहीम पायथ्याच्या तळावरून परत येण्यास निघाली. दुसऱ्या दिवशीं गेव्हिूल आणि आंगदावा व नोर्बू हे दोन शेर्पा या जथ्यांत सामील झाले. उत्तर हिमतसराळ्याचा वेध घेण्यासाठीं गेव्हिूल ऋषिगंगा पार करीत असतां थंडगार पाण्याच्या भोंवऱ्यांत सांपडले होते व आंगदावा नि नोर्बू यांनीं त्यांचा दोर ओढून त्यांना किनाऱ्यावर आणलें त्या वेळीं ते बेशुद्धच होते. परंतु ते हळूहळू शुद्धीवर आले. अन्यथा त्यांची व ड्युप्ला-व्हिग्ने यांची दुसऱ्या जगांत गांठ पडली असती !

मोहीम भारतांत परतली. पण हरपलेल्यांचा विचार कोणासहि मनांतून हद्दपार करतां येईना. आग्रा येथील भारताच्या आठव्या आश्चर्याच्या दाराघरील ओळीचा अर्थ समजावून घेतांनाहि त्यांच्या नजरेसमोर ड्युप्ला व व्हिग्नेच होते–" हृदयानें शुद्ध असलेलेच ईश्वराच्या उद्यानांत प्रवेश करतील."

अखेरीस मोहीम उष्ण प्रदेशांतून फ्रान्सकडे परतली. अनाकलनीय ओढीनें हिमालयाकडे धांव घेऊन आलेल्या व आपल्या धडपडींत दोन हिरे

हरपून परतलेल्या या मोहिमेतील सदस्यांना आतां मूर्ख प्रश्नांना उत्तरें देण्याचेंच बाकी उरलें होतें.

" तिथें खूप थंडी होती का ?....तुम्ही अगदीं गारठून गेलां असाल ? ....तुम्ही तिथें आहार काय ठेवला होता ?....तुम्ही गारठून नाहीं गेलांत ? ....ड्युप्ला आणि व्हिग्ने यांचें काय झालें तें आम्हांला सांगा ना ! "

काय, या निरर्थक प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं हिमालयांतील मोहिमा काढण्यांत येतात का ? नाहीं. तर मग या मोहिमांच्या मागें उद्देश काय असतो ?

* * *

## मकालू सर्ग

नेता : जीन फ्रँको.

आरोग्याधिकारी : डॉ. आंद्रे ला प्रा.

गिर्यारोहक : जीन बूव्हियर, सर्ज कूपे, जीन कौझी, पियरी लेरॉ, ग्यूडो मॅग्नॉ, लिओनेल तेरे, आंद्रे व्हियालात्.

भूगर्भशास्त्रज्ञ : पियरी बोर्दे, मायकेल लॅत्रियेल्.

भारवाहकांचा सरदार : ग्यालझेन नोर्बू.

हमालांचा प्रमुख : किडजॉक् त्सेरिंग.

भारवाहक : आंग बाओ, आंग फुटार, आंग त्सेरिंग, चौथा आंग त्सेरिंग, ऐला, छोटारी, चुंबी, दागांग नॉर्जी, दा नोर्बू, ऐला नामग्याल, गुंडेन्, दुसरा ग्यालझेन, पहिला मिंग्मा त्सेरिंग, दुसरा मिंग्मा त्सेरिंग, मिंग्मा तेनसिंग, निम् तेंबा, निम् तेनसिंग, पा नोर्बू, पासांग दावा, पेंबा तेनसिंग, ताशी, वाँगडी, पेंबा नोर्बू.

प्रकरण पहिलें :

# मकालूकडे

फ्रेंच गिर्यारोहकांचें लक्ष्य हिमालयाकडे वळल्यापासून मॉरिस हेर्झोग यांच्या चमूनें पहिल्याच प्रयत्नांत २६४९२ फूट उंच अन्नपूर्णा शिखर जिंकून एक विक्रम साधला हें आपण पाहिलें. या यशामुळें फ्रेंचांचा आत्मविश्वास दुणावला व शैल राधानाथावर स्वारी करण्याचें स्वप्न नजरेसमोर तरळूं लागलें. परंतु ब्रिटिश गिर्यारोहकहि याच वेळीं राधानाथावरील मोहिमेची तयारी करीत होते व फ्रेंचांनीं त्या शिखरावर जाण्याचा ब्रिटिशांचा पहिला नैतिक हक्क मान्य केला होता. जर ब्रिटिशांना दुर्दैवानें अपयश आलें तर लागोपाठ फ्रेंचांनीं या विश्वाच्या कळसाचा माथा नमाविण्याचे प्रयत्न करावे असें ठरलें; व अशा तऱ्हेनें स्विस गिर्यारोहकांच्या १९५२ च्या परवानगीनंतर १९५३ मध्यें ब्रिटिशांनीं शैल राधानाथासाठीं आपलें नांव नोंदविलें व १९५४ सालीं फ्रेंचांनीं नेपाळ सरकारची परवानगी मिळविली.

मध्यंतरींच्या काळांत ड्युप्ला-व्हिग्ने यांच्या नंदादेवी मोहिमेचा हृदयाला भिडणारा नंदादेवी सर्ग रचून झाला होता; व फ्रेंच गिर्यारोहक शैल राधानाथाच्या उतरणीवरील जॉन हंट यांच्या मोहिमेकडे डोळे लावून बसले होते. हिलरी आणि तेनसिंग यांनीं २९ मे १९५३ रोजीं स्वर्गमाथा गांठला आणि शैल राधानाथ सर्गांतील अत्युच्च संहिता लिहिली गेली. फ्रेंचांनीं ब्रिटिश मोहिमेचें अभिनंदन केलें पण तें निर्भेळ आनंदानें केलें नाहीं. आपला १९५४ चा उबूं घातलेला प्रयत्न, उबण्यापूर्वींच फुटणाऱ्या अंड्याप्रमाणें फोल ठरला होता या विषादाची जाणीव त्यांच्या मनांत होती. परंतु अगोदरपासून तयारी करीत असल्यामुळें राधानाथ नाहीं तर निदान दुसऱ्या शिखराकडे मोहीम नेणें फ्रेंचांना भाग होतें. त्यामुळें त्यांनीं राधानाथ शिखराचें अक्षरशः पाटचें भावंड मकालू शिखर याच्या दिशेनें आपला मोर्चा वळविला. या शिखराचा तिबेटी भाषेंत राधानाथ शिखराच्या नांवानेंच उल्लेख करतात (चोमोलुंग्मा) व म्हणूनच मॅलरी यांना राधानाथ व मकालू यांचा फरकानें उल्लेख करण्यासाठीं राधानाथा

'पलीकडचें चोमोलुंग्मा' असा पर्याय काढावा लागला होता. या मकालू शिखराबद्दल फ्रेंचांनीं प्रथम १९३४ सालीं विचार केला होता. परंतु त्या वर्षी ऐन वेळीं तिबेट सरकारनें परवानगी द्यावयाचें नाकारल्यामुळें फ्रेंचांना बोटें मोडीत बसावें लागलें होतें.

मकालू शिखर दिसावयास सुंदर आहे व अद्यापि या शिखरावर कोणी मोहीम नेली नव्हती त्यामुळें नव्या नवतीच्या आवाहनांतून मकालू मोहिमेची कल्पना स्थिर झाली. तेवढ्या अवधींत दोन 'राक्षस' जिंकले गेले होते. ऑस्ट्रो-जर्मन मोहिमेनें नंगापर्वताला हरविलें होतें व इटालियन गिर्यारोहक के-२ ऊर्फ गॉडविन् ऑस्टिन् शिखराच्या डोक्यावर उभे ठाकले होते.

नेपाळ सरकारनें फ्रेंचांना १९५४ चा हेमंत व १९५५ चा वसंत या दोन ऋतूंत मोहीम नेण्यास परवानगी दिली होती. १९५४ च्या वसंतांत न्यूझीलंड आणि अमेरिका यांच्या मोहिमा जाणार होत्या व त्यांना यश मिळालें तर पुन्हा एकदां फ्रेंचांवर वेगळें लक्ष्य शोधण्याची वेळ येणार होती. पण या मोहिमा २३००० फूट उंचीपलीकडे गेल्या नाहींत. हेमंतांत फ्रेंच गिर्यारोहकांनीं मुख्य शिखरावर चढाई करण्याचें उद्दिष्ट नजरेसमोर न ठेवतां केवळ पाहाणी करण्यासाठीं व हवामानांत सरावण्यासाठीं मकालूच्या परिसरांत मोहीम नेली. हिमालय-गिर्यारोहणासाठीं आणलेल्या साधनसामग्रीचा प्रत्यक्ष हिमालयावरील परिस्थितींत उपयोग करून पाहाणें हा देखील हेमंती मोहिमेचा उद्देश होता. याच मोहिमेंत फ्रेंच चमूंनीं मकालू प्रपाती उंचवटा गांठला ( २४३१० फूट ) 'मकालू-२' शिखर काबीज केलें ( २५,१२० फूट ) आणि जवळच्या चोमोलोंझो ( २५,६४० फूट ) शिखरावर विजय मिळविला ! वासंतिक मोहिमेंत प्रत्यक्ष मुख्य शिखरावर चढाई करण्याची योजना होती या चढाईची पुढें झालेली निष्पत्ति म्हणजे हिमालय-गिर्यारोहणांत सर्वप्रथमच मोहिमेंतील एकूण एक गिर्यारोहकांनीं आपलें उद्दिष्ट म्हणून ठरविलेलें शिखर पादाक्रांत केलें. शिवाय या मोहिमेंत मुळींच प्राणहानी झाली नाहीं; एवढेंच नव्हे तर एकहि अपघात अगर कसलीहि दुर्घटना घडली नाहीं !

● ● ●

फ्रेंच मोहिमेचे सदस्य इटालियन! कंपनीच्या ‘ आशिया ’ या बोटीनें भारतांत आले. त्यांची बरीचशी सामग्री मात्र त्यांनीं जिनोआहून मालवाहू बोटीनें रवाना केली होती. मोहिमेचे सदस्य कलकत्त्यांत आपल्या सामग्रीची वाट पहात असतांना त्यांना असें कळलें कीं, त्यांची सामग्री आणणारी बोट तांबड्या समुद्रांतच रेंगाळली आहे; व पुढें तर बंदरांतील संपामुळें या बोटीनें कलकत्त्याला भेट देण्याचें पुढें ढकलून सरळ रंगूनचा रस्ता धरला आहे. त्यामुळें मंडळींना धांवपळ आणि काळजी करावी लागली. आणि अखेर कौझी यांनीं रंगूनला जावें व कूपे यांनीं कांहीं भारवाहकांसह कौझींची धरण येथें वाट पाहावी व मुख्य मोहिमेनें अरुण खोरें तुडवावयास सुरुवात करावी असें ठरलें. मोहीम आपल्याजवळील सामानासह तीन डाकोटा विमानांनीं डमडम विमानतळाहून विराटनगर येथें येऊन पोहोंचली. परंतु येथें नवीनच संकट त्यांच्यापुढें उभें टाकलें. डमडम विमानतळावरील २६२ ओझ्यांपैकीं फक्त २५६ च विराटनगर येथें येऊन पोहोंचली होतीं; व न आलेल्या सहा पेट्यांत मोहिमेचे सर्व पैसे व वैयक्तिक चिजा होत्या ! त्यामुळें परत डमडम विमानतळाकडे रवाना होण्याची आवश्यकता होती. हें काम व्हियालात् यांचेवर सोंपविण्यांत आलें.

अशा तऱ्हेनें अकरापैकीं नऊ सदस्य, पंचवीस शेर्पा आणि नऊदशांश साधनसामग्री यांसकट मोहीम विराटनगरहून ५० मैलांवर असलेल्या नेपाळमधील धरण गांवाकडे रवाना झाली. धरण येथें एका खडकाळ माळावर छावणी ठोकून सामानाची व्यवस्था आणि शेर्पांची रंगरूट भरती करण्यास सुरुवात झाली. शेर्पांचा प्रमुख म्हणून या मोहिमेबरोबर ग्यालझेन जाणार होता. भरतीसाठीं आलेल्या शेर्पांनीं आजवर हिमालयांतील राधानाथ, अन्नपूर्णा, नंदादेवी आदि शिखरांवरील चढायांत भाग घेतला होता. कांहींनीं तर के–२ या काराकोरम पर्वतांतील शिखराच्या चढाईत भाग घेतला होता. नन्‌कुन्, चो ओयू आदि शिखरांचा उल्लेखहि कांहीं प्रशस्तीपत्रांत होता.

उंचीच्या तळांपर्यंत ओझीं वाहून नेण्यासाठीं हमालांची व्यवस्था होत होती. त्यासाठीं सोला खुंबू विभागांतून पंधरा दिवसांची पायपीट करून ११५ बायका व पुरुष आले होते. या सर्वांतून व दार्जीलिंगहून आणलेले

हमाल वगैरे मिळून एक तीनशें हमालांची पलटण तयार करण्यांत आली. तळावरील सर्व ओझ्यांची योग्य वांटणी झाल्यानंतर कूपे यांच्याबरोबर पिछाडीच्या चमूसाठीं पंचावन्न हमाल आणि दोन शेर्पा मागें ठेऊन मोहीम वाटचाल करूं लागली. भूगर्भशास्त्रज्ञ पियरी नि लॅट्रीलि, मिंग्मा त्सेरिंग व आंग बाओ या दोन शेर्पांना घेऊन पूर्वेकडच्या मार्गानें गेले. ते परत अरुण नदीच्या मुखाशीं मुख्य मोहिमेला येऊन मिळणार होते. १९ मार्च रोजीं व्हियालात् हे हरवलेल्या पैशांच्या पेट्या घेऊन तळावर येऊन पोहोंचले व २० मार्च रोजीं मोहीम आपला मार्ग आक्रमूं लागली.

धनकुटा, लेगुआ घाट, चैनपूर, कंदबाडी, नूम, सेदोआ असे टप्पे मागें टाकीत टाकीत अरुण नदीच्या खोऱ्यांतून मोहिमेनें आगेकूच केलें व अखेर १५४२० फूट उंचीवर बरुण हिमनदीपल्याड मोहिमेचा पायथ्याचा तळ वसविण्यांत आला. पायथ्याच्या तळाच्या उत्तरेस पांढरें शुभ्र मकालू शिखर ढगापलीकडच्या नीलिम्याचें चुंबन घेत होतें.

पायथ्याच्या तळाची जागा गांठण्यापूर्वीं सुमारें २५ मैलांवर अरुण नदीची कसुवा ही उपनदी पार करण्यासाठीं मोहिमेला एका बांबूच्या कामट्या वळून तयार केलेल्या दोरांच्या २००–२५० फूट लांब पुलावरून जावें लागलें. नुमच्या दिशेनें उतरणीवरचा वळणा वाकणांचा रस्ता तुडवून मोहिमेचें मोठें सैन्य पुलाच्या तोंडाशीं येऊन ठेपलें. बडा हकीम या खेड्याच्या प्रमुखाच्या हुकमावरून एटाने येथील कारागिरांनीं दोराच्या पुलाची डागडुजी केली होती. त्यावर बुद्धप्रार्थना-पताकांची माळ बांधली होती. तथापि चालतांना तो पूल इतका वरखालीं होत होता व पुलाखालीं गर्जत धांवणारें नदीचें असें अक्राळविक्राळ पात्र होतें कीं त्या पुलावरून जातांना अक्षरशः देव आठवत होता ! शेर्पा आणि हमाल तर पूल पार करण्यापूर्वीं देवाची प्रार्थना करून करुणा भाकीत होते. शेर्पा स्त्रियांच्या डोक्यावरचें ओझें दोन फेऱ्या करून शेर्पा भारवाहक पलीकडे नेत होते. व एका शेर्पानीला तर तिचें डोळे बांधून पाठुंगुळीस घेऊनच पलीकडे न्यावें लागलें होतें.

पूल पार करून सर्व ओझीं पैलतीरीं नेणें म्हणजे तासन्तास चालणारें काम होतें. दुपारीं आघाडीची मोहीम दोन मैल पलीकडे असलेल्या एटाने खेड्यांत मुक्कामास पोहोंचली तरीसुद्धां सर्व सामान नदीपार झालें नव्हतें.

तेवढ्यांत एकाएकीं वादळाचीं चिन्हें वाढलीं आणि प्रत्यक्ष वादळानें थैमान घालावयास सुरुवात केली. वादळामागोमाग पावसाची मुसळधार सर आली. गारा आणि विजा यांनीं अधिकच गोंधळ उडवून दिला. थोड्याच वेळांत अरुण नदी दुथडी भरून वाहूं लागली. वादळ ओसरलें तरी अरुण नदीची गर्जना सरली नव्हती.

एटाने गांवानंतर मोहीम सेदोआ येथें आली. येथें मुख्यतः धरण येथून आणलेल्या हमालांची हमाली चुकती करणें आणि सेदोआ येथील नव्या हमालांची भरती करून त्यांना ओझीं वांटून देणें हीं कामें करण्यांत आलीं. शिवाय सेदोआ ही अखेरची बाजारपेठ असल्यानें तांदूळ, कोंबड्या, बोकड आणि मेंढ्या यांची कांहीं आठवडे पुरेल एवढी खरेदी येथेंच करण्यांत आली.

सेदोआ पलीकडच्या वाटचालींत रक्तपिपासू जळवांनीं फारच त्रास दिला. कुंबा खेड्यानंतरचा भाग तर उन्हाळ्यांतहि दलदलीचा असतो. मोसमी पर्जन्याच्या दिवसांत या भागांत अशा घनदाट वनस्पती वाढतात कीं, त्यांतून उठणारे बाष्पाचे ढग वृक्षराजीवर कायमचें आच्छादन घालून रेंगाळत राहातात. येथें कोणतेहिं पक्षी, प्राणी किंवा कीटकहि आढळत नाहींत; केवळ रक्तपिपासू जळवांचेंच काय तें येथें साम्राज्य असतें. या जळवांपासून संरक्षण करण्यासाठीं वेगवेगळ्या मलमांचे लेप फासणें आणि वातरोधक कपड्यांनीं शरीराचा उघडा भाग झांकणें अशा क्लृप्त्या योजाव्या लागतात. सेदोआच्या हमालांची त्वचा राठ असल्यामुळें त्यांना मात्र या जळवांचा तेवढा त्रास होत नाहीं. आणि या हमालांना पुढें करून जळवा त्यांच्यावर तुटून पडल्या कीं तेवढ्याच प्रमाणांत का होईना निश्चिंत होऊन इतर मोहिमेला मागून वाटचाल करणें सोपें जातें. रात्रींच्या मुक्कामांत तर या जळवांपासून वांचण्यासाठीं सविस्तर उपाययोजना करावी लागते.

सेदोआ–कुंबा पल्याडच्या वरुण हिमनदीच्या खोऱ्यांत अमंगळ हिमपुरुष ( Abominable Snowman ) अगर यति म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परंतु साधारणपणें लोकांच्या नजरेस न पडणाऱ्या प्राण्याची वसति असल्याचा समज आहे. हा प्राणी म्हणे वानरहि नाहीं नि अस्वलहि नाहीं. तो एक आडदांड राक्षसी प्राणी आहे. त्याचा चेहेरा माणसासारखा असतो व त्यावर केंस उगवत नाहींत. त्याचे डोक्यावरचे केंस मात्र लांब असतात आणि

त्याच्या इतर शरीरावर लोकरीसारखी दाट लव असते. तो घनदाट अरण्यांत राहातो व फक्त रात्रीं बाहेर पडतो. त्याच्या ओरडण्यांत पशूपेक्षां मानवी आवाजाचेंच अधिक साम्य असतें. त्याची ताकद अचाट असते. एका ठोश्यांत तो याक या जनावरास यमसदनाला पाठवूं शकतो आणि आपल्या तीक्ष्ण नखांनीं त्याची कातडी सोलून त्याचें मांस खातो. मानवी मांसाची त्याला घृणा असल्याचें कांहीं लक्षण माहीत नाहीं.

कुंबाहून एक दिवसाच्या अगदीं थकवा आणणाऱ्या वाटचालीनंतर मोहिमेनें हिमांतच १३००० फुटांवर रात्रीची छावणी ठोकली. सर्वांची अवस्था मॉस्कोहून माघार घेणाऱ्या नेपोलियनच्या सैन्यासारखी झाली होती. उष्णतामान १४° फॅरनहीट होतें व अर्धनग्न हमाल १०–१५ च्या घोळक्यांनीं एकमेकांना बिलगून रात्र काढण्यासाठीं ऊब आणीत होते.

मोहिमेबरोबर नेपाळ सरकारच्या आदेशानुसार खाटमांडू येथील वाचनालयाचा एक चिटणीस कोलासिंग संपर्काधिकारी म्हणून आला होता. तसा मोहिमेचा खरा संपर्काधिकारी किंडजॉक् हा होता. कोलासिंगची प्रकृति सबंध वाटचालींत नादुरुस्तच होती. अखेर या मुक्कामावरून परत जाण्याची त्यानें इच्छा व्यक्त केली आणि प्रकृतीच्या कारणामुळें परत जात असल्याबद्दलची चिठी त्यानें खाटमांडू येथील परराष्ट्रमंत्र्यासाठीं लिहून घेतली. दोन दणकट शेर्पांच्या मदतीनें कोलासिंगाची एटानेच्या पोलिसाकडे रवानगी करण्यांत आली व त्याचेवर कोलासिंगाला विराटनगर येथें पोहोंचविण्याची कामगिरी देण्यांत आली. त्यामुळें एक लचांड कमी झालें होतें.

मध्यंतरी कौझी रंगूनची कामगिरी पार पाडून सामानासकट धरण येथें आल्याची चिठी आली होती. कूपे व कौझी यांचेबरोबर दुसरा तांडा मकालूच्या दिशेनें वाटचाल करू लागला होता. आतां प्राणवायु पुरवठ्याची चिंता सरली होती व मकालूवरील चढाईचा विचार करणें शक्य झालें होतें.

* * *

प्रकरण दुसरें:

# शैल मकालूच्या छायेंत

१९५४ सालच्या हेमंतांत फ्रेंच मोहीम मकालूच्या परिसरांत पूर्वपाहाणी करीत होती, त्याच वेळीं दोन गिर्यारोहण-चमू शैल मकालूशीं झुंज घेण्यांत मग्न झाल्या होत्या. डॉ सिटी यांची कॅलिफोर्नियन चमू आग्नेयेकडून मकालूवर हल्ला चढवीत होती तर शैल राधानाथ कीर्तीचे सर एडमंड हिलरी यांची न्यूझीलंड चमू अरुण नदीचें खोरें तुडवीत २३००० फूट उंचीच्या मकालू प्रपाती उंचवट्यावर येऊन ठेपली होती. वरुण हिमनदाच्या प्रदेशाची पाहाणी करीत असतांना फ्रेंच मोहिमेला वीस ते तेवीस हजार फूट उंचीचीं एकूण आठ शिखरें पादाक्रांत करण्यांत यश लाभलें होतें; एवढेंच नव्हे तर १५ ऑक्टोबर रोजीं बूव्हियर व लेरो यांनीं मकालू प्रपाती उंचवटा पादाक्रांत केला होता. याच मोहिमेनें प्रपाती उंचवट्याच्या पलीकडे रेटून मकालू-२ ( २५,१२० फूट ) व चोमो-लोंझो ( २५, ६४० फूट ) हीं शिखरेंहि जिंकलीं होतीं. या उंच स्थानां-वरून त्यांना शैल मकालूचें सुस्पष्ट दर्शन घडलें होतें. वरुण हिमनदाच्या कुरुक्षेत्रावर फ्रेंच गिर्यारोहकांनीं सप्टेंबर तें नोव्हेंबर हा कालावधि घालविला होता आणि आतां एप्रिल ते जून या काळांत शिखराशीं व भोंवतालच्या हवामानाशीं व परिस्थितीशीं झगडणें त्यांना भाग होतें. म्हणूनच त्यांनी ऐसपैस पायथ्याचा तळ वसविला होता.

कांहीं दणकट शेरपान्यांचीहि पायथ्याच्या तळावर राहाण्याची इच्छा होती. पण यांतून भानगडी निर्माण होण्याची शक्यता असल्यानें श्री. फ्रँको यांनीं तशी परवानगी दिली नाहीं. भारवाहकांचा सरदार ग्यालझेन याची पत्नी मात्र अपवादरूपानें पायथ्याच्या तळावर राहिली होती. विजयश्री आणि कीर्ति पदरांत पडली म्हणजे आपला नवरा इतर कांहीं यशस्वी सर-दारांप्रमाणें दुसरा लग्नसंबंध जोडील असा युक्तिवाद करून तिनें आपला ताबा ग्यालझेनवर कायम ठेवण्यासाठीं पायतळावर राहण्याची परवानगी मिळविली होती.

कौझी आणि कूपे यांची पलटण मुख्य मोहिमेला पायथ्याच्या तळावरच येऊन मिळाली. त्या सायंकाळीं रंगून-कामगिरी यशस्वी झाल्याबद्दल सर्वांनीं रमचें सेवन करून प्रसंग साजरा केला.

१६००० फूट उंचीवरील पायतळावर सुरुवातीच्या कांहीं रात्री जवळ जवळ सर्वांनाचा श्वासोच्छ्वासाबाबत व झोपेबाबत त्रास झाला. त्यांची भूकहि बरीच मंद झाली. आतां उंचीवरील हवामानांत रुळण्यासाठीं गिर्यारोहण करण्याच्या कामगिरीस लागावयाचें होतें व मेच्या १५ तारखेस शिखर जिंकतां येईल अशा हिशेबानें चढाईच्या योजना आखणें आतां भाग होतें. मध्यंतरींच्या काळांत वरच्या तळावर नेण्याच्या सामानाची जुळवाजुळव होत होती; वापरावयाच्या साधनसामग्रीची 'हिफाजत' होत होती! दर-रोज २० ते ३० लोक पायथ्याच्या तळावरून १७३९० फुटावरील पहिल्या तळावर ओझीं घेऊन जात होते. सुरुवातीस हवामान अनुकूल नव्हतें, परंतु हळूहळू त्यांत सुधारणा होत होती.

पायथ्याच्या तळावर कर्म आणि गुर्मिन हे दोन टपाले फ्रान्समधून येणारीं पत्रें योगवाणीहून घेऊन येत व जातांना फ्रान्समधें पाठवावयाची डाक घेऊन जात. एकदां पत्रें आलीं म्हणजे सामुदायिकपणें सर्व पत्रांचा काथ्याकूट होई व त्यांत आल्प्समधील गिर्यारोहणापासून तों तहत् धर्म, तत्त्वज्ञान व वाङ्मयापर्यंत साऱ्या विषयांवर चर्चा होई. शिवाय मोहिमेबरोबर आणलेल्या नाना प्रकारच्या स्वस्त पुस्तकांच्या आवृत्त्यांवर मंडळी तुटून पडत. विशेषतः तेरे यांची वाचनांत रंगल्यामुळें जेवावयाला विसरण्यांत ख्याती होती!

मोहिमेंतील सर्व सदस्यांच्या भुका मात्र चांगल्याच प्रदीप्त होत्या. सुदैवानें अन्नाचा सांठा बरोबर घेण्याचे वेळीं तेरे यांनीं सढळ अंदाज केल्यामुळें अन्नाचा तुटवडा पडण्याची भीति नव्हती एवढेंच.

२३ एप्रिल रोजीं सर्व गिर्यारोहकांनीं पहिल्या तळावर जाण्यासाठीं पायथ्याच्या तळाचा निरोप घेतला तत्पूर्वींच वरुण नदीच्या खोऱ्यांतील भूप्रस्तरविषयक माहिती गोळा करून व पोपटी–लापर्यंत मजल मारून बोर्दे व लॅत्रियेल् मोहिमेस येऊन मिळाले होते.

हिमनदीच्या खडकाळ पसाऱ्यांतून वर चढतां चढतां हिमनदीच्या डाव्या तीरावर एका उठावदार दरडीवर पहिला तळ . उभारण्यांत आला

( १७,३९० फूट ). होतां होतां सराव झाला व गिर्यारोहकांना पायतळा-वरून पहिल्या तळापर्यंतचें सुमारें सहा मैलांचें अंतर तीन-चार तासांत तोडतां येऊं लागलें. आपलीं ५५ पौंडी ओझीं घेऊन शेर्पा भारवाहक देखील पांच-सहा तासांत पहिल्या तळावर पोहोंचूं लागले.

पहिला तळ तीन हिमनद्यांच्या खोऱ्यांच्या तोंडाशीं वसला होता. वायव्य हिमनदी या तळाच्या पायाजवळ आपली प्रस्तरराशी वरुण हिम-नदीच्या खोऱ्यांत आणून ओतीत होती. वरच्या बाजूला खडकाळ टेकाडावर दुसऱ्या तळाची जागा १९००० फूट उंचीवर होती. त्या पलीकडच्या हिमनदीवर २१००० फुटांवर तिसरा तळ ऊर्फ आघाडीचा पायतळ वसवावयाचा होता. या सबंध जागेवर मकालू शिखराची छाया होती. तें शिखर इतकें जवळ होतें कीं उंचीवर असलेल्या त्याच्या संपूर्ण स्वरूपाचें दर्शनहि होणें अशक्य होतें. शैल मकालूच्या किल्लेकोटांवर धडक घेणाऱ्या वाऱ्याच्या गर्जनेचे साद-पडसाद सतत ऐकूं येत होते. वायव्य भिंताडामुळें शैलमकालू ' जुळ्या ' शिखराला जोडलें गेलें होतें. पश्चिम सीमेकडील पर्वतश्रेणीच्या दिशेला या भिंताडाची उंची हळूहळू कमी होत जात होती आणि पुढें ओठंगून उभ्या ठाकलेल्या खडकांऐवजीं बर्फाळ कडा आणि संपथ दिसूं लागले होते. येथून चढून जाणें शक्य कोटींतलें वाटत होतें. या मार्गानें वर जाऊन २३००० फूट उंचीवर चौथा तळ उभारावयाचा अशी योजना होती. या तटावरून पुढें प्रपाती उंचवटा गांठतां येत होता.

कूपे आणि तेरे खोकला आणि गळ्यावरील सूज यामुळें आजारी होते. श्वासोच्छ्वास नीट करतां न आल्यानें त्यांना तंबूंत पडून रहावें लागत होतें. स्वतः डॉ. लाप्रा यांनाहि या व्यथेचा त्रास होत होता. कांहीं दिवसांनीं तेरे —कूपे यांना बरें वाटलें. आतां आघाडीचा पायतळ उभारण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. दोघा- दोघांच्या तीन जोड्या करण्यांत आल्या. लेरॉ आणि बूव्हियर, तेरे आणि कौझी व फ्रँको आणि ग्यूडो अशा जोड्यांनीं पाळी-पाळीनें वर रेटून एक एक तळ उभारण्यास सुरुवात केली. याचवेळीं त्यांचा गिर्यारोहणाचा सरावहि चालू होता. २७ एप्रिल रोजीं तेरे, कौझी आणि व्हियालात् यांनीं जुळ्या शिखरांना जोडणारा कणा पार केला. दुसऱ्या दिवशीं ग्यूडो व फ्रँको यांनींहि हा पराक्रम पुन्हा करून दाखवला.

ग्यालझेन आणि त्यांचे भारवाहक वरच्या तळांवर सामान नेण्याचें काम पद्धतशीर करीत होते. बिनतारी उपकरणांमुळें निरनिराळ्या तळांचें दळणवळण उत्तम होतें. रोज सायंकाळीं ६ वाजतां व्हियालात् भारतीय नभोवाणीवरून येणारा हवामानाचा अंदाज ऐकत; आणि मग तो सगळ्या तळांना कळविला जाई.

२ मे रोजीं प्रत्यक्ष चढाईला सुरुवात झाली. तिसरा तळ, नंतर मकालू प्रपाती उंचवट्यावर चढाई आणि चौथ्या तळाची उभारणी; व मागोमाग शेर्पांची चौथ्या तळावर सामान पोहोंचविण्याची धडपड असें या चढाईचें स्वरूप होतें.

फ्रँको हवामानाचे बाबतींत नेहमींच भाग्यवान ठरत. ते चढत असतांना कधीं वादळ होत नसे. ते चवथ्या तळावर आले, त्यानंतर तेथील हवामानदेखील सुधारलें. सूर्यास्ताच्या सुमाराला हवा स्वच्छ झाली. जादूची कांडी फिरावी तसें धुकें नाहींसें झालें. एखाद्या मशालीप्रमाणें मकालू शिखर फिकट आकाशाच्या पार्श्वभूमीवर तळपूं लागलें. मकालूच्या मधल्या भगदाडांतून दूर तिबेटचीं क्षितिजें स्पष्ट दिसूं लागलीं. ग्यालझेन म्हणाला, "हा 'मोठ्या साहेबांच्या'* नशिबाचा प्रभाव आहे. ते शिखराच्या माथ्यावर पोहोंचतील तेव्हां तिथली हवाहि अगदीं उत्तम असेल!"

५ मेला हवा चांगली होती. सकाळीं नऊ वाजतां स्वच्छ उन्हें पडलीं होतीं. ग्यूडो, फ्रँको आणि दोन शेर्पा ग्याल्झेन व दा नू मकालूच्या कडेकोटावरून ३०° ते ४५° च्या चढणीवर चढत होते. दोन तासांच्या धडपडीनंतर कांहींतरी खाण्यासाठीं त्यांनीं आपले प्राणवायूचे मुखवटे काढले. परंतु एकाएकीं ग्यूडो यांचा मुखवटा हातांतून गळून पडला व उतरणीवरून गडगडत नाहींसा झाला. ग्यूडो प्राणवायूशिवाय वर जावयास तयार होते पण त्यामुळें त्यांना थकवा येऊन प्रकृतीवर परिणाम झाला असता. त्यांना खालच्या तळावर पाठविण्यांत आलें. उरलेले तिघेजण पायऱ्या खोदीत वर

---

* हिमालय गिर्यारोहणांत सर्व गोऱ्या गिर्यारोहकांना 'साहेब' किंवा 'साब' म्हणण्याचा प्रघात शेर्पांच्यामुळें पडला आहे. जीन फ्रँको हे मोहिमेचे, नेते असल्यामुळें त्यांचा उल्लेख 'बडा साहाब' म्हणजे 'मोठे साहेब' असा केला गेला.

चढूं लागले. ते सुमारें ६० फूट गेले. चढण फारच उभी होती. गिर्यारोहकांना देखील कठीण वाटावी अशा या चढणीवरून ओझीं घेऊन भारवाहकांना चढावयास लावणें योग्य नव्हतें. ग्यालझेन यानें तर ' परत फिरण्याबद्दल ' आपलें मत व्यक्त केलें होतें. तथापि दुपारीं ४ वाजेपर्यंत २४००० फूट उंची गांठून मगच फ्रँको परत फिरले. या धडपडींत दा नू घसरला. त्याच्या घसरण्याबरोबरच एक छोटा हिमकडा ढासळला आणि दोरावर टांगला गेलेला दा नू एखाद्या घड्याळाच्या लंबकाप्रमाणें १०० फूट खोल लोंबकळूं लागला. सुदैवानें दोर पक्का होता !

त्या चौघांनीं ती रात्र चौथ्या तळावर काढली. तो सबंध दिवस सूर्याच्या किरणांनीं न्हाऊन निघाला होता. रात्र शांत व निरभ्र होती आणि आकाशांत तारे तळपत होते. दुसऱ्या दिवशीं टप्प्याटप्प्यानें तिसरा तळ, दुसरा तळ करीत ही चमू पहिल्या तळावर पोहोंचली. दुसऱ्या तळावर बूव्हियर व लेरॉ प्रपाती उंचवट्यावर जाण्यासाठीं तयार होते. कूपे आणि व्हियालात् २० शेर्पांसह त्यांच्या मागोमाग २४ तासांनीं निघणार होते. पहिल्या तळावर व्हियालात् व लॅत्रियेल् फेतांग्से शिखर काबीज करून परतले होते. आतां बोर्दे व लॅत्रियेल् हे दोन भूगर्भशास्त्रज्ञ परतीच्या प्रवासाला निघणार होते व १० जून रोजीं विराटनगर अगर कलकत्ता येथें पुन्हां मोहिमेस येऊन मिळणार होते. वरुण खोऱ्यांतून सर्व सामान पायथ्याच्या तळावर आलें होतें.

आतां शैल मकालूवरील मोहिमेला नवीन रंग चढला होता. गिर्यारोहकांच्या चार जोड्या चोव्वीस चोव्वीस तासांच्या अवकाशानें एकीमागोमाग एक लाटेसारख्या पुढें सरकत मकालू शिखरावर धडकणार होत्या. ७ मेला बूव्हियर आणि लेरॉ तिसऱ्या तळावर गेले होते. त्याच दिवशीं व्हियालात् आणि कूपे यांनीं पहिल्या तळावरून प्रस्थान ठेवलें. ८ रोजीं कौझी व लिओनेल् निघणार होते. चार दिवसांत पहिला तळ ते पांचवा तळ अंतर तोडून शिखरावर हल्ला करावयाचा होता. लेरॉ आणि बूव्हियर यांच्या तुकडीनें भारवाहकांच्यासाठीं चढणीवर दोरखंड लावून ठेवले होते. बिनतारी उपकरणांनीं ही वार्ता सर्व तळावर पोहोंचविली होती. आतां प्रपाती उंचवट्यापर्यंत सर्व आवश्यक साधनें व सामुग्री नेणें शक्य होतें. दोन दिवसांनीं ग्यूझो व फ्रँको एक शेर्पा बरोबर घेऊन वर जाण्यासाठीं निघणार होते.

प्रकरण तिसरें:

# यशमाला

पांचवा तळ उभारून झाला होता. प्रपाती उंचवट्याचा मार्ग खुला होता. हवा उत्तम होती व गिर्यारोहकांच्या मदतीखेरीज शेर्पा भारवाहक या चढणीवर ये-जा करूं शकत होते. प्रपाती उंचवट्यावर भरपूर शिधासामग्री होती. आतां शेवटचे ३००० फूट चढून जाऊन शिखर काबीज करण्याचेंच काय तें बाकी उरलें होतें. शिखराच्या उत्तर उतरणीवर आणखी एक तळ उभारून शिखरावर हल्ला चढवावयाचा होता. पण या प्रयत्नासाठीं वेळ फार थोडा असल्यानें एकीमागोमाग दुसरी जोडी अशी शिखरावर चढाई करण्याची योजना होती. प्रथम कौझी व तेरे यांच्या जोडीची पाळी होती. त्यांच्या मागोमाग फ्रँको व ग्यूडो यांची जोडी तयार होती. या प्रयत्नास यश मिळणार हें जवळ जवळ निश्चित होतें; परंतु अपयश आलेंच तर चौघा-चौघांची चमू पुन्हा शिखरावर हल्ला करणार होती. प्रत्येक चमूबरोबर शेर्पा देण्यांत आले होते. त्यासाठीं बारा धडधाकट शेर्पांची निवड केली होती.

चवथ्या तळापलीकडे म्हणजे २३००० फूट उंचीनंतर गिर्यारोहकांना रात्रंदिवस प्राणवायु वापरतां येईल अशी व्यवस्था करण्यांत आली होती. त्याशिवाय जे भारवाहक प्रपाती उंचवट्यापलीकडे ओझीं वाहून नेतील त्यांनाहि प्राणवायु मिळण्याची व्यवस्था होती. त्यामुळें अर्थातच अधिक प्राणवायु-उपकरणें व प्राणवायूच्या बाटल्या वर नेणें भाग होतें आणि म्हणून शेर्पांचें भारवहनाचें कामहि वाढलें होतें.

ऐला नामग्याल, ग्याल्झेन– २, आणि ऐला या तिघांची एक भारवाहक तुकडी तयार झाली व यांनीं प्रपाती उंचवट्यापलीकडे साधनसामग्री न्यावी असें ठरलें. आंग फुटार आणि पेंबा नोर्बू प्रपाती उंचवट्यावर ओझीं नेऊन पोहोंचविणार होते. हे पांच भारवाहक कौझी आणि तेरे यांच्या जोडीला देण्यांत आले होते.

फ्रान्समध्यें मकालूवरील स्वारीची योजना आंखीत असतांना सर्व गिर्यारोहकांनीं शिखरावर चढून जाण्याच्या कल्पनेनें मूळ धरलें होतें. तथापि कांहीं अडचणीमुळें माघार घ्यावी लागली तर सर्वच गिर्यारोहकांना

परत फिरावें लागेल व यश हातचें जाईल या विचारामुळें जीन फ्रँको यांना जोडी-जोडीनें शिखरावर हल्ला करण्याची कल्पना अधिक पसंत होती. या मुद्यावर १२ मे रोजीं तिसऱ्या तळावर कडाक्याची चर्चा झाली व या चर्चेनंतरच दोघा-दोघांच्या जोडीनें हल्ला करून दोन जोड्यांचा अनुभव लक्ष्यांत घेऊन चौघांच्या तुकडीची योजना विचारांत घेण्याचा निर्णय घेण्यांत आला.

त्याच दिवशीं तिसऱ्या तळावर पत्त्यांचा ब्रिजचा खेळ रंगला. येत्या कांहीं दिवसांत शैल मकालूवर बऱ्याच घडामोडी होणार होत्या आणि त्यानंतर हेच चार गिर्यारोहक पुन्हा ब्रिजच्या मेजाभोंवतीं बसूं शकतील कीं नाहीं याची हमी देणें कठीण होतें. त्यामुळें या ब्रिजच्या डावाला वेगळेंच महत्त्व आलें होतें.

अखेरच्या हल्ल्याची सर्व तयारी झाली होती. परंतु शैल मकालूनें एव-ढेंसें काळेंबेरें मनांत आणलें असतें अगर वादळानें एक फुंकर मारली असती तर भिंतीवर चढणाऱ्या मुंग्यांप्रमाणें क्षणार्धांत वरच्या चढणीवरून गिर्यारोहक उडून गेले असते व एखाद्या खोल दरींत कायमचे गडप झाले असते. जीन फ्रँको यांनीं आपली सर्व तयारी झाल्यानंतर वर जाण्यापूर्वी व्हियालात् यांच्या हातीं नायकपदाचीं सूत्रें दिलीं. स्वतः फ्रँको आघाडीच्या पायतळावर परत येईपर्यंत आतां सर्व कारभाराची जबाबदारी व्हियालात् यांचेवर सोंपविण्यांत आली. डॉ. लाप्रा यांनीं आपला छोटा दवाखाना तिसऱ्या तळावर सजविला. त्यांची मुख्य शस्त्रक्रिया-सामग्री पायतळावर व पहिल्या तळावर होती. परंतु दुसऱ्या व तिसऱ्या तळावर त्यांनीं प्रथमो-पचाराचा जुजबी दवाखाना आणला होता.

१३ मे रोजीं प्रत्यक्ष चढाईसाठीं तिसऱ्या तळावरून प्रस्थान ठेवण्यांत आलें. सायंकाळीं चवथा तळ गांठण्यांत आला व प्रपाती उंचवट्यावरून कौझी यांनीं फ्रँको यांना आपल्या चढाईचा अहवाल बिनतारी उपकरणाच्या मदतीनें सादर केला. या अहवालावरून पांचव्या तळावर प्राणवायु आणि अन्नसामग्री ठीक होती. कौझी यांनीं आपण सहाव्या तळावर काय काय नेणार याचीहि जंत्री सांगितली. नंतर तळा तळावरून बिनतारी उपकरणांनीं एकमेकांना शुभेच्छांची देवाण-घेवाण करण्यांत आली.

१४ तारखेस फ्रँको, ग्यूडो, दा नू, ग्याल्झेन, किड्‌जॉक्, पेंबा, तेनझिंग, मिंग्या ही मंडळी तीन दोरांवर प्रपाती उंचवटयाकडे जावयास निघाली. वरच्या तळावर नामग्याल्ू आणि पेंबा नोर्बू यांची प्रकृती फारच बिघडल्या-मुळें कौझी यांना तीन भारवाहकांसह सहाव्या तळाकडे जाणें भाग पडलें होतें. फ्रँको यांची तुकडी उंचवटयावर पोहोंचली तेव्हां पेंबा नोर्बू आणि नामग्याल् यांची प्रकृति बिघडली होती. अखेर त्यांच्यावर उपचार करून व त्यांना कोरॅमिनूचें इंजेक्शन देऊन त्यांची मिंग्मा या अठरा वर्षें वयाच्या शेर्पाबरोबर तिसऱ्या तळाकडे रवानगी करण्यांत आली.

मकाल्ू प्रपाती उंचवटा चांगला विस्तीर्ण आणि उजाड होता. मकाल्ू, मकाल्ू–२ आणि चोमोलोंझो या तीन शिखरांच्या मधून वाहणाऱ्या एका हिमनदीचें पात्र या उंचवट्यावर पठारासारखें रुंदावलें होतें आणि पुढें या हिमनदीनें उत्तरेला तिबेटच्या दिशेनें असंख्य हिमप्रपातांच्या स्वरूपांत खोल उडी घेतली होती. ही हिमनदी नंतर कांगशुंग हिमनदीला मिळून कामा खोऱ्याकडे वाहात जात होती. प्रपाती उंचवटयापलीकडे शैल मकाल्ूचे अखेरचे कांहीं हजार फूट चढावयाचे शिल्लक राहिले होते व या ओसाड विस्तीर्णतेंत आपले तंबू ठोकून फ्रेंच गिर्यारोहक तळ देऊन बसले होते. वर चढणीवर कौझी आणि तेरे या गिर्यारोहकांनीं मार्गावरील खुणा म्हणून रोवलेले तांबडे झेंडे फडकत होते.

मकाल्ू प्रपाती उंचवटयावर वाऱ्याचें साम्राज्य होतें. या उंचवटयावर वाऱ्याचा अवमान करून उभें राहाणें अशक्य होतें. वाऱ्याची इतराजी झाल्यास एका फुंकरीसरशी मानवाला उंचवटयावरून उडवून लावणें वादळी वाऱ्यास कठीण नव्हतें. या वाऱ्यापुढें प्रपाती उंचवट्यावर हिमाचा देखील टिकाव लागत नसे. त्यामुळें प्रपाती उंचवटयावर कांचेसारख्या निळ्या बर्फाचेंच काय तें टणक कवच होतें. आणि त्यांतून हिमनगाबरोबर गडगडत आलेल्या मोठमोठ्या खडका-दगडांचा पसारा बाहेर डोकावत होता. हेमंती चढाईत फ्रेंच मोहिमेनें या उंचवटयावर सोडलेल्या सामग्रीच्या सांठ्याची केव्हांच वाऱ्यानें वासलात लावली होती. तंबूंच्या चिंध्या झाल्या होत्या. प्राणवायूच्या बाटल्या इतस्ततः फेकल्या गेल्या होत्या. ग्यूडो व ग्याल्झेन् यांनीं यांपैकीं बाटल्या मिळविल्या. ग्यूडो व फ्रँको यांचेबरोबर उंचवटयावर

रात्र काढून सहाव्या तळाकडे जाण्यासाठीं थांबलेल्या पांच भारवाहकांची प्राणवायूची सोय करून देण्यांत आली; व या मंडळींनीं रात्रीसाठीं आपल्या तंबूंच्या कुशींत आसरा घेतला.

पहांटे पांचच्या सुमारास वरच्या तळाकडून तीन शेर्पा धडपडत, ठेंचाळत व अतिशय थकलेल्या अवस्थेंत उंचवट्यावरील तळावर येऊन पोहोंचले. त्यांनीं येतांना कौझी यांची चिठी आणली होती. त्या चिठीनुसार पहांटे कौझी व तेरे पांचव्या तळावरून सहाव्या तळाकडे रवाना होणार होते व पांचव्या तळाबर पुरेसें झोंपण्याचें साहित्य नसल्यामुळें त्यांनीं फ्रँको व ग्यूडो यांना स्वतःच्या झोंपण्याच्या पिशव्या आणण्याबद्दल सूचना दिली होती. वर वारा नव्हता. हवा स्वच्छ होती. पलीकडे सरळ चढण असली तरी शिखर दोनच बोटें दूर असलेल्या स्वर्गासारखें भासत होतें.

कौझी यांनीं ग्यालझेन–२, ऐला व आंग फुटार या शेर्पांच्या निर्धाराची व धाडसाची तारीफ केली होती व त्यांच्याकडे लक्ष देण्याची व त्यांची पाठ थोपटण्याची सूचना फ्रँको यांना दिली होती.

कौझी यांच्या चिठीनें आशादायक वातावरण निर्माण केलें होतें. दुर्दैवानें यदाकदाचित कौझी-तेरे जोडगोळीला सहाव्या तळापलीकडचे २३००० फूट चढून जाऊन शिखरमाथा गांठतां आला नाहींच तर फ्रँको–ग्यूडो आणखी एक मध्यंतराचा तळ (सातवा तळ) ठोकून निश्चितपणें शिखरमाथा गाठूं शकतील असा भरंवसा बाळगण्यासारखी परिस्थिति होती.

वरून आलेल्या शेर्पांची वास्तपुस्त करून व त्यांना प्राणवायु, ओव्हल्टीन कॉफी वगैरे देऊन फ्रँको यांनीं शेर्पांच्या इच्छेविरुद्ध त्यांची चवथ्या तळाकडे रवानगी केली. त्या शेर्पांना आणखी एक रात्र एवढ्या उंचीवर राहूं देणें धोक्याचें होतें. शिवाय सर्वांना पुरेसा प्राणवायु देण्याइतके प्राणवायु नियंत्रकहि त्या तळावर नव्हते. शेर्पांनींहि कमींत कमी प्राणवायु घेऊन उरलेला गिर्यारोहकांसाठीं शिल्लक ठेवला. कारण शिखर गांठणें हें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीपेक्षां अधिक महत्त्वाचें होतें !

वरच्या तळाकडून आलेल्या शेर्पांची चवथ्या तळाकडे रवानगी केल्यानंतर कांहीं वेळानें बिनतारी संदेशग्राहकावर बातमी आली कीं, आघाडीच्या जोडीनें सहावा तळ वसविला होता. ही बातमी सर्व तळांवर पोहोंचविण्यांत

आली व त्यामुळें वातावरण उत्साहानें भारून गेलें. त्याच सुमारास नामग्याल व पेंबा नोर्बू डॉ. लाप्रांच्या समवेत आघाडीच्या पायतळावर आले होते. डॉ. लाप्रा यांना उतरणाऱ्या तीन शेर्पांबद्दल माहिती देण्यांत आली व त्यांच्यावर दुर्बिणींतून लक्ष ठेवण्याची सूचना देण्यांत आली.

१५ मे रोजीं सकाळीं प्रपाती उंचवस्त्यावरील तळावर चढाईची तयारी सुरू झाली. कांचनगंगेच्या पाठीमागून नितळ उषा फांकत होती. आणि फ्रँको-ग्यूडो व त्यांचे शेर्पा किंडजॉकूच्या हातचा 'नाश्ता' खाऊन चढाई-साठीं तयार होत होते. एक प्राणवायु-उपकरण कमी होतें व त्यामुळें एका भारवाहकाला प्राणवायूविना सहाव्या तळाकडे आपलें ओझें घेऊन जाणें भाग होते. दा नोर्बू यानें आपलें ४० पौंड ओझें, प्राणवायूचें उपकरण नसतांना नेण्याची तयारी दाखविली ! सकाळीं ८।। वाजतां तीन दोर चढणीवर चढूं लागले. वारा, हिम यांची नेहमींचीच झुम्मड चालू होती. वर अगदीं उंच दोन काळे ठिपके मुंगीसारखे वरवर सरकत होते. ते दोघे म्हणजे कौझी व तेरे होते. याचा स्पष्ट अर्थ आज मकालू सर होणार असा होता !

फ्रँको-ग्यूडो यांच्या चमूला मध्यंतरी धोक्याच्या प्रदेशांतून जावें लागलें. तो प्रदेश हिमप्रपाताच्या पायथ्याशीं होता व कुठल्याहि क्षणीं कोसळण्यास तयार असलेले हिमकडे व हिमनग 'तय्यार'च्या पवित्र्यांत हिमप्रपातांतून अर्धवट लोंबकळत डोकावत होते. या प्रदेशांतून ते सहीसलामत निसटले तेव्हां अकरा वाजले होते व त्यांनीं २५००० फूट उंची गांठली होती. हिमसंपथ अखेरची चढण चढून जाऊन ही चमू सहाव्या तळावर पोहोंचली. तेवढ्यांत कुणाच्या तरी आरोळ्या कानीं आल्या. त्या कौझी--तेरे यांच्या हर्षललकाऱ्या होत्या. त्यांनीं मकालू शिखर पादाक्रांत केलें होतें ! या आनंदानें भारावून जाऊन ग्यूडो व फ्रँको यांनीं सहाव्या तळावर एकमेकांना मिठी मारली. शेर्पांचाहि आनंद गगनांत मावेना. तें विशाल गगन हेंच गिर्यारोहकांनीं चुंबिलें होतें. वर गगन होतें, खालीं पृथ्वी अन् पाताळलोक होते. आणि मधें सहाव्या तळावरील त्रिशंकूच्या जगांत गगनचुंबनाच्या आनंदाचा सोहोळा ऐन रंगांत आला होता. शेर्पांनीं मोहिमेचे नायक जनि फ्रँको यांना उंच उचललें होतें. 'मकालू' या तीनअक्षरी नांवाचा गजर करीत ते नाचत होते, गात होते, हंसत होते !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...... विभाग ...... ग्रंथमाला
क्रमांक ...... नों दि. ......

दुसऱ्या दिवशीं ग्यूडो आणि फ्रँको मकालू शिखरावर दुसऱ्यांदा विजय मिळविण्याचा प्रयत्न करणार होते व प्राणवायूविना सहावा तळ गांठलेला बहादुर शेर्पा दा नोर्बू तीं रात्र सहाव्या तळावर घालविणार होता. बाकीचे शेर्पा आणि गुरखा शिपाई किंडजॉक् सहाव्या तळावरून खालीं परत गेले होते.

थोड्या वेळानें कौझी व तेरे सहाव्या तळावर परतले. त्यांची व फ्रँको-ग्यूडो या जोडीची आठ दिवसांनंतर प्रथमच गांठ पडत होती. त्या चौघांनीं एवढ्या उंचीवर विजयानंद साजरा केला. यशस्वी जोडीनें आपल्या अनुभवांची शिदोरी फ्रँको-ग्यूडो या जोडीच्या स्वाधीन केली. मकालू शिखर एखाद्या छिललेल्या लेखणीच्या टोंकासारखें अणकुचीदार होतें; व त्या शिखराला जोडणारी चढण चाकूच्या पात्यासारखी तीक्ष्ण होती.

त्या रात्रीं तंबूंत उशिरापर्यंत गप्पा चालल्या होत्या. दा नोर्बूनें गिर्यारोहकांना प्राणवायु कमी पडूं नये म्हणून ती रात्र प्राणवायु-उपकरणाचा उपयोग न करतां एवढ्या उंचीवर झोंपून काढली. एवढ्या उंचीवर प्राणवायूविना झोंपण्याचा दा नोर्बूचा विक्रम मकालूच्या यशाएवढाच महत्त्वाचा होता.

रात्रीं मकालूवरील हवामानांत बदल झाल्यास उद्यांचें स्वप्न धुक्यांत विरणार होतें. त्यामुळें पहांट होण्याची वाट पाहात असतांना प्रत्येकांच्या मनावर भविष्यकाळाचें एक अननुभूत दडपण होतें. सकाळीं ग्यूडो, फ्रँको व ग्याल्झेन बर्फाळ चढण चढूं लागले. मकालूच्या तिकोनी शंकूवर चढत असतांना २७००० फूट उंचीपलीकडे ग्याल्झेनला कील पादत्राणें वापरण्याचे पहिले धडे देण्यांत आले. आणि मुळींच पायरी न खोदतां दोन सरळ कडे चढून गेल्यावर शिखर पादाक्रांत झालें. आदल्या दिवशीं कौझी व तेरे यांनीं केलेल्या यशाची पुनरावृत्ति करून यशमालेंत दुसरें पुष्प गुंफण्यांत आलें होतें. ग्याल्झेन यानें आदरानें भारावून जाऊन शिखराच्या बर्फाळ माथ्यावर आपला स्वतःचा माथा टेकला. फ्रँको यांच्या हातांतला कॅमेरा शिखरावरून खालीं कोसळून एका दरडीवर सावरला होता. फ्रँको यांना त्या कॅमेऱ्यांतील अमूल्य छायाचित्रें नाहींशीं होण्याची कल्पना असह्य वाटली. बर्फ चांगल्या स्थितींत होतें. फ्रँको यांनीं ग्याल्झेन नको नको म्हणत असतांना ग्यूडो यांना स्वतःस दोरावर आधार देऊन खालीं सोडण्याची विनंती केली. अशा तऱ्हेनें अखेरची आश्चर्यकारक घटना सिद्ध

झाली होती. ग्यालझेन यांनीं मकालूवर नेपाळी राष्ट्रध्वज फडकविला. फरँको यांनीं फरेंच राष्ट्रपताका परत आपल्या पोतडींत ठेवल्या आणि मकालूस गगन चुंबण्यास एकटें सोडून ते तिघे खालीं उतरूं लागले.

१५ तारखेस तिसरी तुकडी तिसऱ्या तळावरून निघाली होती. ती फरँको यांच्या तुकडीला पांच व सहा या तळांच्या दरम्यान भेटली. " हवा उत्तम आहे, यश मिळवून या. " पहिल्यां चमूकडून मिळालेल्या शुभेच्छा दुसऱ्या चमूनें जणूं तिसऱ्या चमूच्या स्वाधीन केल्या आणि बूव्हियर–कूपे–लेरॉ यांची चमू सहा शेर्पासकट सहाव्या तळाकडे चढूं लागली. आणि १७ मे रोजीं फरेंच मकालू मोहिमेच्या तिसऱ्या लाटेखालीं मकालू शिखर पुन्हा एकदां बुडालें आणि यशमालेंत तिसरें ढंगदार पुष्प गुंफलें गेलें.

मकालू मोहिमेचें उद्दिष्ट त्रिवार साध्य झालें होतें. मोहिमेचे नायक श्री. जीन फरँको यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे, " आम्हीं कुठल्याहि हिमभेगेंत पडलों नाहीं, कुठल्याहि कोसळणाऱ्या हिमकड्याखालीं आमचा एकहि तळ गाडला गेला नाहीं, शिखरमाथ्यावर मॉंट ब्लांक शिखरावर उभे राहिल्यासारखें वाटावें एवढे आम्ही सुस्थितींत होतों. आमच्यांतले नऊ जण शिखरावर पाऊल रोखून आले, लागोपाठ तीन दिवसांत तीन वेळां शिखर जिंकलें गेलें ! आणि तरी देखील एकाचींहि पावलें गोठलीं नाहींत." ...उल्लेख करण्यासारखा अपघात घडला नाहीं, रोमांचकारकपणें संकटांतून सुटका झाल्याचे निःश्वास सोडावे लागले नाहींत, पर्वतावरील हवामान बिघडलें नाहीं, प्राण वांचाविण्यासाठीं ससेहोलपट व्हावी असें पलायन करावें लागलें नाहीं. नाहीं म्हणायला १९५४ च्या हेमंती मोहिमेंत मकालू पर्वत गांठण्यापूर्वींच मोहिमेचा २६ वर्षे वयाचा तरुण संपर्काधिकारी दिल्लीबहादुर वर्मा २३ सप्टेंबर रोजीं आजारानें मकालूच्या छायेंत वारला आणि १९५५ ची वासंतिक मोहिम संपतां संपतां पायतळावर अपुऱ्या शस्त्रसामुग्रीनिशीं सोना या हमालावर ॲपेंडिसिटिस्साठीं शस्त्रक्रिया करून त्याला मृत्यूच्या दाढेंतून बाहेर काढण्याची महत्त्वाची कामगिरी शस्त्रवैद्य लाप्रा यांनीं यशस्वीपणें पार पाडली.

आणि अशा तऱ्हेनें फरेंच गिर्यारोहणाला नवें तेज प्राप्त करून देऊन मकालूवरील फरेंच मोहीम संपली.

* * *

# परिभाषा

| | | | |
|---|---|---|---|
| Abominable Snowman | हिममानव, हिम-पुरुष, यति | Elbow Valley | कोपरदरी |
| Advance base | आघाडीचा तळ | Expedition | मोहीम |
| Anorak | वातरोधक अंगरखा | Glacier | हिमनद, हिमनदी |
| Avalanche | हिमकडा, हिमनग | Hidden valley | लुप्त दरी |
| Avalanche cone | हिमनग शंकू | Ice axe | हिमकुठार |
| Base | तळ | Ice cliff | बर्फाचा कडा |
| Base camp | पायतळ, पायथ्याचा तळ | Ice fall | हिम प्रपात |
| Basin | तसराळें | Icicle | हिमलोलक |
| Birgschrund | पर्वतांतील भग | Ice pitons | खुंटचा |
| Cacolet | जखमी झोळी | La | खिंड |
| Cairn | प्रस्तर-चबुतरा, दगडी मनोरा | Loads | ओझीं, बोजे |
| Camp | तळ | Monastery | भिक्षुगृह |
| Cauliflower ridge | फुलकोबी-पर्वतश्रेणी | Monk | भिक्षु |
| Cirque | निसर्ग-प्रेक्षागृह | Mount | शैल |
| Chu | खोरें | Oxygen apparatus | प्राणवायु-उपकरण |
| Col | प्रपाती उंचवटा | Oxygen cylinder | प्राणवायु-ग्राहक बाटली |
| Coolie | हमाल | Party | तुकडी, चमू |
| Corridor | संपथ, हिमसंपथ | Pied d' elephant | पदसंरक्षक पिशवी |
| Coulier | हिमसंपथ | Platform | चौथरा |
| Crampons | कील पादत्राणें | Porter | भारवाहक |
| Crevasse | हिमजबडा | Ramparts | रक्षक तटबंदी, तटबंदी,किल्लेकोट |
| Cwm | हिमतसराळें | Range | पर्वतश्रेणी, पर्वतराजी |
| Dzong | किल्ला | | |

| | | | |
|---|---|---|---|
| Ridge | कणा, पर्वतश्रेणी | Snow bridge | हिमपूल |
| Rope | दोर | Snow corridor | हिमसंपथ |
| Sanctuary | मृगवन | Snow fall | हिमसेक |
| Scree | प्रस्तर–चढण, –उतरण | Spur | दरड, नाकाड |
| | | Team | चमू, तुकडी |
| Seracs | हिममनोरे | Thaw | हिम-चिखल, हिम-पंक |
| Shoulder | वशिड | | |
| Sickle glacier | विळयाची हिमनदी | Tiger | ‘ शेर ’ |
| | | Tse | शिखर |
| Skis | घसरपट्ट्या | Wall | भिताड |
| Ski–sticks | घसर–आधार-काठ्या | White peak | श्वेत शिखर |
| | | Chimney | धुराडें |
| Sledge | ओढगाडी | Moraine | शिलापसारा |
| Snap–links | दुवे | Abyss | हिमभेग, गर्त |

REFBK-0012995

REFBK-0012995

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38097 दि. ........
क्रमांक 393 नों. दि. ........